# मुक्त - गीत

९८५४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं ९३९३



रचयिता

नारायण गोविंद देसाई

REFBK-0008346
REFBK-0008346

वि. ..........

नों: दि. ..........

# मुक्त-गीत

रचयिता:

नारायण गोविंद देसाई.

('सुलभ तत्त्वज्ञान' या ग्रंथाचे कर्ते.)

REFBK-0008346

आवृत्ति पहिली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

शके १८७६] [सन १९५४

मूल्य चार रुपये

प्रकाशक:
**डॉ. राजाराम वासुदेव आजगांवकर** L. M. & S.,
मालवण, जिल्हा रत्नागिरी.

सर्व अधिकार रचयित्याच्या स्वाधीन.

मुद्रक:
**स. रा. शिखरे**
जनता प्रिंटिंग प्रेस, रत्नागिरी.

क्रमांक 7373 नों. दि.

# प्रकाशकाचें हृद्गत

जगांतील सर्व प्रकारच्या ज्ञानाला उजाळा देणारी खरी पार्श्वभूमि अध्यात्मज्ञानाचीच आहे हें विचार करतां पटूं लागतें. कालौघाबरोबर पालटत जाणाऱ्या समाजाला हें ज्ञान वेगवेगळ्या तऱ्हेनें पुरविणाऱ्या व्यक्ती वेळोवेळीं निर्माण झालेल्या दिसतात. त्या त्या काळीं उपयुक्त होणारें हें ज्ञान संग्रहित करून समाजापुढें ठेवणें हें कार्य कोणी तरी करावें लागतें. या भावनेनें माझ्या एका चिरपरिचित अशा व्यक्तीचें वाङमय जिज्ञासूंसाठीं यथाशक्ति प्रकाशित करण्याचा मी संकल्प केला; व त्या संकल्पाचें पहिलें फळ म्हणून माझे स्नेही रा. नारायण गोविंद देसाई यांचा 'सुलभ-तत्वज्ञान' हा ग्रंथ मीं प्रकाशित केला आणि महाराष्ट्रीय तत्व-जिज्ञासूंनीं त्या ग्रंथाचें उत्तमप्रकारें स्वागतही केलें.

उपरिनिर्दिष्ट 'सुलभतत्वज्ञान' हा ग्रंथ माझ्या विनंतीवरून त्यांनीं लिहिला होता; पण माझ्या संकल्पाचें दुसरें फळ म्हणून रा. देसाई यांचा जो ग्रंथ मी आज प्रकाशित करीत आहें तो म्हणजे त्यांच्या स्वतःच्याच प्रेरणेनें निर्माण झालेलें कवितारूपी वाङमय होय. त्यांच्या वयाच्या तेराव्या वर्षापासून ते स्वयंस्फूर्तीनें भगवत्कीर्तन व भगवत् भजन करूं लागले. त्यावेळेपासून पुढें सुमारें आठ वर्षांत कीर्तन-भजनप्रसंगीं त्यांच्या मुखांतून ज्या कविता निघाल्या व त्या त्या वेळीं श्रोतसमुदायांतून कांहींनीं ज्या लिहून घेतल्या अशा संग्रहांतून निर्माण झालेला बराचसा भाग मालवण येथील सुप्रसिद्ध कार्यकर्ते कै. कृष्णराव सीताराम उर्फ आबासाहेब देसाई यांनी सुमारें तीस बत्तीस वर्षांपूर्वी भागशः प्रसिद्ध केला. त्यानंतरही कांही कविता त्यांनी रचिली. आज 'मुक्तगीत' या नांवानें मीं प्रकाशित करीत असलेला ग्रंथ म्हणजे रा. देसाई यांच्या पूर्वप्रकाशित कवितेंतील कांहीं निवडक कविता व त्यांनी लिहिलेल्या अप्रकाशित अशा कवितांपैकीं कांहीं कविता याचा एक विशिष्ट संग्रह होय.

आजकाल सामाजिक, राजकीय व सामान्य मनाच्या सांसारिक त्रुटित भावनांचा आविष्कार करणाऱ्या पुष्कळ कविता निर्माण होत असलेल्या दिसतात. पण मनाच्या आध्यात्मिक भावनांना व्यक्त करणारें, त्यांचें पोषण करणारें किंवा त्यांना चालना देणारें असें काव्य सांप्रत क्वचितच निर्माण होतें. हें कार्य एकाकाळीं संतकवींनीं केलें. आधुनिक जगाला अध्यात्माचा तोच उज्ज्वल संदेश देणारी ही रा. देसाई यांची कविता, त्या प्रकारच्या तत्वजिज्ञासूंना व अध्यात्म-प्रेमी काव्य रसिकांना आनंद देईल अशी मला खात्री वाटते. या त्यांच्या कवितेचे "उत्स्फूर्त" व "लिखित" असे दोन गट पाडिलेले आहेत. त्यांत तत्काल गाइलेल्या कवितांचा इतरांनी टिपून केलेला संग्रह व स्वतः रा. देसाई यांनीं स्वहस्तें लिहिलेली कविता हा भेद उघडच आहे, आणि त्यामुळें त्या दोन्ही गटांतील कवितांत एक प्रकारचा फरकही वाचकांना आढळून येईल. पण आध्यात्मिक स्वरुपाचें काव्य आवडणाऱ्या आधुनिक वळणाच्या काव्य रसिकांना कदाचित् त्यांच्या या लिखित कवितेंत एक वेगळ्या प्रकारचें नाविन्य आणि तत्व-संदेश सांपडल्याशिवाय रहाणार नाहीं.

रा. नारायण गोविंद देसाई यांचा अध्यात्मविषयक व्यासंग दीर्घ-कालीन असून या गहन विषयाचें ज्ञान सोप्या भाषेंत समजावून देण्याची त्यांची हातोटी प्रभावी आहे. असा माझा गेल्या चाळीस वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. या त्यांच्या प्रसादयुक्त वाणीचा आणि दैवी विचारांचा अनुभव मीं प्रकाशित केलेल्या त्यांच्या दोन्ही ग्रंथांत वाचकांना प्रतीत झाल्यावाचून राहणार नाहीं. या "मुक्तगीत" ग्रंथातील त्यांची कविता कोणाच्याही मनावर उत्तम संस्कार घडविणारी असून ती गानमाधुर्यानें युक्त अशी आहे. स्त्रिया आणि बालकें यांच्याही तोंडीं घरांत व सभांत ती निःसंकोचपणें गायिली जाण्यास हरकत नाहीं इतकी ती सुसंस्कृत असल्याचें वाचकांना आढळून येईल.

रा. देसाई यांच्या 'सुलभ-तत्वज्ञान' या अध्यात्म ग्रंथाचें जसें महा-

राष्ट्रीय वाचकांनी स्वागत केलें तसेंच त्यांच्या या ' मुक्तगीत ' काव्यग्रंथाचेंहीं स्वागत महाराष्ट्रांतील रसिक काव्यप्रेमी करतील अशी मला आशा वाटते. रा. देसाई यांनी लिहिलेल्या व ते लिहित असलेल्या आणखीही ग्रंथांचे प्रकाशन होऊन तें जिज्ञासूंपुढें यावें अशी फार इच्छा आहे पण तें अशा जिज्ञासूंच्या सहकार्यावरच अवलंबून राहील.

रा. देसाई यांचा अल्पपरिचय या पुस्तकांत स्वतंत्रपणें दिला आहे त्यावरून त्यांच्या चरित्राची कांहींशी माहिती वाचकांस होऊं शकेल.

महाराष्ट्रसंतकविचरित्रकर्ते व सुप्रसिद्ध संतवाङ्मय संशोधक महाराष्ट्र-भाषा-भूषण रा. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यानीं माझे विनंतीस मान देऊन या ग्रंथास बहुमोल प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

मालवण
ता. १८-३-'५४

**राजाराम वासुदेव आजगांवकर**
(प्रकाशक)

# अल्प परिचय

भगवद्भक्ति परायण श्री. नारायण गोविंद देसाई यांचा जन्म १९०१ सालीं, रत्नागिरी जिल्ह्यांतील सावंतवाडी तालुक्यांतील बांदें या गांवीं एका मध्यम वर्गीय गौडब्राह्मण कुटुंबात झाला.

वयाच्या १३ व्या वर्षी हे इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत शिकत असतां त्यांना अकस्मात् उपरति झाल्यामुळें ते स्वयंस्फूर्तीनें कीर्तन आणि भजन करूं लागले. अशावेळीं ते तत्काल कविता रचीत व श्रोतृसमुदायापैकीं कोणी ना कोणी तरी तीं लिहून घेत.

सुमारें बारा वर्षें याप्रमाणें जीवन व्यतीत केल्यानंतर त्यांच्या साधुवृत्ति-मुळें त्यांच्याभोंवतीं सहाजिकच निर्माण झालेली भाविक लोकांची प्रभावळ दूर करण्यासाठीं त्यांनीं १९२४ सालीं बनारसला प्रयाण केलें. तेथें संस्कृताचें अध्ययन करीत असतां तत्प्रांतीय विषम हवेमुळें त्यांची प्रकृति ढासळली व १९२९ सालीं ते मुंबईस आले. त्याच वर्षी त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई या ' मद्रास युनिव्हर्सिटीच्या ' **B. A. L. T.** असून शिक्षिका आहेत.

दीर्घ कालिक प्रकृति अस्वास्थ्यामुळें श्री. देसाई यांना जवळ जवळ १९४० सालपर्यंत कांहींच करतां आलें नाहीं. त्यानंतर थोडें बरें वाटतांच १९४१ सालीं त्यांनीं मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिकची परीक्षा दिली व १९४३ सालीं ते ' इंटर आर्टस् ' च्या परीक्षेला बसले पण त्या परीक्षेंत ते उत्तीर्ण न झाल्यामुळें तो नाद त्यांनीं सोडून दिला. पुढें त्यांनीं मुंबईच्या ' आर्यन एज्युकेशन सोसायटी ' च्या ' शारदा-सदन ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मुलींच्या शाळेंत अध्यापकाची नोकरी स्वीकारली पण सुमारें अडीच वर्षांनंतर त्यांची प्रकृति इतकी बिघडली कीं त्यांना सेवानिवृत्त होणें भागच पडलें.

ते अद्यापिही विनामूल्य कथा-प्रवचन करीत असतात. अध्यात्म विषयाचें चिंतन, प्रवचन व लेखन हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव विषय आहे. ' सुलभतत्त्वज्ञान ' (गद्यग्रंथ) व ' मुक्तगीत ' (कविता) हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध झाले असून **' मननीय विचार '** व **' अष्टावक्रसंहिता-सुबोधिनी '** हे त्यांचे ग्रंथ प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

**– प्रकाशक –**

# –विषय सूची–

(एकंदर कविता-संख्या: २९१)


| अनुक्रमांक. | विषय. | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रकाशकाचें हृद्‌गत. | १ ते ३ |
| २ | अल्प परिचय. | ४ |
| ३ | प्रस्तावना. | ६ ते ९ |
| ४ | मनोगत. | १० ते १४ |
| ५ | अर्पण पत्रिका. | १५ |
| ६. | ' मुक्त-गीत ' (कविता) | १६ |
| ७ | (उत्स्फूर्त विभाग.) | |
| | अभंग. (संख्या: १६८) | १ ते ८८ |
| | पदें. (संख्या: ९५) | ८९ ते १४६ |
| ८ | (लिखित विभाग.) | |
| | वृत्त-कविता. (संख्या: २८) | १४७ ते १८२ |
| ९ | शुद्धिपत्र. | |

# प्रस्तावना

बरींच वर्षे झालीं, मुंबईंत मी अशी बातमी ऐकली कीं सावंतवाडी येथील देसाई उपनामक एका विद्यार्थ्याच्या अंगांत सीताराम महाराज या नांवाच्या एका समाधिस्थ सत्पुरुषाचा संचार होऊं लागला असून ज्या ज्या वेळीं असा संचार त्याच्या अंगांत होतो त्या त्या वेळीं त्याच्या तोंडून स्वयंस्फूर्तीनें अनेक अभंग, पदें वगैरे पारमार्थिक कविता आपोआप बाहेर पडते व तो त्या अवस्थेंत असतांना सुंदर कीर्तनही करतो. अशा प्रकारची घटना क्वचितच घडत असल्यामुळें, गोष्ट ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें व त्या गोष्टीच्या सत्यतेविषयीं माझ्या मनांत थोडीशी शंकाही निर्माण झाली. पुढें कोंकणांतून मुबईंत आलेल्या अनेक सद्‌गृहस्थांनीं जेव्हां स्वानुभवानें ती घटना खरी असल्याचें सांगितलें तेव्हां माझी शंका दूर होऊन, हा प्रकार कसा काय घडत असेल याचा मी विचार करूं लागलों आणि शेवटीं हा विद्यार्थी पूर्व जन्मींचा योगभ्रष्ट पुरुष असावा अशी मी स्वतःची समजूत करून घेतली. अशा योगभ्रष्ट पुरुषाचें वर्णन श्री ज्ञानदेवांनीं खालील ओव्यांत केलें आहे:—

**"मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पाहांट फुटे ।**
**सूर्यापुढें प्रगटे । प्रकाश जैसा ॥**
**तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।**
**बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥**
**तया सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।**
**मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥**

चालू जन्मांत फारसें अध्ययन झालेलें नसतां एकादा मनुष्य जर मोठ्या विद्वत्तेच्या गोष्टी बोलूं लागला तर योगभ्रष्टांसारख्या अलौकिक पुरुषांत लोक त्याची गणना करूं लागतात. विद्यार्थी देसाई याचें बाल्यावस्थेंतलें अलौकिकत्व जर पुढेंही चालू राहतें तर या कोटींत त्याची कायमची गणना झाली असती, परंतु पुढें ही त्याची दशा बदलली आणि

इतर सामान्य जनांसारखाच तो वागूं लागला; आणि यावरून त्याच्या विद्यार्थीदशेंत त्याच्या अंगांत कोणातरी मृत सत्पुरुषाचा संचार होत होता ही मूळ कल्पनाच खरी ठरली.

वर ज्या विद्यार्थ्याचा निर्देश मी केला आहे त्याचें नांव नारायण गोविंद देसाई. पुढें हे देसाई श्रीक्षेत्र काशी येथें गेले आणि तेथें त्यांनीं संस्कृत भाषेचें आणि अनेक अध्यात्म ग्रंथांचें अध्ययन केलें. थिऑसफीचेही पुष्कळ ग्रंथ त्यांच्या वाचनांत आले असावेत असें हल्लींच प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या एका अध्यात्मविषयक ग्रंथावरून दिसतें. इंग्रजी भाषेचाही अभ्यास त्यांनीं केलेला आहे. त्यांच्या बाळपणांतलें अलौकिकत्वाचें वलय आतां त्यांच्या भोंवतीं नाहीं तरी सात्विक वृत्ति, निरभिमानता, सरलता शुचिता आणि प्रसिद्धिपराङ्मुखता हे त्यांचे गुण प्रथमदर्शनींच दृष्टोत्पत्तीस आल्याशिवाय रहात नाहींत.

श्री. देसाई यांचा 'सुलभ तत्त्वज्ञान' हा ग्रंथ गेल्या सालीं प्रसिद्ध झाला असून श्री. ज. स. करंदीकरांसारख्या अधिकारी पुरुषानें त्यावर अनुकूल अभिप्राय दिलेला असल्यामुळें त्यासंबंधानें मी येथें विशेष काहीं लिहीत नाहीं; इतकेंच सांगतों कीं 'सुलभ तत्त्वज्ञान' या नामाभिधानास अगदीं पूर्णपणें पात्र असा हा ग्रंथ आहे. 'अष्टावक्रसंहिते'वरही त्यांनीं एक मराठी ग्रंथ लिहिला असून तो यथावकाश प्रसिद्ध होईल.

आतां श्री. देसाई यांच्या कवितेकडे वळतों. बालपणीं स्वयंस्फूर्तीनें जी कविता त्यांच्या तोंडून बाहेर पडली ती मालवण येथील एक प्रसिद्ध गृहस्थ कै. कृ. सी. देसाई यांनी शके १८४३ सालीं प्रसिद्ध केली असून, त्या पुस्तकाचीं मोठ्या आकाराचीं २५० हून अधिक पृष्ठें आहेत व ग्रंथारंभीं कवीचें विस्तृत चरित्र दिलें आहे. ह्या ग्रंथांतील बहुतेक सर्व कविता अगदीं थेट जुन्या संत कवींच्या कवितेसारखी स्वयंस्फूर्तीची आणि प्रासादिक आहे; फरक असलाच तर तो भाषेचा. श्री. देसाई हे आतां, आजवर त्यांनीं रचलेल्या कवितांपैकीं काहीं निवडक कविता 'मुक्तगीत' या नांवानें प्रसिद्ध

करीत आहेत; म्हणजे त्यांनीं रचिलेल्या सर्व कवितांचा हा संग्रह नसून काहीं निवडक कवितांचा संग्रह आहे. 'मुक्त-गीत' हें ग्रंथाचें नांवही फार गोड आहे. 'मनोगता' रंभीं कवि म्हणतात, "हा कविता संग्रह काव्य म्हणून वाचकांपुढें ठेवलेला नसून एक भावोल्लेख म्हणून मांडलेला आहे. भावनांचा उन्मेष व अनुभवाचें गूज वाणीच्या द्वारें व्यक्त करण्याच्या मानवस्वभावसुलभवृत्तींतून याची निर्मिती झालेली आहे. याचा आस्वाद घेणाऱ्या काहीं व्यक्ति मिळूं शकतील व त्यासाठींच हें प्रकाशन आहे."

अलिकडे महाराष्ट्रांत ज्या काव्याचा महापूर आला आहे त्या प्रकारचें हें काव्य नाहीं. पिपात मरुन पडलेले उंदीर, सिंहकटी पृथुनितंबिनीचा उत्तान शृंगार, मी तुझा आणि तूं माझी इत्यादि प्रणयलोलुप नवतारुण्यप्रविष्ट युगुलांचीं उन्मादक प्रलपितें यांत सांपडणार नाहींत. हे एका प्रपन्नाचे खडे तात्त्विक बोल आहेत आणि त्यांत स्वानुभवाची मोलाची भर पडलेली आहे. "प्रबल मनोवृत्तींचा स्फूर्तिजन्य उद्रेक" ही इंग्रजीतील काव्याची व्याख्या आणि 'रसात्मकं वाक्यं काव्यम्' ही संस्कृतांतील व्याख्या, यांत फारसा फरक नाहीं; कारण प्रबळ मनोवृत्तीशिवाय रसनिष्पत्ति होणार नाहीं. आणि अमुक एका रसाची उत्पत्ति झाली तरच तें काव्य अशीही मर्यादा घालतां येणार नाहीं. शृंगार हा जसा एक रस आहे त्याप्रमाणेंच शांत, वत्सल, भक्ति हेही रसच आहेत. संतशिरोमणि तुकाराम महाराजांच्या कवितेंत शृंगार कोठें आहे? तथापि त्यांचे पुष्कळ अभंग अत्यंत काव्यप्रचुर आहेत हें अव्वल दर्जाच्या अरसिकाशिवाय कोणीही नाकबूल करणार नाहीं. संसारसागरांत गटंगळ्या खाणाऱ्या बहुसंख्य सामान्य जनांपेक्षां ज्यांची विशेष आध्यात्मिक प्रगति झालेली असते त्यांची कविता आणि सामान्य जनांच्या मनोरंजनासाठीं किंवा कवित्वकीर्तीसाठीं जे काव्यरचना करतात त्यांची कविता यांत नेहमींच थोडें बहुत अंतर राहणार. प्रस्तुत कवि श्री. देसाई हे पहिल्या वर्गांतील कवि होत. त्यांची कविता साधी, सुलभ आणि भक्तिरसपूर्ण आहे. तिच्या गुणदोषांची चर्चा करण्याचा माझा अधिकार

नाहीं. तथापि मी येवढेंच सांगतों कीं या कवितासंग्रहांतील कांहीं कविता मला फार आवडल्या आणि माझ्यासारख्या इतर मुमुक्षूंनाही त्या आवडतील अशी मला खात्री वाटते.

शेवटीं कविवर्य देसाई यांचा एक सुंदर अभंग येथें उधृत करून ही प्रस्तावना संपवतों:—

एक झालें प्रेम नाम गंगा–गोदेच संगम
चढली आनंदाची कळा भरोनियां आला गळा
रगीं रंगलें या मन हारपलें देहभान
कंप रोमांच सुटला रामदास सुखावला

दादर, मुंबई.
ता. १५ ऑक्टोबर १९५३

ज. र. आजगांवकर.

# मनोगत

हा कविता-संग्रह काव्य म्हणून वाचकांपुढें ठेवलेला नसून एक भावोल्लेख म्हणून मांडलेला आहे. भावनांचा उन्मेष व अनुभवाचें गुज वाणीच्याद्वारें व्यक्त करण्याच्या मानव-स्वभाव-सुलभ वृत्तींतून याची निर्मिती झालेली आहे. याचा आस्वाद घेणाऱ्या काहीं व्यक्ति मिळूं शकतील व त्यांसाठींच हें प्रकाशन आहे.

या संग्रहाला दिलेल्या ‘मुक्त-गीत’ या नांवाविषयीं थोडें स्पष्टीकरण करणें योग्य होईल. मुक्तानें रचलेलें गीत असा ‘मुक्त-गीत’ या शब्दाचा समास सोडवावयाचा नाहीं. कारण रचयित्याच्या अंतःकरणांत तशा कोणत्याहि प्रकारचा अभिनिवेश नसून अंतःकरणांतील भावना मुक्तकंठानें गाइल्या म्हणून त्यांना ‘मुक्त-गीत’ असें नामाभिधान योजलें आहे. हृदयांत घुमणारें गीत वाणीच्याद्वारें मुक्त केलें इतकाच त्याचा अर्थ आहे.

या संग्रहाच्या मुद्दाम कल्पिलेल्या ‘उत्स्फूर्त’ व ‘लिखित’ अशा दोन विभागांसंबंधीं येथें चार शब्द लिहिणें आवश्यक आहे.

वयाच्या चौदा ते बावीस या आठ वर्षांच्या काळामध्यें रचयित्याकडून ज्या कविता रचल्या गेल्या त्यांचा एक विशिष्ट गट पडतो; कारण या वयांत रचयित्याच्या झालेल्या वृत्तिपालटामुळें भगवत्कीर्तन आणि भगवद्-भजनप्रसंगीं त्याच्या मुखांतून सहज निघालेल्या तत् तत् कालीन कवितांचा तो संग्रह आहे. त्या कविता स्वस्थ बसून रचलेल्या किंवा लिहिलेल्या नसून, त्या प्रसंगानुसार तत् तत् कालीं गाइलेल्या व त्या त्या वेळीं उपस्थित असलेल्या श्रोतृसमुदायांपैकीं काहींनीं टिपून संग्रहित केलेल्या आहेत व या कारणामुळें त्याला ‘उत्स्फूर्त’ असें नांव कल्पून तो गट वेगळा काढला आहे. कीर्तन-भजन प्रसंगीं निर्माण झालेली कविता हा त्या त्या वेळच्या भावनेचा उद्रेक व स्वानुभवाचा उल्लेख होय. या कवितेचा मोठा संग्रह “श्री सीताराम महाराजांची कविता” या नांवाखालीं परलोकवासी ‘कृष्णराव सीताराम देसाई’ यांनीं सुमारें तीस वर्षांपूर्वीं प्रसिद्ध केला होता. त्याच मूळ संग्रहांतून

अनुक्रमांक ९०३५५ वि. ३/०५
क्रमांक ९३७३ नों दि. ३/०७

काहीं कविता निवडून त्या या 'उत्स्फूर्त' गटांत ग्रथित केल्या आहेत व त्यांवर योग्य तेथें शब्दांचे, अर्थांचे, व्याकरणाचे व वृत्तांचे वगैरे संस्कार घडवून त्या सजविलेल्या आहेत. पण कोणत्याहि कवितेंतील मूळ कल्पना व तिचा सांचा यांस स्पर्श केलेला नाहीं. कीर्तन-भजनांतून तत् तत् कालीं सहज गाइल्या जाणाऱ्या 'उत्स्फूर्त' कवितेंतून अनुभवांची, कल्पनांची व शब्दांची द्विरुक्ति होणें हें अपरिहार्य आहे व म्हणूनच असा प्रसंगोपात्त फुगलेला सर्वच्या सर्व संग्रह पुनर्मुद्रित करणें यांत काहींच स्वारस्य नाहीं असें वाटून मूळ संग्रहांतून सर्वच्या सर्व कविता येथें घेतलेल्या नाहींत.*

कीर्तन-भजन प्रसंगीं गाइलेल्या कवितांवर पूर्व संत-कवींच्या विचार कल्पनांची व क्वचित् शब्दांचीहि छाप पुष्कळ ठिकाणीं असून त्यांचा चेहरामोहराहि त्याच वळणाचा आहे. पण संतकाव्यांतील दिव्यानुभवाचा स्वाद काहीं वेगळाच असणार हें उघड होय. रचयित्याच्या जीवनांत लहान वयांत घडलेला हा एकंदर प्रकार इतरांना तसा त्याला स्वतःलाहि अभिनव व काहीसा अगम्यहि आहे. पण घडलेल्या या प्रकारावर उत्तरोत्तर वाढत्या वयांत व आजहि विचार करूं लागल्यावर त्याच्या वृत्तीला त्या संबंधीं खेद, हर्ष किंवा कौतुक असें काहींहि वाटत नसून त्याला ती एक अभिजात वृत्तीच वाटते. तथापि वाढत्या वयाबरोबर घडल्या स्थितीचा विशेष विचार करण्याची पात्रता येऊं लागल्यापासून भोवतीं जमणाऱ्या जनतेनें अंधश्रद्धेचा देव्हारा माजवूं नये किंबहुना काहींसा तिनें त्याचा आधींच रचलेला पायाहि

---

* कीर्तनप्रसंगीं उधृतें व उदाहरणें म्हणून वापरलेल्या तुकारामादि संतांच्या काहीं थोड्या कविता, कविताचरण व चरणांश नवरचित म्हणून अनभिज्ञ लोकांनीं लिहून घेतले व तेहि दुर्लक्ष्यानें पूर्व संग्रहांत जेथें जेथें घुसडले असल्याचा संभव वाटला तेथें तेथें ते दोष शक्य तितके परीक्षून या संग्रहांतून काढून टाकले आहेत. तथापि इतकेंहि करून तशी चूक कोठें राहिली असल्यास वाचकांनीं रचयित्यास क्षमा करून सहृदयपणें ती निदर्शनास आणून द्यावी अशी नम्र विनंति आहे. म्हणजे पुढील आवृत्तींत ती चूक टाळण्यांत येईल.

मोडून काढावा एतदर्थ त्याला तसें प्रयत्न करावे लागले भगवद्भजन व कथाप्रवचन हा अद्यापिहि त्याचा सात्विकहेतुयुक्त विनामूल्य व्यवसाय आहे; पण त्यावरून त्याला जेव्हां जेव्हां कोणी महंतीचा टिळा लावूं पहातो तेव्हां तेव्हां त्याच्या अंतःकरणांत एक प्रकारच्या खेदाची सूक्ष्म लाट उसळल्याविना रहात नाहीं आणि अशा प्रसंगीं 'प्रवाद आणि स्तुति यांचा विटाळ कोणाला झाला नाहीं!' असें मानून हृदयाचें समाधान करून घेणें त्याला प्राप्त होतें.

दुसऱ्या गटांतील कविता रचयित्यानें कधींमधीं स्वस्थ बसून लिहि-लेल्या असल्यामुळें त्या संग्रहाला 'लिखित' असें नांव कल्पिलें आहे.

'उत्स्फूर्त' गटांतील बहुतेक प्रत्येक कवितेमध्यें 'सीताराम' 'राम' किंवा 'दास' असें शब्द शेवटच्या चरणांत आलेले आहेत तो त्याचा त्यावे-ळचा गृहित-नामनिर्देश होय. दुसऱ्या 'लिखित' या गटांतील कवितेंत कोणत्याहि प्रकारचा असा नामोल्लेख सहसा केलेला नाहीं हें येथें सूचित करून ठेवणें योग्य वाटतें.

या दोन्ही गटांतील कवितांचा परमार्ष वाचकांनीं कसाहि घेतला व आपापल्यापरीनें रचयित्याची कशीहि संभावना केली तरी 'काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलवीलीं' हीच अंतःकरणांतील भावना वरील अभंग-संतवाणीनें प्रकट करून हें मनोगत पुरें केलें आहे.

हें मनोगत पुरें केलें खरें! तरी सुद्धां आणखी एक दोन गोष्टी सांगा-वयाच्या राहिल्याच! त्या सांगणें आवश्यक आहे.

पहिली गोष्ट म्हणजे, माझे परम स्नेही श्रीयुत डॉक्टर राजाराम वासुदेव आजगांवकर एल्. एम्. अॅन्ड एस्. यांच्या संबंधींची होय. मी मिळवलेलें विचारधन इतरांना वाटण्यास मी कितिही उत्सुक असलों तरी जनतेसमोर लेखक म्हणून पुढें येण्याची माझी महत्वकांक्षा नव्हतीच. तथापि, माझें पहिलें पुस्तक 'सुलभ तत्त्वज्ञान' हें माझ्यामागें लागून लिहून घेण्याचें व तें स्वखर्चानें प्रकाशित करण्याचें काम ज्यांनी केलें त्यांचे कितीही आभार मानले तरी ते थोडेच होणार आहेत. वाङमयाची, उच्च विचारांची व उच्च

संस्कृति आणि निरपेक्ष लोकसेवेची अभिजात आवड असल्याशिवाय स्वतःचें आर्थिक नुकसान सोसूनही ग्रंथप्रकाशनाचें कार्य करणाऱ्या व्यक्ति समाजांत कितीशा सांपडतील बरें! 'सुलभ तत्त्वज्ञाना'चें स्वागत करण्यास महाराष्ट्रांतील बरेचसे जिज्ञासु वाचक पुढें सरसावले खरे! पण या 'मुक्तगीता'चा आस्वाद घेणारे रसिक सांपडतील का? याचा सुतराम् विचार न करतां, केवळ वाङमयाच्या व लेखकाच्या प्रेमासाठीं तें प्रकाशित करावयाचें त्यांनी ठरवलें यांत, मनास वाटलेलें सत्कार्य केवळ सेवाभावनेनें व निरपेक्ष बुद्धीनें पार पाडण्यापलिकडे त्यांचा अन्य हेतु कोणता बरें असूं शकेल! अशा थोर व्यक्तिबद्दल मी अधिक काहीं लिहिणें आम्हा परस्परांमध्यें असलेल्या स्नेहाला साजेसें दिसणार नाहीं आणि म्हणूनच अधिक काहीं न लिहितां मी त्यांचे प्रकाशक म्हणून लेखकाच्या नात्यानें येथें औपचारिक आभार मानून थांबणेंच योग्य होईल.

तसेंच माझे तरुण स्नेही श्रीयुत प्रभाकर राजाराम आजगांवकर B. Sc. यांनीं मुक्तगीताच्या मुखपृष्ठावरील कलाकृति तयार करून दिली याबद्दल त्यांचे व पुस्तकाचें मुद्रण उत्तम प्रकारें व अत्यंत आपुलकीनें करून दिल्याबद्दल समाजसेवक श्री. स. रा. शिखरे यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

दुसरी गोष्ट म्हणजे 'मुक्तगीतां'तील वृत्त विशेषांसंबंधीं थोडें लिहिलें पाहिजे. 'अभंग'वृत्त तर सर्व विश्रुत आहेच. 'पदें' हीं संगीतांतील वेगवेगळ्या चालींवर व तालांवर ज्याचीं त्यानें बसवून म्हणण्याइतकीं सोप्या ढंगाचीं असल्यामुळें, त्यांचे राग, ताल वगैरे देण्याच्या भानगडींत न पडणेंच बरें असें वाटल्यावरून तो उपद्व्याप येथें केलेला नाहीं. पण, पुढील वृत्तगीतांची संज्ञा जरी त्या त्या गीताच्या शीर्षकावर दिलेली असली तरी कुठें कुठें असलेले त्या गीतांतील वृत्तभेद व तत्संबंधींचीं वैशिष्टयें येथें नमूद करणें इष्ट होईल. त्यामुळें वाचकाला तीं गीतें गातांना अडखळल्यासारखें होणार नाहीं. त्याबरोबर येथें हेंही सांगितलें पाहिजे कीं, रचयित्याचें वृत्तज्ञान फारसें मोठें नाहीं. शिवाय गीतें रचतांना वृत्तविशेष दृष्टीसमोर

ठेवून तीं रचलेलीं नाहींत. काव्योन्मेषाबरोबर जें रचलें गेलें तेंच कागदावर टिपून घेतल्यामुळें कुठें कुठें त्यांत वृत्तदोष राहिल्याचें मागाहून आढळलें तेवढें परीक्षून तें वाचकांच्यापुढें मांडलें आहे.

'हा जगदुद्धारक आला." या कवितेंतील फक्त ध्रुवपद तेवढें 'वधु-वल्ली' वृत्तावर असून पुढील सर्व चरण 'उद्धव' जातीवर आहेत. पण, त्यांत चाल बदलून म्हणावयाचा अंतरामात्र नाहीं.

"भूतकालांतील भूतें" "इथेंच मजला राहूं दे" या 'बालानंद' वृत्तांतील कविता, ध्रुवपद व अंतरा यांवांचून आहेत आणि याच बालानंद वृत्तांतील "नेतों आतां तुज ओढून" या कवितेंत क्रमानें आठ चरण सारखे असून, मग त्यास अंतरा व पुढें दोन चरण जोडून कडवें पुरें केलें आहे.

"उपजत प्रेम" "वेडा" व "नरें नराला हीन बनविलें" या तीन्ही कविता अंतऱ्या विरहित 'फटका' असून तिचे पुष्कळ चरण एक' मात्रेनें अधिक आहेत.

"गोचर होसी मज या जनीं" या 'केशवकरणी' वृत्तांतील कवितेला ध्रुवपद व अंतरा नाहीं. "हस्तांदोलन" कवितेचे पहिले चार चरण 'भूपति वैभव' वृत्ताचे व पुढील तीन चरण 'मंजरी' वृत्ताचे आणि शेवटचे दोन चरण पुन्हां 'भूपतिवैभव' वृत्ताचे मिळून या कवितेचें कडवें पुरें होतें. त्यांतही प्रत्येक कडव्याच्या शेवटचा चरण हा पुन्हा पुन्हा पालुपदा सारखा येणारा म्हणून त्यास ध्रुवपद मानावयास हरकत नाहीं. तेव्हां या कवितेची जाति "भूपति-मंजरी" अशी मिश्र दिली आहे.

"दोन्ही मीच" ही कविता 'कटिबंध' वृत्तांत आहे खरी, पण तींत फरक हा आहे कीं, पहिल्या तीन चरणांच्या शेवटीं यमक साधलें आहे व पुन्हा चरणयुग्मकामधील पहिल्या चरणांत सोळा मात्रा दुसऱ्या चरणांत पंधरा मात्रा असून त्या दोन्ही चरणांच्या शेवटीं वेगळें यमक साधलें आहे. आणि त्यापुढील चरण स्वतंत्र आहे. शेवटचा पंधरा मात्रांचा चरण हा ध्रुवपदासारखा पुन्हा पुन्हा आणून प्रत्येक कडवें पुरें केलें आहे.

**—रचयिता**

## — अर्पणपत्रिका —

लोककल्याण हेंच ज्यांच्या जीविताचें ध्येय, स्त्रीशिक्षणाविषयीं ज्यांच्या अंतःकरणाला आत्यंतिक कळकळ, अंगीकृत कार्यासंबंधीं दृढ विश्वास व तें तडीस नेण्यासाठीं कष्टांसहि न जुमानणें हा ज्यांचा बाणा, विचार नी आचार यांचा संयोग हाच ज्यांचा नित्यक्रम, संसारी जीवनांतहि मुमुक्षु रहाण्याची तत्परता हा ज्यांचा गुण, अशा उदारधी, प्रेमळ, सत्यप्रिय व न्यायप्रिय, लोकमान्य आणि राजमान्य, धीरोदात्त, "मालवण-कन्या-शाळा-संस्थापक" व मालवण येथील सुप्रसिद्ध आणि लोकप्रिय नागरिक अशा माझ्या सन्मित्र, परलोकवासी कृष्णराव सीताराम देसाई यांच्या स्मृतीस माझी ही अल्प कृति मी अत्यंत प्रेमादरपूर्वक अर्पण केली आहे.

नारायण गोविन्द देसाई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.

# मुक्त-गीत

(वृत्तः– वसंततिलका)

ही मुक्त-वाक् समजुनी नच 'मुक्त-गीत' ।
नामाभिधान दिधलें बघ हें प्रशस्त ॥
हृत्सागरीं खळबळोन वरी निघाले ।
जे भाव ते उधळुनी अजि मुक्त केले १

हें 'मुक्त-गीत' म्हणुनी वदलों तयातें ।
नाहींच गर्व हृदयीं कथितों खरें तें ॥
हा मुक्त कंठ करुनी रसनेस आलें ।
तें गीत जाण रसिका तुज अर्पियेलें २

(रचयिता)

---

मुक्त-वाक्=मुक्त जीवाची वाणी.

# उत्स्फूर्त विभाग

# अनुक्रमणिका

## (उत्स्फूर्त विभाग)

### अभंग


| क्र. | अभंगारंभ | पृ. |
|---|---|---|
| | **अ** | |
| १ | अंगीं चढे मद | २७ |
| २ | अंगीं प्रेमाचें या | ७१ |
| ३ | अंतर्बाह्य देव | ८६ |
| ४ | अनुभव कोणा | २४ |
| ५ | अनंत तारका | ५१ |
| ६ | अभक्ष्य तें कदा | ८३ |
| ७ | अरे दांभिकानों | ८० |
| ८ | असें एकदा मी | ४ |
| ९ | असोनीयां जनीं | ६० |
| १० | अहो काय माळा | ६८ |
| ११ | अहो वाटे ज्यास | १७ |
| | **आ** | |
| १२ | आजवरी व्यर्थ | ५३ |
| १३ | आतां करणें नको | ४० |
| १४ | आतां तरी मना | ८१ |
| १५ | आधीं आत्मरूपा | १ |
| १६ | आधीं प्राप्त आहे | २९ |
| १७ | आधीं होता मुक्त | ११ |
| १८ | आधीं होतों जड | २ |
| १९ | आलें विवेकासी | १७ |
| २० | आशा नाव हे | १८ |
| २१ | आशामेघ आले | ४८ |
| | **ए** | |
| २२ | एक जाहला वैष्णव | ७५ |
| | **ऐ** | |
| २३ | ऐक ऐक माझ्या मना | ८१ |
| २४ | ऐका हो कामिक | ८ |
| २५ | ऐसीच हे विश्वस्थिति | ११ |
| | **क** | |
| २६ | कधीं नव्हतोंच मी | ४ |
| २७ | कधीं हांसें खेळें | ४१ |
| २८ | कधीं होय थोरां | ६५ |
| २९ | कमलपुष्पाची | ३७ |
| ३० | कर्मज्ञान योगा- | ६९ |
| ३१ | करूनीयां एक | ६२ |
| ३२ | कांता नव्हे दासी | ६६ |
| ३३ | कामक्रोधांसीया | ७२ |
| ३४ | कां रे लावीसी हें | ६१ |
| ३५ | कासया करावें | २० |

| क्र. | अभंगारंभ | पृ. |
| --- | --- | --- |
| ३६ | किती एक आम्ही | ७६ |
| ३७ | कुठें शोधूं आतां | ४६ |
| ३८ | कैसें म्हणो कोणा | २८ |
| ३९ | कोण ऐसें नातें | ४ |
| ४० | कोण झाला पूर्ण | ३२ |
| ४१ | कोण वाचाळता | ३४ |
| ४२ | कोण स्वार्थावरी | ३३ |
| | **ख** | |
| ४३ | खोल तेथें वाहे | २९ |
| | **ग** | |
| ४४ | गुरुकृपें आजि | २ |
| ४५ | गुण तेथें अवगुण | २३ |
| ४६ | गुणदोष माझे | ५४ |
| ४७ | गुणधर्म ज्याचे | २७ |
| ४८ | गुणा अवगुणा | ६३ |
| | **च** | |
| ४९ | चहूं देहाचें बंधन | १४ |
| ५० | चाल पुढें मना | ८७ |
| | **ज** | |
| ५१ | जगा आणि मज | ३५ |
| ५२ | जगीं अंधश्रद्धा | ७३ |
| ५३ | जरी व्हावें आत्मज्ञान | ६९ |
| ५४ | जवळी असता धनाचें | २६ |
| ५५ | जाणा बीजरूप | ११ |
| ५६ | जाहला विवेक | ५ |
| ५७ | जीवलग मज | ४४ |
| ५८ | जीवें भावें देवा | ३५ |
| ५९ | जेव्हां गळेल जाणीव | १० |
| ६० | जें जें घडतसे | ६३ |
| ६१ | जैसी ज्याची उपासना | ३० |
| | **झ** | |
| ६२ | झोंपी गेला त्यासी | २१ |
| | **ट** | |
| ६३ | टाकूं सारा अभिमान | ६२ |
| | **ठ** | |
| ६४ | ठेवूं कोणा पायीं डोई | ६ |
| | **त** | |
| ६५ | तुज मानवे तें करीं | ५० |
| ६६ | तुम्ही ऐकिलें का जगीं | ७८ |
| ६७ | तुम्हासाठीं आज | ४६ |
| ६८ | तोची एक आम्ही | ६७ |
| ६९ | तोंडापुरतें भाष[illegible] | ४[illegible] |
| | **द** | |
| ७० | दीक्षा घेतली | ७५ |
| ७१ | देव ओळखी | ६१ |
| ७२ | देव नाहीं सांगा | १८ |
| ७३ | देवोनीयां कोणा | २९ |
| ७४ | देवा मारूं किती हाक | ४९ |
| ७५ | दैवें दिला टोला | ५९ |
| ७६ | द्वैत हारपोनी गेलें | ६ |
| | **ध** | |
| ७७ | धर्म सेवकाचा | ६६ |
| ७८ | ध्यान धारणेचा | ८२ |

| क्र. | अभंगारंभ | पृ. |
|---|---|---|
| | **न** | |
| ७९ | नका निंदूं | ६९ |
| ८० | नको करूं चिंता | ८४ |
| ८१ | न येवो कल्पना | ४९ |
| ८२ | नाथ माझा वाट | ४३ |
| ८३ | नाम उद्घटासी | ७१ |
| ८४ | नामाचेनी योगें | ७१ |
| ८५ | नाहीं कोणीहि | १३ |
| ८६ | नित्य उपदेश | ८७ |
| | **प** | |
| ८७ | पंचप्राणाचीया | ३ |
| ८८ | पथ्य सांभाळीना | ६४ |
| ८९ | परमाणुहुनी सान | १३ |
| ९० | प्रारब्धाची माळ | २ |
| ९१ | प्रारब्धेंची घडे | २६ |
| ९२ | प्राणाचाहि प्राण | ४३ |
| ९३ | पाहोनीयां रंग | ६५ |
| ९४ | प्रिय प्राणनाथ | ४३ |
| ९५ | पूर्व जन्मीं बीज | ३१ |
| ९६ | प्रेममय माझें | ३९ |
| ९७ | प्रेम मृदु कीं कठोर | ३३ |
| | **ब** | |
| ९८ | बीज आलें | १२ |
| ९९ | बीज श्रद्धेचें | ३ |
| | **भ** | |
| १०० | भोंदावया लागीं | ७८ |

| क्र. | अभंगारंभ | पृ. |
|---|---|---|
| | **म** | |
| १०१ | मज कोण देती | ६ |
| १०२ | मज न कळे | ४२ |
| १०३ | मज नका देऊं | ५९ |
| १०४ | मज न टाकीं | ५१ |
| १०५ | मज नसे काहीं | ५ |
| १०६ | मज नाहीं गोडी | ३९ |
| १०७ | मज माझा आतां | ४४ |
| १०८ | मज लागीं | ५५ |
| १०९ | मजवरी कोप | ४० |
| ११० | मजविषयींचा | ६० |
| १११ | मज हिंडवितें मन | ५० |
| ११२ | मधुप वासाचिये | १८ |
| ११३ | मधुरा हे भक्ति | २१ |
| ११४ | मना करीं रे विवेक | ८७ |
| ११५ | मंत्रसिद्धि शक्ति | ७९ |
| ११६ | मर्त्यलोकींचा या | ८३ |
| ११७ | म्हणति हक्क द्या | २३ |
| ११८ | माझीं दोन्ही नेत्र | ५० |
| ११९ | माझिया मित्रांचें | ५६ |
| १२० | माळ संचिताची | ३० |
| १२१ | मी असें कोमल | ५८ |
| १२२ | मी असें पाखरूं | ५७ |
| १२३ | मी असें भागला | ५८ |
| १२४ | मी न कोणालागीं | ५७ |
| १२५ | मी न मंत्र तंत्र | ५५ |
| १२६ | मूळ एक निराकार | १० |
| १२७ | मेघ वासनेचे | ५४ |

| क्र. | अभंगारभ | पृ. |
|---|---|---|
| | **य** | |
| १२८ | येथें न करा हो | ६२ |
| १२९ | योगियां स्वाधीन | ३४ |
| | **र** | |
| १३० | हृदय-सरोजीं | ४७ |
| १३१ | हृदयाकाशींचा | ५ |
| १३२ | हृदयींच्या देवा | ४५ |
| | **ल** | |
| १३३ | लोकां सांगे | ७३ |
| | **व** | |
| १३४ | व्यक्ताव्यक्त दोन्ही | १३ |
| १३५ | व्यर्थ सोडोनी | ६१ |
| १३६ | वाटेवरी आलों | ३८ |
| १३७ | विकासलें पुष्प | ३२ |
| १३८ | विश्व-चित्रपट | १८ |
| १३९ | विषयसागर | ३७ |
| १४० | वैराग्य हा वन्हि | २० |
| | **श** | |
| १४१ | शुद्ध बुद्ध आतमा, | २५ |
| १४२ | शुद्ध ब्रह्मरसीं | ९ |
| १४३ | शुद्ध विवेक | ६३ |
| | **स** | |
| १४४ | संग घडे दोघां | १५ |
| १४५ | संपला व्यापार | ८ |
| १४६ | सकळ विश्वाचा | ४१ |
| १४७ | सज्जना मना तूं | ८२ |
| १४८ | सत्ता तेथें मान | २८ |
| १४९ | सत्य तेथें भगवंत | २२ |
| १५० | सत्य सांगें मज | ५७ |
| १५१ | सम चित्त | ६८ |
| १५२ | सरुनी गेलें बालपण | २३ |
| १५३ | स्वात्मसुखसेजे | ८१ |
| १५४ | सहज भाषणीं | १७ |
| १५५ | सांगितला धर्म | ६६ |
| १५६ | साक्षीभूत हरि | १९ |
| १५७ | साधूंची ते मूर्त | ३६ |
| १५८ | साधु म्हणोनीयां | ७४ |
| १५९ | साधूंचिया पोटीं | ३७ |
| १६० | सुख आहे आम्हा | ३५ |
| १६१ | सुखदु:ख दोन्ही चित्त | १५ |
| १६२ | सुखदु:ख दोन्ही | ८४ |
| १६३ | सुखदु:ख भोग | ८५ |
| १६४ | सोडिली हे लाज | ७ |
| १६५ | सोवळें तें नाम | ६४ |
| | **ह** | |
| १६६ | हरवलें माझें | ५३ |
| १६७ | होई क्षणैक उदास | २४ |
| | **ज्ञ** | |
| १६८ | ज्ञानसूर्य | ५२ |

# अनुक्रमणिका

## (उत्स्फूर्त विभाग)

### पदें


| क्र. | पद्यारंभ | पृ. |
|---|---|---|
| | **श्री** | |
| १ | श्रीवरा, भुवनसुंदरा | ९९ |
| | **अ** | |
| २ | अहो मी ब्रह्म | १२० |
| | **आ** | |
| ३ | आत्मरूप भानु | ११७ |
| ४ | आत्मविचार | १२९ |
| ५ | आपुलासा या | १४१ |
| | **उ** | |
| ६ | उठा चला हो | १२५ |
| ७ | उठा सकळ हो | १२७ |
| | **ऐ** | |
| ८ | ऐक गडे बांसरिची | ९१ |
| ९ | ऐक सखी ये विचार | ९५ |
| १० | ऐसे सद्‌गुरु बोल | ११८ |
| | **क** | |
| ११ | कपटी मोठा कृष्ण | ९३ |
| १२ | कर कर करसी | १३५ |
| १३ | करणें फार नको | १४५ |
| १४ | कर्णधार गुरु | ११७ |
| १५ | काय हें नाहीं | ११० |
| १६ | कां मना धुंडसी | १४० |
| १७ | का रे मन धरिसी | १३१ |
| १८ | काहीं समज मना | १३२ |
| १९ | किति सांगूं वारंवार | १४३ |
| २० | कुंजवनीं शोभतसे | ९३ |
| २१ | कोण कोटुनी | १३६ |
| | **ख** | |
| २२ | खेळ भिंगरी हरि | १०० |
| | **ग** | |
| २३ | गूढ जरी तें | १३७ |
| २४ | गुरुगुह्य कदापि | १२७ |
| | **घ** | |
| २५ | घोरतम जाळी वघ | १११ |
| | **च** | |
| २६ | चल उठ मना | १३१ |
| २७ | चला ग कुंजवनीं | ९२ |
| २८ | चला सख्यानों | ९४ |

| क्र. | पद्यारंभ | पृ. |
|---|---|---|
| | **त** | |
| २९ | तयाचा भवपट | १२४ |
| ३० | तव कृपा | १०७ |
| ३१ | तव पद-पद्मीं- | ११२ |
| ३२ | त्राहि त्राहि मां | ११४ |
| ३३ | त्रिभुवन साक्षी | ९२ |
| ३४ | तोची संत | १२४ |
| ३५ | त्यज विषयांचा | १३९ |
| ३६ | त्यजुनी हृदयींचा | १४१ |
| ३७ | त्या भगवंता | १२८ |
| | **द** | |
| ३८ | दाखवीं शामरूप | ९७ |
| ३९ | दीन दयाळा परम | १ |
| ४२ | दुष्कृतिला कटु फल | १२६ |
| ४१ | देईं अभयदान | १०४ |
| ४२ | देवा दावीं | १०५ |
| ४३ | द्वाड तुझा मुल | ९८ |
| ४४ | द्वैत भास सारा | १४२ |
| | **ध** | |
| ४५ | धन्य सुदिन | ११८ |
| ४६ | धरीं विराग | १३७ |
| | **न** | |
| ४७ | निमिष निमिष | १४४ |
| ४८ | नेईं लया घोर | १०७ |
| | **प** | |
| ४९ | पडलीं पाईं | ११८ |
| ५० | प्रभुचरणकमल | १३५ |
| ५१ | प्रभुजीं आश्रय | १०५ |
| ५२ | प्रभुपाईं धरीं | १३२ |
| ५३ | प्रणति तुला हे | १११ |
| ५४ | प्रिय नाथ कुठें | १०६ |
| ५५ | प्रेमळ राधा | १०१ |
| | **ब** | |
| ५६ | बघत वाट | ११५ |
| ५७ | बा मना सोड | १४३ |
| ५८ | भक्तहृदयकासारीं | १२५ |
| ५९ | भवाब्धिमधीं | ११३ |
| ६० | भो प्राणनाथ | १२० |
| | **म** | |
| ६१ | मधुकर तूं | १०९ |
| ६२ | मधुर मुरलि | ८९ |
| ६३ | मना तूं होईं | १३६ |
| ६४ | मना तूं होईं सावधान | १३९ |
| ६५ | मना सोड | १३४ |
| ६६ | मना होउनी | १४४ |
| ६७ | मम हृत्कुंजवनीं | १०८ |
| ६८ | माझी हृदयरूप | ९० |
| ६९ | माझें निजरूपीं | १२४ |
| ७० | माता ही मानिली | १२३ |
| ७१ | माया हे अनिवार | १२२ |
| ७२ | मी शरण | १२५ |
| | **य** | |
| ७३ | येइल ऐसा योग | १२२ |

| क्र. | पद्यारंभ | पृ. | क्र. | पद्यारंभ | पृ. |
|---|---|---|---|---|---|
| | र | | ८४ | स्मरे जो अखंड | १२१ |
| ७४ | हृद्विचार | ९६ | ८५ | सेवीं मनोभ्रमरा | १४४ |
| | व | | ८६ | सेवूं हा वनवास | १२१ |
| ७५ | वाजवीत शाम | ९१ | ८७ | सोडुनी तदितर संग | १३८ |
| ७६ | वारंवार कर मन | १४५ | ८८ | सोडुनियां अविचार | १३१ |
| ७७ | वारंवार गांजी | ११५ | | ह | |
| ७८ | विनत पदीं गोपी- | ११४ | ८९ | हरि यमुनेच्या | ९५ |
| | श | | ९० | हरि हा वेळ किती | ९७ |
| ७९ | शरण चरणीं | ११० | ९१ | हा संसार डोह | ११७ |
| ८० | शान्तिसदन हा | १३३ | ९२ | हे केशव | १०२ |
| | स | | ९३ | हे तुज विनति | १०४ |
| ८१ | सखये माधव | ९८ | ९४ | हे वल्लभ गोविन्द | १०८ |
| ८२ | सत्य सांगतों | ११९ | | क्ष | |
| ८३ | स्मरण तुझेंचि | १२२ | ९५ | क्षणभरीच | ९० |

# अनुक्रमणिका

## (लिखित विभाग)


| क्र. | कवितेची संज्ञा | पृ. |
| --- | --- | --- |
| | मुक्तगीत | |
| १ | प्रश्नोत्तर | १४७ |
| २ | विचारा मुकला | १५० |
| ३ | भूतकाळांतील मूर्ते | १५२ |
| ४ | उपजत प्रेम | १५३ |
| ५ | गोचर होसी मज या जनीं | १५४ |
| ६ | चिरस्थाई ज्योत | १५५ |
| ७ | हा जगदुद्धारक आला | १५७ |
| ८ | नेतों आतां तुज ओढून | १६० |
| ९ | अमर्त्य प्रीति | १६१ |
| १० | वार्धक्य | १६२ |
| ११ | विकास | १६४ |
| १२ | आत्मशक्ति | १६४ |
| १३ | प्रवाह पावित्र्य | १६६ |
| १४ | सौंदर्य नासुनी लाभ काय हा कुणा | १६६ |
| १५ | दोन्ही मीच | १६७ |
| १६ | इथेंच मजला राहूं दे | १६९ |
| १७ | हस्तांदोलन | १७० |
| १८ | वेडा | १७२ |
| १९ | बाळपणींचा काळ | १७३ |
| २० | नरें नराला हीन बनविलें | १७४ |
| २१ | अशक्य मैत्री | १७४ |
| २२ | वद ईश्वर नाहीं कोठें | १७५ |
| २३ | करूं प्रसन्न या मना | १७८ |
| २४ | विचारानें नाहीं मारिला विचार | १७८ |
| २५ | असार हा संसार | १७९ |
| २६ | उपवर मुलीस | १८० |
| २७ | भांडूं कशाला भांडणें | १८२ |

# अभंग.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलन
अनुक्र. १०३५५ दि. ३।८५
क्र. नि. ७३७३ नों. दि. ३०।१।५

ॐ

॥ श्रीलक्ष्मीनारायणाभ्यां नमः ॥

# मंगलाचरण

आधीं आत्मरूपा करीतों प्रणति
व्यापक जें भूतीं चराचरीं १
ॐकार स्वरूप अनादि निर्गुण
उत्पत्ति कारण स्थिति लया २
वेदादिकीं हाचि बांधिला निर्णय
दाखविली सोय अव्यक्ताची ३
राम म्हणे नित्य वसतें शेजारीं
आपुल्या अंतरीं सर्व काळ ४

## पद

दीन दयाळा परम कृपाळा हे अघसंहरणा
निजजनभयहरणा सुखसदना तापत्रयशमना १
त्रिगुणातीता मायारहिता हे प्रथमोंकारा
अनाद्यनंता जय भगवंता जय जय अविकारा २
परात्परा भवभीतिहरा स्वामी षड्रिपुदहना
विश्वजीवना अचल विमल हे निरंजना अगुणा ३
परमेशा खलदमना साक्षी शास्ता तूं सकलां
गुरुवर अज अजिता देवा बघ नमोस्तुते तुजला ४

# अनुभूति

( १ )

प्रारब्धाची माळ जन्मचक्रावरी
फिरतां तुटली अकस्मात १
तेणें देहपट भंगोनिया गेला
जीव हा मुकला बंधनासी २
रहाटाचा मोगा फुटतां सुटका
नाहीं तरी झोका वारंवार ३
अडकलों होतों परि झालों मुक्त
कांहींसें सुकृत होतें गांठीं ४
राम म्हणे फेरा चुकला निश्चळ
जाहलों, सकळ क्लेष गेले ५

( २ )

आधीं होतों जड-बुद्धी । गुरुकृपें झाली शुद्धि १
होतों अज्ञानीं निद्रित । विषय-स्वप्नातें भोगीत २
सकळ निरसला भ्रम । चित्त पावलें विराम ३
शंका-पटल दूर झालें । ज्ञान-बिंब उदया आलें ४
राम म्हणे त्रिगुणातीत । कळलें ब्रम्ह मी अनंत ५

( ३ )

गुरुकृपें आजि अनुग्रह झाला
संदेह फिटला मूळींहुनी १
मूळींहुनी आजी निरसली भ्रांती
आत्मरूपज्योती उजळली २

उजळली दीप्ति पडला प्रकाश
जहालासे नाश अज्ञानाचा ३
अज्ञानाचा भ्रम निरसोनी गेला
उदय पावला ज्ञानरवी ४
ज्ञानरवि हृदीं पूर्ण पुंजाळला
राम आज झाला आनंदित ५

(४)

पंचप्राणाचीया घातली आहुती
ज्ञान-यज्ञ-ज्योती उजळली १
संकल्प विकल्प जाळीले समूळ
मांडीलें निर्मळ ब्रम्हकर्म २
भगवन्नाममंत्र केला असे सिद्ध
महावाक्य बोध सद्‌गुरुचा ३
राम म्हणे आजि योग संपादिला
पूर्ण तृप्त केला नारायण ४

(५)

बीज श्रद्धेचें पेरिलें । ज्ञानकणस त्यासी आलें १
आजि पिकला चित्तमळा । झाला आनंद आगळा २
शुद्ध अनुभवाचा दाणा । वेंचियला चढे गुणा ३
केले सफल झाले श्रम । तेणें संतोषला राम ४

( ६ )

असें एकदां मी मेलों । मागुतेनी जन्मा आलों १
जन्म झाला कवणे परी । ऐका सांगें मात वरी २
आलों अनुभवाच्या कुशीं । जन्मकथा आहे ऐसी ३
जन्मलों मी वृद्ध-बाळ । ऐका नवल सकळ ४
राम म्हणे जन्मवृत्त । ऐसें माझें हें अद्‌भुत ५

( ७ )

कधीं नव्हतोंच मी मेलों । मग कैंचा जन्मा आलों १
मज नाहीं नाम रूप । मग कैंचा माया-लेप २
मज नव्हतेंची बंधन । मुक्त, भाषा हें अज्ञान ३
रामीं अनुभवाचा ठसा । जाई पुसोनी तो कसा ४

( ८ )

कोण ऐसें नातें राहीयलें आतां
कासया इच्छितां स्नेह माझा १
व्यर्थ जीवा कष्ट कासया संताप
नका अनुताप होऊं देऊं २
तुटला संबंध जाहलों वेगळा
व्यर्थ कर गळां घालू नका ३
राम मेला झाला जीवन्मुक्त आजि
संदेह या माजी नाहीं नाहीं ४

(९)

जाहला विवेक मावळली भ्रांती
चित्तीं ज्ञान-ज्योती प्रकाशली १
भू भुवर् स्वर्गादि दिव्य हें त्रैलोक्य
देखें सकळीक पिंडामाजी २
लागली उन्मनी नाहीं देह-भान
गेलोंसें विरुन आत्मरूपीं ३
राम म्हणे विश्वीं एक विश्वंभर
तो मज विचार कळों आला ४

(१०)

हृदयाकाशींचा तारा उगवला
वेध हा लागला जीवा तेथ १
ताठले नयन पहाताती दोन्ही
प्रकाश यामिनीमाजी पडे २
जाहलें उन्मन लागली समाधि
लोपली हे बुद्धि जाणीवेची ३
राम म्हणे तेथ मौनावली वाणी
कारण निदानीं लुप्त झालें ४

(११)

मज नसे कांहीं कुळ गोत याती
अभेद मी मूर्ति ब्रम्हरूप १

(१६)

ऐका हो कामिक संगम येथींचा
आत्मैक्य रतीचा भोग कैसा १
नाथ कैसा माझा मी हा भोगियेला
विचित्र ते लीला आईकावी २
समाधीचे भोग-मंदिरीं पर्यंक
मांडिला सुरेख प्रेमाचा या ३
जीव-रूप माया शिव-रूप ब्रम्ह
त्यावरती काम-चेष्टा करूं ४
एक एक बंध घालोनी आसनें
उभय भोगूं तेणें रति-सुख ५
विपरीत निधूवन-क्रीडा केली
ब्रम्ह-माया झालीं स्थिर दोन्ही ६
काय कामी-जना लाभेल हें सुख
येथींचा हरिख योगीयांसी ७
राम म्हणे मज लाभला हा योग
जाहला संयोग आत्मरूपीं ८

(१७)

सपला व्यापार वृत्ति झाली अंतर्मुख
उपाधि ते नाहीं काहीं विषय सुखदुःख १
प्रसाद स्वामीचा सुकृतें आजि लाभला

अक्षय समाधि माझा जीव पावला २
मावळल्या ऊर्मी मन हें झालें उन्मन
कार्यचि संपलें तेथें कैचें कारण ३
प्रकाश ना अंधार पूर्ण शान्तीचें स्थान
शान्त शान्त काय म्हणूं वाचे बोलवेन ४
राम घे आराम रुपीं नाहीं संकोच
आनंदें डोलतो नाचतो स्वच्छंदें साच ५

(१८)

शुद्ध ब्रम्हरसीं घडिला पुतळा
देखियेला डोळां तो म्यां आजि १
लागलीसे मुद्रा पूर्ण आगोचरी
न ये चराचरीं परतोनी २
गेलें देहभान मावळली भ्रान्ती
येथिंची हे स्थिति अनुपम ३
लागली सामाधि जाहलें उन्मन
झांकले नयन आपें आप ४
राम म्हणे झालें उघडलें द्वार
दृश्य हा आकार मावळला ५

# तत्वविवेक

( १ )

जेव्हां गळेल जाणीव । तेव्हां ठायीं पडे देव १
दृश्य हारपोनी जाय । तरीच आत्मलाभ होय २
मागें परतोनी जावें । हृदयस्थासी भेटावें ३
कवच फोडोनिया गीर । लाभे नारळींचें सार ४
दूर सारितां आदर्श । होय प्रतिबिंबाचा नाश ५
पहावें आपआपणातें । सोडोनिया आभासातें ६
राम म्हणे अंतर्मुख । व्हावें भोगावें तें सूख ७

( २ )

मूळ एक निराकार । तेथें मायेचा विस्तार १
प्रश्न उद्भवला गूढ । बुद्धी झाली तेथें मूढ २
जेथ आकार हा नाहीं । तेथ गुण कैंचा येई ३
काहीं नाहीं तेंची आहे । आहे म्हणतां वस्तु नोहे ४
पहातां विवेकें आभास । अविवेकें सत्य भास ५
ब्रह्मीं संभवे ही माया । जैसें अंग आणि छाया ६
ज्योत ज्योतीचा प्रकाश । ब्रह्म-मायेचा सहवास ७
ऐसा आहे अंगभूत । सत्य मिथ्या दोन्ही होत ८
नाद नादाचें स्पंदन । तीव्रतेचें तीव्रपण ९
तैसा येथें सूक्ष्म भेद । शब्दें वाढलासे शब्द १०
राम म्हणे मूळ एक । भेद तेथुनी अनेक ११

( ३ )

ऐसीच हे विश्वस्थिति । पालटेना हो कल्पांतीं १
विधिनिषेध हा मना । म्हणुनी कांहींच न आणा २
मूळिच उपजलें द्वैत । कैसें गमेल अद्वैत ३
नाम-रूपाचा आरसा । तेथ प्रतिबिंबाचा ठसा ४
कितीक ब्रम्हांड शोधावें । पुन्हा तेंच तें पहावें ५
म्हणुनी पिंडींच्या अभिनवा । राम म्हणे अनुभवा ६

(४)

जाणा बीजरूप शक्ति । विश्वीं ब्रम्हाची वसति १
जैसा तेजरूप अग्नि । तैसें ब्रम्ह आहे जनीं २
द्रवरूप जैसें वारि । ब्रम्ह जगाचे माझारीं ३
ब्रम्ह कोंदलेंसे सर्व । व्याप्त चैतन्यें हें विश्व ४
जड गमे तितुकें फोल । नामरूपाचा आकार ५
रामहृदयस्थ ज्योती । तेची ब्रम्हाचीया मूर्ति ६

(५)

आधीं होता मुक्त पावला बंधन
पडलें वेष्टन अविद्येचें १
अविद्येच्यायोगें विसरला मूळ
करी तळमळ सुखदु:खें २
सुखदु:खें फार अंतरीं जाचला
तेणें हेलावला अभिमानें ३

अभिमानें डोले तारुण्याच्या भरीं
जाहला संसारीं एकरूप ४

एकरूप झाला नेणें 'कोण मी' हें
ग्रासिलासे मोहें व्याळरूपें ५

व्याळरूपकाळ घेवोनी चालला
प्रपंच राहिला अवघा ठाई ६

पाप पुण्य भोगी केलें जें क्रियमाण
व्यथा ते दारुण सोसवेना ७

सोसवेना ऐसा लागलासे घोर
फिरों लागे फेर चौऱ्याऐशीं ८

चौऱ्याऐशीं लक्ष योनि हा आभास
पावतां पदास मुक्त पुन्हा ९

मुक्त पुन्हा राम न येई मागुती
ज्योतीमाजी ज्योती सामावली १०

(६)

बीज आलें मूळींहुनी । वृक्ष वाढला तेथोनी १
शाखा-पल्लव विस्तार । किती दाटला हा थोर २
ज्ञानी म्हणती माया-भास । बीज-वृक्ष हा आभास ३
कार्य – कारणावेगळें । आहे ब्रम्ह तें सोवळें ४
गुरु कृपें म्हणे राम । मज कळों आलें वर्म ५

( ७ )

व्यक्ताव्यक्त दोन्ही म्हणो येना वाचे
बोल हे द्वैताचे वाटताती १
निष्कलंक ब्रम्ह वर्णवेना वाणी
तेंच तें होवोनी अनुभवावें २
बोलली पुराणें आपुलालें मत
वेदहि समस्त वाखाणिती ३
राम म्हणे परी शोध हा लावितां
त्यांत यथार्थता फार थोडी ४

( ८ )

परमाणुहुनी सान । उरलें ब्रम्हांडीं भरून १
जें जें असें सर्व कांहीं । तें तें ब्रम्हरूप पाहीं २
नाहीं ऐसें कदा नोहे । अणु अणुमाजी राहे ३
दोन्ही स्थावर जंगम । अवघें चराचर ब्रह्म ४
दृश्यादृश्य जें जें झालें । ब्रह्मरसें ओतियेलें ५
राम म्हणे नाहीं नाहीं । विश्वीं ब्रह्मावीण कांहीं ६

( ९ )

नाहीं कोणीहि बांधिलें । मायाबद्ध चित्त झालें १
आत्मा संबंधी तयाचा । तेणें पाश त्या भवाचा २
एरवीं तो निष्कलंक । शुद्ध बुद्ध नित्य एक ३
जो जो रंग जवळी ठेवा । तो तो स्फटिका अंगीं घ्यावा ४

राम म्हणे संप्रर्गानें । तया वाटती बंधनें ५

(१०)

चहूं देहाचें बंधन । माजी सांपडला प्राण १
प्राण झाला स्वाभिमानी । ज्ञानी असोनी अज्ञानी २
देह-प्राणाचा संगम । साक्षीभूत आत्माराम ३
विणा तार यांचा मेळ । नाद त्याहूनी निर्मळ ४
नाद आकाशीं निघाला । तेथें विरोनिया गेला ५
देह प्राणाचिया संगें । चाले बोले बहुत रंगे ६
त्यासी प्रेरक वेगळा- । आहे जाणे तो आगळा ७
पुरुष - प्रकृति संयोग । जन्म मरण त्याग भोग ८
खेळ मायेचा चालला । वाटे आत्मा बद्ध झाला ९
दोहोंपासोनी वेगळा । साक्षी ईश्वर मोकळा १०
राम लागे सद्गुरुपायीं । मग आत्मरूप होई ११

(११)

देव नाहीं सांगा कोठें । व्यर्थ जातां आडवाटे १
पहा उघडोनी नेत्र । आत्म स्वरूप पवित्र २
आंत अथवा बाहेर । नाहीं सन्निध वा दूर २
चराचरीं ठायीं ठायीं । तेंचि भरलें अंतर्बाह्यीं ४
नसे रिता ठाव एक । एक आणि तें अनेक ५
जेथ तेथ सांठवलें । तुझे ठाईं सामावलें ६
साह्य नलगेचि कोणाचें । तेंच आहे पूर्ण तुझें ७

तूं मी व्यर्थ द्वैत-भाव । तेणें अंतरला देव ८
हृदयीं झांकलें माणिक । जाण आपुल्याची देख ९
पहावया दिव्य ज्योती । काय आणिसे हे वाती १०
घ्याया रवीचें दर्शन । काय लागे निरांजन ११
जें कीं हालतें स्पंदन । हालवितें रात्रंदिन १२
जईं जुळुनी गेल्या तारा । नाद निघे झणत्कारा १३
नित्य हृदयीं आत्मज्योती । आहे योगी ते जाणती १४
अहं ब्रह्म हा उच्चार । हेंचि अनुभवाचें सार १५
राम अग्नीचा स्फुल्लिग । संग होतां तेंची अंग १६

(१२)

सुख दुःख दोन्ही चित्त संवेदना
मानीव या मना होती जाती १
तयांपासोनियां अलिप्त आपण
शान्तरूप भिन्न वेगळाले २
नाचतो बाहुलीं चित्रपटावरी
लेप तया परि काहीं नसे ३
राम म्हणे आम्ही तैसे शांतरूप
अनाम अरूप नित्य आहों ४

(१३)

संग घडे दोघां तरीच उत्पत्ति
एणेंच संतति प्राणी यांसी १

नाद एकावरी एक आपटितां
इंधन घासितां अग्नि जैसा २

आधीं एकासाठीं जन्मा आलें एक
एकाचे अनेक झाले मग ३

परि एक मूळ कैसें उपजलें
नाहीं सांगितलें कोणी एकें ४

राम म्हणे एक अनेक हा भास
सर्व श्रुति यास माया म्हणे ५

---

# विविधविचार

( १ )

सहज भाषणीं हृदयाचे बोल
कळती जे खोल रहाती ते १
उघडोनी दावी काव्य तें भांडार
आंतील विचार मूक वृत्ति २
रसिकां तें फार आवडे म्हणोनी
काव्यमोद गुणी-जन घेती ३
दावी प्रेम-द्वेष, हास्य रेखाटोनी
उठती ज्या मनीं नाना वृत्ति ४
द्वैत मायाभ्रम दूर करी काव्य
प्रकाशवी दिव्य आत्मस्फूर्ति ५
काव्यरूप दास रामाचें अंतर
वाणी ही मधुर तेंच बोले ६

( २ )

आलें विवेकासी फळ । ज्ञान अमृत सोज्वळ १
जेणें चाखिली ते गोडी । समाधानीं त्या आवडी २
मधुप मकरंदासी लुब्ध । आणिकाचे ठाईं क्षुब्ध ३
राम रंगला आनंदीं । कारण हें चित्तशुद्धि ४

( ३ )

अहो वाटे ज्यास जैसें । तें तो आचरील तैसें १
बरवें सांगतां उमजेना । चित्तीं वसे अहंपणा २

मग कासया हे वाणी । व्यर्थ शिणवावी बोलोनी ३
निज कर्मा ऐसें फळ । राम म्हणे तो भोगील ४

(४)

आशा नाव हे मोडकी । मोह नावाडी ते हांकी १
लाटा भव-सिंधुवरी । येती संकल्पाच्या भारी २
लोभ-मारुत हा वाहे । काम-शीड फडकत आहे ३
शब्द, स्पर्श, रूप, रस । मध्यें फिरते मीन-रास ४
दैव सुकाणूं हें त्यासी । जीव बैसला प्रवासी ५
राम म्हणे काय गति । सांग होईल श्रीपति ६

(५)

मधुप वासाचिये ठाईं । लुब्ध होवोनियां राही १
तैसें पाहोनी सद्गुण । तेथें वसे शुद्ध मन २
बैसे मक्षिका ते घाणीं । कदा जाईना सोडोनी ३
तैसें विषयीं तें दुश्चित । भुले देखोनीयां स्वार्थ ४
जैसी जयाची आवडी । तैसी तया लागीं गोडी ५
राम म्हणे जवळी केला । जया जो गुण वाहिला ६

(६)

विश्व-चित्रपट नाचवी तो हरी
कळा सूत्र दोरी त्याचे हातीं १
जारज स्वेदज अंडज उभ्दिज्ज
निर्मितो सहज लीला मात्रें २

दृश्य अदृश्य या सर्व जीवयोनी
चालवी कल्पुनी खेळ खेळे ३
लालन पालन करी इच्छायोगें
त्रिगुणाचे संगें भोग भोगी ४
एक सूत्र माया घालोनी वेसण
करी आकर्षण स्वेच्छाबळें ५
उत्पत्ति ते स्थिति आणिक हा लय
चिद्विलास होय त्याचा सर्व ६
राम म्हणे अणु ब्रह्मांडाच्या कोटी
तोची जगजेठी घडी मोडी ७

( ७ )

साक्षीभूत हरि असतां अंतरीं
चालेल हे चोरी कैसी तेथ १
पाहतांहे परि न कळे अज्ञाना
जयाचीये मना भ्रांत झाली २
मोहाचिये पाशीं अडकला जीव
आचरे जें सर्व निषिद्ध तें ३
तेणें या यातना भोगी जन्मवरी
येऊनी संसारीं पुन्हःपुन्हा ४
लपवील जना कैसें नारायणा
सर्वांचिया मनामाजी जो कीं ५

प्राक्तनाचा भोग नियम ठरला
कर्म ज्याचें त्याला फळा येई ६
राम म्हणे सर्वां ठाउकें अंतरीं
विचार हा हरि जाब तेथें ७

( ८ )

वैराग्य हा वन्हि पेटतां हृदयीं
विकल्पाची लाही होय तेव्हां १
दग्ध करी सर्व जाळोनी वासना
न उरे कामना विषयांवरी २
नित्य दाह करी पडों नेदी चैन
तावूनिया मन निघे तेथें ३
राम म्हणे जगीं विरागी उदास
सोडूनीयां आस इच्छी शान्ति ४

(९)

कासया करावें हें शब्द-पांडित्य
जोंवरी हें चित्त शुद्ध नाहीं १
काय त्याचा असे सांगा उपयोग
जोंवरी संयोग विषयांसी २
जो नाहीं तरला आधीं आपणातें
काय दुजीयातें तारी मग ३
राम म्हणे व्यर्थ फुकाचे हे बोल

जेथें नाहीं ओल कर्तृत्वाची ४

(१०)

झोपीं गेला त्यासी करूं येई जागा
न होय जो उगा मिष करी १
बळेंच पांघरी जाणा जो अज्ञान
व्यर्थ शिकवण तयापुढें २
कपटी अंतरीं स्वयें अंग चोरी
मज वाटे बरी तया शिक्षा ३
राम म्हणे ऐशा चाबुकांचा मार
हाची वाटे थोर दिव्य मंत्र ४

(११)

मधुरा हे भक्ति देवा आवडती
गोपिकांची प्रीति सर्वोत्तम १
सर्वोत्तम भाव निष्ठावंत पदीं
सांठविली हृदीं कृष्णमूर्ति २
कृष्णमूर्ति सदा आणोनियां ध्यानीं
आचरती जनीं पुण्यकर्म ३
पुण्यकर्म गांठीं बांधिलें सबळ
पावल्या गोकुळ म्हणोनियां ४
म्हणोनिया जन्म सुखमय झाला
विसावा घेतला कृष्णरूपीं ५

कृष्णरूप पापें कृष्णरूप केलें
संकल्प पळाले कर्म दोष ६
कर्मदोष सत्वगुणीं उरले शेष
भोगिती विशेष सौख्य तेणें ७
सौख्य तेणें हरि-अंग-संगें झालें
अंतरीं दाटले अष्टभाव ८
अष्टभाव रोम राहिलेती उभे
तेणें काया शोभे गोपिकांचीं ८
गोपिकांची वृत्ति झाली तदाकार
नेत्रीं वाहे नीर प्रेमपूत १०
प्रेमपूत भाव उपजला अंगीं
राहिल्या श्रीरंगीं नित्य स्थित ११
नित्य स्थित कधीं न ढळती रती
होत आहे स्फूर्ति आनंदाची १२
आनंदाची ऊर्मी दाटलासे कंठ
जाहल्या उत्कंठ कृष्ण पदीं १३
कृष्णपदीं लीन घेतली समाधि
पूर्ण केला विधि दास रामें १४

(१२)

सत्य तेथें भगवंत । ऐसें बोललेती संत १
दंभ अनृताचा सांठा । तेथें देवालागीं तोटा २

सत्यरूप नारायण । वेद बोलती हें जाण ३
सत्य कृति सत्य बोल । चित्तीं सत्याची हे ओल ४
राम म्हणे तिष्ठे हरि । सत्यवादीयाचे घरीं ५

(१३)

म्हणति हक्क द्या आम्हासी । नको कर्तव्य कोणासी १
पुत्र म्हणे पितयाला । "कांहो कळत नाहीं मला? २
सरुनी गेला बाळपणा । आतां माझा मी शहाणा" ३
धनि आणि हा सेवक । नातें नुरलें, सर्व एक ४
स्त्रिया त्याहि पुरुषांप्रति । "आम्ही समान" बोलती ५
"तुम्हा हातीं चूल मुल" । म्हणती पुरुषहि बेताल ६
ऐसें लागलें भांडण । दोघां नाहीं समाधान ७
तेणें वाढला मत्सर । आणि असंतोष फार ८
राम म्हणे या कारण । कर्तव्याचें विस्मरण ९

(१४)

गुण तेथें अवगुण । दोन्ही असती हे लिपुन १
ज्योती दीपाची तेजाळ । तिजपासोनी काजळ २
सूर्य-किरणाचे पासोनी । ताप-प्रकाश हे दोन्ही ३
रम्यपुष्प गुलाबाचें । अंगीं कंटक तयाचे ४
राम म्हणे ऐसी गोष्टी । जगा वसती द्वैतापोटीं ५

(१५)

सरुनी गेलें बालपण । अंगीं पातलें तारुण्य १

विसरला माता-पिता । पंचप्राण म्हणे कांता २
बोलूं लागे प्रेमगोष्टी । प्रेम ओठीं प्रेम पोटीं ३
प्रेमकथा प्रेमगीत । प्रेमलेख वाची नित्य ४
प्रेमें बोले प्रेमें हाले । प्रेमें चाले प्रेमें डोले ५
विषय-प्रेमाचें फेंपरें । भरलें अंगीं त्याचें वारें ६
याच्या प्रेमा वसतिस्थान । सुंदरीचे गोल स्तन ७
याच्या प्रेमाचें जें मूळ । रम्य तरुणी मुखमंडळ ८
मूर्ख मोहालागीं प्रेम । देतो गोंडस हें नाम १०
राम म्हणे प्रेमकळा । काय ठाउकी या मळा ११

(१६)

होई क्षणैक उदास । पुन्हा विषयांचा ध्यास १
जईं देखे डोळां प्रेत । तईं उदासीन चित्त २
पुन्हा मानी चिरंजीव । सत्य वाटे मिथ्या भाव ३
ऐसे जगीं मूर्ख नर । क्षणें कंजुष उदार ४
राम म्हणे एक क्षण । स्थिर नसे त्यांचें मन ५

(१७)

अनुभव कोणा येईल बोलतां
प्रत्ययास येतां कळे मग १
साखरेची गोडी अंब्याची माधुरी
चाखितांची, पुरी कळों येते २

कैसी काजूफळा चवी, सांगे कोण!
प्रत्यक्ष खाऊन अनुभवावी ३
वर्णितां या वाणी उपजेना रस
न होय मानस तृप्त तेणें ४
राम म्हणे व्हावें प्रत्यक्ष तें ज्ञान
तरीच समाधान होत असे ५

(१८)

शुद्ध बुद्ध आत्मा ओळखीना जीव
मायिक हा भाव मानी सत्य १
मानी सत्य सारा लौकिक पसारा
करीना विचारा कोणे काळीं २
कोणे काळीं सुख कोणे काळीं दुःख
भोगी नित्य एक नाहीं स्थिति ३
नाहीं स्थिति सम त्रिगुणें वाढला
आधीन या झाला काम क्रोधां ४
काम-क्रोधां नाहीं पार, अनावर-
इंद्रियें समग्र, बद्ध झाला ५
बद्ध झाला जीव फिरेना माघारीं
शोधीना अंतरीं आपुलें तें ६
आपुलें तें हित विसरोनी गेला
अंतकाळीं झाला कासावीस ७

कासावीस राम पाहोनी पुढील
दुःख हें अपार होय जीवा ८

(१९)

प्रारब्धेंची घडे सुख दुःख भोग
रहावें असंग त्यापासोनी १
चित्तशान्ति ढळों न द्यावी ते कदा
भोगितां आपदा वैभवासी २
कधीं राज्यपद कधीं ये विपत्ति
कधीं कीर्ति कधीं अपमान ३
राम म्हणे दैवें होताहे सकळ
आपण गोपाळ आठवावा ४

(२०)

जवळी असतां धनाचें गांठोळें
भोंवतालीं मिळे बंधुवर्ग १
प्रिया, पुत्र, मित्र मेळती पाहुणे
आणिक मेहुणे काका मामा २
तोंवरी सकळ बोलतील गोड
जोंवरी हें कोड पुरताहे ३
देतील हा मान गातील ते स्तुति
अवघे नाचती पुढें पुढें ४
मृदंगासी पीठ लावितां दे नाद

मधुर ते शब्द काढों लागे ५
तैशापरि जी जी करिती सकळ
राम म्हणे बळ संपत्तीचें ६

(२१)

गुणधर्म ज्याचे भिन्न परस्पर
नांदेना एकत्र सख्य तेथें १
अंधार प्रकाश वेगळाले दोन्ही
वैर सदा अग्नि-पाणी यांचें २
स्वभाव समान तेच होती एक
तेथेंचि तें सुख नांदों लागे ३
राम म्हणे एक असावी ते याती
तरीच ते होती मित्र दोघे ४

(२२)

अंगीं चढे मद जेणें तें व्यसन
दु:खासी कारण होय अंतीं १
छंद लागे ज्याचा आस वाढे नवी
अधिकाधिक व्हावी प्राप्ति वाटे २
न सुटे त्यागितां करीतसे जोर
जेथें हा विचार होय पंगु ३
दास राम बोले तयाचें लक्षण
जयातें व्यसन म्हणती सूज्ञ ४

(२३)

कैसें म्हणो कोणा उत्तम वाईट
वसे एक पेठ सारखीच १
एक गुण एक दोष वसे अंगीं
निर्दोष या जगीं सांपडेना २
विकारेंची घडे नामरूप माया
निवड ते ठाया कैसी करों ३
राम म्हणे एका माळेंतील मणी
उच्च नीच दोन्ही म्हणों नये ४

(२४)

सत्ता तेथें मान वांकविती सर्व
न चाले हा गर्व थोरांपासीं १
पहाया धजेना कोणीही रवीतें
शीतळ चंद्रातें वेडाविती २
"म्हणती चांदोबा कारे लपलासी
रुसोनी बैससीं वृक्षातळी" ३
पाहोनी भुजंगा पळताती दूर
तेच देती मार सरटालागीं ४
राम म्हणे ऐसी जगाची हे रीत
नम्र होती जेथ सत्ताबळ ५

(२५)

देवोनीया कोणा काय देतां येतें
भाग्य लागे तेथें भोगावया १
स्वकष्टानें ज्यानें मेळविलें नाहीं
उसनें न राही तयापाशीं २
चाळणींत पाणी ओतलें बहुत
न राहेची तेथ थेंब एक ३
राम म्हणे दैव जयाचें फाटकें
देतां काय टिके तेथ सांगा

(२६)

खोल तेथें वाहे ओघ पाणीयाचा
नियम जगाचा हाची असे १
प्रेम तेथें मन घेत असे धाव
पूज्य तेथें भाव राहे सदा २
बलवंतापाशीं राहताती लीन
धनवंता मान नित्य देती ३
राम म्हणे साधु आगळा या जनीं
समता हे मनीं राहे ज्याच्या ४

(२७)

आधीं प्राप्त आहे भोगणें हें दुःख
मग येतें सुख हातालागीं १

आधीं हालाहल सागर मंथितां
लाभ हा मागुता अमृताचा २
सोसावे ते कष्ट आधीं नऊमास
तों पडे दृष्टीस पुत्र-मुख ३
मार्ग-क्रमणाचे आधीं होती श्रम
इच्छा-स्थळ राम म्हणे मग ४

(२८)

जैसी ज्याची उपासना । तैसा पावे देवराणा १
धरी अनंत वेषातें । भुले देखोनी भक्तीतें २
अवघ्या नटलासे विभूति । एक रसिका कुंभाकृति ३
जैसा काम ज्या हृदयीं । तैसा प्रगटे त्या ठाईं ४
करितां साधन स्मशानीं । पावे वेताळ होवोनी ५
करितां यज्ञ याग क्रिया । पुण्य लोका नेई तया ६
करिता मंत्र तंत्र विधी । प्रगट होऊनी दे सिद्धी ७
भजनीं निष्कामें रंगला । त्याचा जीवलग झाला ८
जैसें पहातां दर्पणीं । दिसे प्रतिबिंब लोचनीं ९
राम म्हण तैसा हरी । भावें नाना वेष धरी १०

(२९)

माळ संचिताची गुंतलासे जीव
भोगीतसे सर्व भोग-कर्म १
भोग-कर्म पायीं अडकली बेडी

कोण कैसी सोडी सोडवेना २
सोडवेना घट गुंतला रहाटीं
फिरे लक्ष कोटी नित्य फेरे ३
नित्य फेरे घेई फुटेना जोंवरी
कोण मुक्त करी कैसा त्यातें ४
कैसा त्यासी सुटे झोंक त्या माळेचा
तैसाची जीवाचा कर्मबंध ५
देह अभिमान सुटेना जोंवरी
नाहींच तोंवरी मुक्ति तया ६
तयासी प्रारब्ध संचित क्रियमाण
करवी भ्रमण वेळोवेळां ७
राम म्हणे न्याय सांगीतला ऐसा
चुकला तो दिशा भोंवतसे ८

(३०)

पूर्व जन्मीं बीज पेरिलें कर्माचें
भोगणें तयाचें भागा आलें १
कर्मबीजापोटीं सुखदुःख फळें
कडू हीं रसाळें प्राप्त झालीं २
प्रारब्धाचा वृक्ष वाढवीला थोर
जाहला विस्तार वाढों लागे ३
घालोनी तृष्णेचें जीवन तयासी

पोसिला भरासी आणियेला ४
राम म्हणे कदा सुटेना फिटेना
भोगीयल्याविना कर्मभोग ५

(३१)

कोण झाला पूर्ण अंगें । न्यून आहे सकळांसंगें १
सूर्य देतसे प्रकाश । ताप तैसाची विशेष २
दीप अंधारा उजळी । तोच वसे तया तळीं ३
हिरा तेजाचा ओतिला । नाहीं काठिण्या मुकला ४
ज्योत कापुरा पाजळी । पाडी सवें कीं काजळी ५
राम म्हणे एक ज्ञानी । पूर्ण पाहियेला जनीं ६

(३२)

विकासलें पुष्प पसरला वास
भ्रमर मार्गास धांवती त्या १
वाहूं लागे झरा आक्रमितो पंथ
तृषित ते तेथें धांव घेती २
फुले वृक्ष भारें लवे फळांचेनी
तेथ ते धावुनी पक्षी येती ३
सहज ज्ञानकळा लागतसे हाता
गुरुकृपा होतां वेळ नाहीं ४
सांगता योगाची होतां अष्टसिद्धी
आपोआप पदीं लागतील ५

राम म्हणे होतां शुद्धि या जीवाची
साम्यता ब्रह्माची सहज येई ६

(३३)

प्रेम मृदु कीं कठोर । प्रेम देव कीं असुर १
प्रेम गुलाब कीं कांटा । प्रेम स्थिर किंवा लाटा २
प्रेम रत्न कीं इंगळ । प्रेम अशुची कीं मंगळ ३
प्रेम बंध किंवा मुक्ति । प्रेम अव्यक्त कीं मूर्ति ४
प्रेम चांगलें कीं दुष्ट । कैसें प्रेम सांगा स्पष्ट ५
प्रेम विष कीं अमृत । प्रेम असत्य कीं सत्य ६
जीवा आकर्षितें प्रेम । कांहीं असो त्याचा धर्म ७
होईल तें होवो पुढें । राम प्रेमापायीं जडे ८

(३४)

कोण स्वार्थावरी सोडोनीया पाणी
विश्व-चिंता मनीं बाळगील १

कोण ओवाळणी करी सर्वस्वाची
दुःखें दुःखितांचीं हरावया २

कोण पाठमोरा होईल सुखासी
कोण देह घांसी लोककार्यी ३

सांगा मज कोण पुढें सरे ऐसा
वाटे भरवंसा ज्याचा सर्वां ४

(३५)

कोण वाचाळता देईल टाकोनी
मार्ग आचरणीं दाखवील १
दाखवील वाट नेवोनी प्रत्यक्ष
अनुभवा साक्ष ठेवीच ना २
ठेवीच ना शंका फेडील संशय
दाखवील सोय धरूनी हातीं ३
हातीं ठेवी फळ दाखवीना चित्र
चाखितां पवित्र कळे रुची ४
कळे मग नको सांगावया कोण
प्रत्यक्षा प्रमाण काय लागे ५
काय लागे रामा अन्य हा आधार
हृदयीं ईश्वर कोंडियेला ६

(३६)

योगियां स्वाधीन इन्द्रियें असती
सहज करीती कर्मे नित्य १
कर्मे नित्य त्यांसी न होती बाधक
तेणें सुखदुःख सारिखें त्यां २
सारिखें त्यां जनीं सारिखें त्यां वनीं
नित्य नारायणीं रंगले जे ३
रंगले ते झाले राम म्हणे पूर्ण

नाहीं त्यां मरण जन्म पुन्हा ४

(३७)

सुख आहे आम्हा हातीं । आम्हीं लागों पळत्यापाठीं १
बुद्धिभेद दुःखा मूळ । अहंकार त्याचें कुळ २
स्वार्थी गुंगलें हें चित्त । जीव जाहला उन्मत्त ३
दोन दिवसांचें जिणें । कां रे शोधा अधिक उणें ४
हांसूं खेळूं नांदूं जगीं । भाग्यवान स्वर्ग भोगी ५
राम म्हणे रागद्वेष । होय टाकितां संतोष ६

(३८)

जगा आणि मज कांहीं नसे नातें
मीच माझ्या मतें चालतसें १
कारण मजसी लागलें हो वेड
चाखीतसें गोड आत्मसुख २
आप्त इष्ट माझे मज विसरले
बंधन तुटलें सकळही ३
राम म्हणे नाहीं संबंध राहिला
मी असें वेगळा जगामाजी ४

(३९)

जीवें भावें देवा अर्पिलें हें सर्व
टाकुनीयां गर्व संत झालों १
संतपद हाता गुरुकृपें आलें

श्रमें मेळविलें थोरपण २
नाहीं फुकाफुकी दिला कोणी मान
करोनियां शीण मेळवीला ३
जन हो तुमचे मज नको आभार
न लगती उपकार कोणाचेही ४
सकळ या जगा आहे ओळखोनी
व्यर्थ कांहीं कोणी देत नाहीं ५
सकळांसी यत्नें लागे मेळवावें
कृतज्ञ रहावें कोणी कोणा ६
राम म्हणे तुम्हा नाहीं धिक्कारीत
कळविलें सत्य तेंची परि ७

(४०)

साधूंची ते मूर्त शांतीची ओतिली
कदा न पाहिली क्षुब्ध वृत्ति १
सुख दुःख दोन्ही मानिती समान
मान अपमान निंदा स्तुति २
केले उपकार बोलती न मुखें
पराच्या दुःखें कष्टी होती ३
तयांवरी कोणी केले अपकार
तरी न उच्चार करिती त्याचा ४
राम म्हणे इच्छी सर्वांचें कल्याण

साधूंचें लक्षण ऐसें आहे ५

(४१)

साधूंचिया पोटीं काम वसे एक
जगा आत्मसुख प्राप्त व्हावें १
कोप सज्जनांचा जाळीतो वासना
श्रीहरिचरणापाशीं लोभ २
तयांलागीं मोह पडे सद्‌गुणांचा
अहंकार त्यांचा विश्वदास ३
मत्सर कीर्तीचा करिताती नित्य
राम म्हणे भक्त भेद त्यांचा ४

(४२)

कमलपुष्पाची नाहीं त्या आवडी
मकरंदीं गोडी भ्रमरातें १
आवडे तारुण्य कामीजनांप्रति
प्रियेवरी प्रीति नसेचि ते २
स्वार्थसाधु मैत्री करी स्वार्थासाठीं
मित्र-प्रेम पोटीं नसे लेश ३
पहाती आपुलें सुख म्हणे राम
ऐसे अधमाधम वसती जगीं ४

(२३)

विषयसागर मंथितां । आली निराशा हे हाता १

जीवा झाले फार श्रम । सुख तेथींचें हा भ्रम २
मेघ आकाशींचे आले । झंजावातें दूर झाले ३
तैसा मोद क्षणभरी । आली सुखाची लहरी ४
तेणें संतोषलें मन । गेलें विषयीं रंगून ५
काळ तों तेथें पातला । दूर घेवोनी चालला ६
तृप्त नाहीं झाला जीव । दुःखरूप म्हणुनी भव ७
राम म्हणे आशाभंग । येथ ठेविला अभंग ८

(४०)

वाटेवरी आलों सोडीलें मागील
टाकीलें पाऊल न घे पुन्हा १
जाहलों निःसंग चाललों पुढती
मज नाहीं खंती आतां कांहीं २
कोण बळी हात धरोनी ओढील
माझा तो गोपाळ पाठीराखा ३
न भियें मी कोणा गांठीन इच्छित
जाहलें निश्चित हेंच माझें ४
राम म्हणे आजि ठरवीला हेत
कांहीं नसे येथ संशयो हा ५

# अपेक्षा

( १ )

प्रेममय माझें मन मीहि प्रेम
माझें रूप नाम तेंहि प्रेम १
करोनीयां रस प्रेमाचा ओतिला
घडविता झाला विधी मज २
अंतर्बाह्य सत्य प्रेमाची मी मूर्त
प्रेम माझें मत प्रेम बोल ३
आवडी हे माझी एका प्रेमापाशीं
अंतर्बाह्य देशीं प्रेम माझ्या ४
राम म्हणे भोक्ता कोण या प्रेमाचा
आहे सर्वस्वाचा माझ्या धनी ५

( २ )

मज नाहीं गोडी विषय-प्रीतीची
निष्काम प्रेमाची चाड मना १
निर्लोभ हें प्रेम सांपडेल काई
छंद हा हृदयीं एक त्याचा २
हिंडलों हें जग शोधिलें बहुत
परि जेथ तेथ फजित झालों ३
निराशा वैरीण सोडीना हे पाठ
न पडेच गांठ ऐशा प्रेमा ४
राम म्हणे कधीं लाभेल कळेना

तयावीण मना शान्ति नसे ५

( ३ )

आतां करणें नको खंति । धरिला विश्वास भगवंतीं १
भक्ति नौकेंत बैसलों । आदि प्रवासा चाललों २
कर्णधार सद्गुरुराणा । आतां भय नाहीं मना ३
उसळो हा भवसिंधु । आहे तारिता दिनबंधु ४
धडको संकल्पाच्या उर्मी । चित्त स्थिर आहे नामीं ५
कैसी होईल हे बाधा । दृढ धरिले सद्गुरुपदा ६
निश्चयाचें फडके शीड । धैर्यें करितें फडफड ७
राम म्हणे पैल तीर । आतां गाठूं हें सत्वर ८

( ४ )

मजवरी कोप जाहला विश्वाचा
तरी मज त्याचा खेद नाहीं १
अहेतुक माझें करीन कर्तव्य
ठेवोनीयां भाव देवावरी २
झाले मित्र शत्रु जगें केला रोष
खंत या मनास नाहीं त्याची ३
फार काय पंचमहाभूतें जरी
कोपतील तरी नाहीं चिंता ४
आपुलें कर्तव्य कदा चुकों नये
राम म्हणे ठावें एक मज ५

(५)

कधीं हांसें खेळें कधीं रडें पडें
नित्य ऐसे वेडेचार करीं १
कधीं बाळ कधीं थोर संभावित
कधीं मुका मित फार बोलें २
कधीं धावें मंद टाकितों पाउलें
कधीं स्तब्ध हालें डोलें कधीं ३
अहो मित्र हांसाल का मजप्रति
पाहोनीयां कृति द्विधा माझी ४
सुखें हांसा तुम्ही वेडाच मी खरा
माझिया अंतरा कोण जाणे ५
राम म्हणे माझें जाणेल जो मन
मिळेल का कोण वेडा ऐसा ६

( ६ )

सकळ विश्वाचा मी असें सेवक
सेवाधर्म एक ठावा मज १
त्यांत सुख मना माझिया वाटतें
मजला नको तें स्वामीपण २
थोरपणें गर्व वाढतसे पोटीं
तेणें लागे पाठी दुःख मग ३
होय यश हानी लागतें लांछन

उन्मत्त हें मन झाल्यावरी ४
जाणोनी हें वर्म जाहलों पाईक
मी आज्ञाधारक सकळांचा ५
राम म्हणे जाणतसें सेवाकार्य
कळती हे पाय एक मज ६

( ७ )

मज नकळे आणिक । प्रेम एकची ठाउक १
प्रेमें सकळां बांधीन । असो सज्जन दुर्जन २
देव दानव मानव । करीन प्रेमें वश सर्व ३
प्रेमबंधन घालोनी । शत्रु आणीन बांधोनी ४
रामापाशीं प्रेमबळ । प्रेमें जिंकील सकळ ५

( ८ )

तोंडापुरतें भाषण । मज न साहे एक क्षण
कोणी केल्या अवमान । एक वेळ चालेल १
उघड उघड व्हावें मज । स्वाभाविक जें सहज
मना उगीच ते व्याज- । स्तुति कदा नावडे २
लाथा शत्रूच्या साहीन । नको दांभिकांचा मान
मज ऐसें साहवे न । आंत एक बाहेरी ३
राम म्हणे मी सरळ । मज आवडे निर्मळ
नको वरी जें उजळ । आंत हीण ओतिलें ४

# उत्कंठा

( १ )

नाथ माझा वाट पाही । थांबावया वेळ नाहीं १
आतां पुरे वेणी फणी । नको शृंगार साजणी २
जीव झाला उतावीळ । क्षण मोलाची हे वेळ ३
नाहीं सौंदर्या मोहिला । शुद्ध प्रेमाचा भुकेला ४
भेट घेईन एकांतीं । गुज बोलेन तें प्रीतीं ५
राम म्हणे अहो बाई । मज झाली असे घाई ६

( २ )

प्राणाचाहि प्राण श्रीहरी विसावा
आवडतो जीवा फार माझ्या १
न जावें सोडोनी दुरी एक क्षण
ऐसें इच्छि मन सर्व काळ २
नित्य अंग संग घडावा सुखाचा
लोभ हाची साचा एक वसे ३
राम म्हणे वाटे हृदय चिरोनी
ठेवावा भरोनी जीवलग ४

(३)

प्रिय प्राणनाथ श्रीहरी भेटला
उरीं आलिंगिला धरोनियां
प्रेमें अधराचें घेतलें चुंबन
टाकीयली मान स्कंधावरी २

अष्टभाव अंगीं दाटले सकळ
सात्विक निर्मळ स्तंभ स्वेद ३
रोमांच राहिले झाला स्वरभंग
कांपों लागे अंग सकळही ४
पालटला वर्ण प्रेमाश्रु गळाले
इन्द्रियांसी आलें निरोधत्व ५
राम म्हणे झाला दोघां एक जीव
नुठी आन भाव तेथ कांहीं ६

(४)

जीवलग मज आला भेटावया
आनंद हृदया थोर झाला १
आलिंगिलें उरीं तरी समाधान
नाहीं झालें मन सत्य माझें २
वाटे देह व्यर्थ आड मध्यें आला
विरोध जाहला संगा तेणें ३
परस्परांचिया हृदयाच्या हृदयीं
वास दोघांसीही व्हावा नित्य ४
राम म्हणे ऐसें वाटतसे जीवा
एकरूप देवा-मज व्हावें ५

(५)

मज माझा आतां पडतो विसर

जाह्ली अस्थिर वृत्ति ऐसी १
बावरलें चित्त घाबरला जीव
सांपडेना ठेव म्हणोनीयां २
माझी मज वस्तु जाह्ली पारखी
म्हणोनीयां दु:खी झालें मन ३
राम म्हणे मज लाभेल तें कधीं
सांग कृपानिधी नारायणा ४

( ६ )

हृदयींच्या देवा हृदयीं तूं राहीं
नको जाऊं काहीं केल्या दूर १
तुजवरी प्राण अर्पीन हा पुरा
निश्चय हा खरा चालवीन २
गोड तुझा संग गोड तुझी भेटी
प्रेमळ ते दृष्टी गोड तुझी ३
सौख्य आनंदाचें भोगीन सोहळा
कर तुझ्या गळां घालोनीयां ४
चित्त तुझे पायीं राहे विसावोनी
पाहतों नयनीं तूज प्रेमें ५
राम म्हणे मुक्ति मानीन मरण
जरी नारायण सन्निध तूं ६

(७)

कुठें शोधूं आतां भागलासे जीव
तरी कां न कींव येत माझी १
देवा तुम्हावीण कोण हा आसरा
लोटीलें पामरा कैसें दूर २
पहावे का स्थिति ऐसी मज सांगा
कां हो आपुल्या संगा दूर केलें ३
प्रेमभंग कैसा झाला एकाएकीं
हाय! तेणें दुःखी होय मन ४
आण भाक काय क्षणिक ते होती
आजवरील प्रीति कोठें गेली ५
राम म्हणे मज फसविलें काय
आतां हाय हाय! कसें करूं? ६
नका नका देवा लोटूं मज दूरी
पदीं कोठें तरी ठाव द्यावा ७

(८)

तुम्हासाठीं आज हरी । केली हृदयमंदिरीं
आरास हे बहुपरी । थाट माट नेटका १
चला यावें प्राणनाथ । जाऊं आजि मिरवित
पुष्पें मार्गी उधळीत । सुख स्वानंदाचीं या २
पाय घडया पंचप्राण । योगपथीं पसरूं जाण

आतां न करावें अनमान । स्वामी उठा लवकरी ३
उजळूं ज्ञानाची मशाली । भक्तिस्नेहें उजळ झाली
चला देवा शीघ्र चाली । आतां काय राहिलें ४
तनुपादत्राण पायीं । घाला स्वामी लवलाहीं
माझें म्हणुनी उरलें नाहीं । भेदाभेद कांहीं च ५
जीव शेज अंथरली । प्रेममाला हे गुंफिली
प्रिया बसा शेजेवरी । स्वकरें गळां घालीन ६
भक्त भगवंताचा राम । नाहीं रूप आणि नाम
स्वागतासी थोडा भ्रम । ठेउनियां राहिला ७

( ९ )

हृदयसरोजीं भृंग होईं देवा
आवडीनें प्यावा प्रेमरस १
नातरी सेविती अन्य त्या मक्षिका
मागुती तुज का मिळेल हा २
अथवा सुकोनी जाईल एकदां
मग का गोविंदा लाभे तुज ३
नाहीं तरी मत्त अभिमान गज
जाईल सहज तुडवोनी ४
राम म्हणे तेव्हां दुःखी तूं होवोनी
काय चक्र-पाणि करोसील ५

(१०)

आशामेघ आले चिदाकाशावरी
आत्मसूर्य हरि मंद झाला १

घाबरला जीव जाहला उदास
शीत बाधा त्यास वासनेची २

इच्छितो आतपा व्हावया सावध
होय तया मोद सांगा कधी ३

राम म्हणे केव्हां पुरेल कामना
कृपेच्या किरणा पाविजेन ४

# हाक

(१)

देवा मारूं किती हाक । गेली कोठें दिली भाक १
कंठ शोष फार झाला । प्राण जावयासी आला २
निराशेच्या या अंगारीं । तप्त झाला प्रणय भारी ३
विरहाची थोर ज्वाळा । पेटे धडकोनी जिव्हाळा ४
ऊत आला स्नेहालागीं । तुझा व्याकुळ वियोगी ५
कड अश्रु-गंगा वाहे । जड चित्त होत आहे ६
राम म्हणे झाला अंत । सुखा आरंभ कीं येथ ! ७

(२)

न येवो कल्पना आणीक या मना
कीर्तनीं वासना जडो सदा १
सदा सावधान असावें संसारीं
गुण तुझे हरि आठवोनी २
आठवूनी जीव तुझ्या चरणातें
राहो ऐसें मातें देईं भाग्य ३
देईं भाग्य देवा संताची संगति
तेणें माझ्या तृप्ति इन्द्रियांची ४
इन्द्रियांची वाट मोडुनी बिकट
मार्ग हा सुनीट मातें दावीं ५
दावीं तुझें रूप सगुण हें डोळां
यावीण वेगळा हेत नाहीं ६

नाहीं म्हणे राम माझा भक्तिभाव
परि तूं केशव दयावंत ७

(३)

मज हिंडवितें मन । दाही दिशा रात्रंदिन १
येथें चालेना विवेक । भोगवितें सुखःदुख २
कास वासनेची धरी । रुंजी घाली विषयांवरी ३
देवा तुझ्या कृपेविना । सत्य नावरे हें कोणा ४
बहुत उद्दाम चचल । दासावरी करी बळ ५

(४)

माझीं दोन्ही नेत्रपातीं । मिटूं लागलीं श्रीपति १
मोह निद्रेनें वेढिलें । मज बेसावध केलें २
अविद्येच्या या पर्यंकीं । घोरूं लागला जीव कीं ३
भोगिताहे विषयस्वप्न । दीर्घकालवरी जाण ४
थोर अज्ञानाची रात्र । घालवाया उगवें मित्र ५
झडकरी तूं केशवा । ज्ञानप्रकाश पाडावा ६
दास रामा उठवावें । सेवे आपुल्या लावावें ७

(५)

तुज मानवे तें करीं हरि आतां
अहंकार वृथा आहे माझा १
थोर तुझी लीला वर्णूं काय तरी
भागली वैखरी शेषाची हे २

मराठी

तूंच सूत्रधार कळा तुझे करीं
नाचविसी हरि विश्व सारें ३
राम म्हणे कर्ता करविता तूंची
मज अनाथाची कींव करीं ४

( ६ )

मज न टाकीं वेगळा । हेंच विनवितों गोपाळा १
एक बाह्य एक आंत । भरलें कापट्य जगांत २
जड तेथें वांके न्याय । कोण दीना पुसती माय ३
रीत पाहिली विश्वाची । स्वार्थी प्रीति हे सर्वांची ४
उत्तमाचा न टिके पाय । हाची देखीयला न्याय ५
वीट पाहोनीयां आला । दास राम तुझा झाला। ६

( ७ )

अनंत तारका नभीं उगवती
नित्य प्रकाशती दिव्य तेजें १
चुकोनी खालती पडे कोणी एक
कोण तिचें दुःख करी तेथें २
पुष्पभार फुले पुष्प वाटिकेंत
सुवासें त्या चित्त आनंदतें ३
आवडीं रसिक चाखितसे स्वाद
होय तया मोद सौख्यदायी ४
रानवटीं पुष्प जातसे सुकोनी

कोण करी मनीं चिंता त्याची ५
सभाग्य ते जन आनंदें क्रीडती
अभागी रुततो दैन्यपंकीं ६
रीत ऐसी जनीं पहातों सकळ
येतां हीन काळ कोण पाही ७
तुम्हा तरी चिंता असो नारायणा
तारा ऐशा दीना निज कृपें ८
राम म्हणे कोठें जावें अनाथानें
सांगा तुम्हाविणें देवराया ९

( ८ )

ज्ञानसूर्य मावळला । घोर अंधार दाटला १
वाट सांपडेना जीवा । स्वामी यांतोनी सोडवा २
आंधळ्यानें कोठें जावें । साह्य कोणाचें मागावें ३
भेट पांगळ्याची होते । साह्य कोणाचें कोणातें ४
नेत्र नाहीं एका पाय- । नाहीं एका ऐसी सोय ५
मार्ग अंधारीं बिकट । कोण दाखवील वाट ६
चाल यावें आतां झणीं । जीव व्याकुळ या क्षणीं ७
राम म्हणे सद्गुरुराया । धावा माझिया समया ८

# आत्मनिरीक्षण

( १ )

हरवलें माझें आहे काहीं तरी
कळेना तें परी काय असे १
शोधितों शोधिलें शोधिनही पुढें
परि हाता चढे नकळे कधीं २
वेडा झाला जीव धुंडी रानोमाळ
कळेना अवेळ वेळ तया ३
हाय! मज दैव जाहलें पारखें
जन्म माझा दुःखें भोगावया ४
एकदां पाहिलें नाहीं प्राप्त झालें
दुःखांत लोटिलें मात्र तेणें ५
राम म्हणे राम नाहीं आयुष्यांत
उगिच जिवंत राहियेलों ६

( २ )

आजवरी व्यर्थ आयुष्य हें गेलें
हित नाहीं केलें कांहीं एक १
हांसलों खेळलों मानियेलें सुख
विषयीं हरीख नित्य नवा २
उरले दिवस नकळे ते किती
विझेल हे वाती जीवि‍ताची ३
अजुनी हा मोह सोडीना या मना

वाढते वासना अधिकाधिक ४
कळेना पुढती काय होय गति
सांभाळील अंतीं कोण सखा ५
राम म्हणे करीं वाटे तैसें कर्म
गेलों पुरुषोत्तम विसरोनी ६

( ३ )

मेघ वासनेचे आले । धुंद चित्ताकाश झालें १
मंद झाला आत्मसूर्य । तम दु:ख शोक भय– २
दाहि दिशांतें दाटलें । जीवा कांपरें भरलें ३
राम म्हणे कोण स्थिति । आज आली हे श्रीपति ४

( ४ )

गुण-दोष माझे ठाउक मजसी
लपवूं मनासी कैसें माझ्या १
मज कोणी मुक्त म्हणताती ज्ञानी
परि मी न मानी मनीं तैसें २
मी असें पायींची सकलांच्या वहाण
घेतां व्यर्थ मान लाज वाटे ३
सत्य मज अंगीं नाहीं थोरपण
मज माझें मन देतें ग्वाही ४
राम म्हणे मी तों इतरांसारिखा
मज माझा ठाउका अधिकार ५

( ५ )

मी न मंत्र तंत्र सांगतसें कोणा
द्यावया कळेना उपदेश १
हरिभक्ति ठाई वेंचुनी आयुष्य
राहतों उदास संसारीं या २
हितकर माझ्या वाटलें जें मना
तेंच सांगें जना मित्रभावें ३
या परतें आन ठाउकें न काहीं
मज येत नाहीं गुरुमंत्र ४
राम म्हणे मी तों सकळांचा दास
आहें पायपोस सज्जनांचा ५

( ६ )

मजलागीं म्हणा दांभिक वा संत
मज काय खंत त्याची असे १
आहें तैसा आहें पालटेन कैसा
मज माझी दशा ठाऊकी ते २
संत म्हणोनीयां नाचविल्या डोई
काय मज येई संतपण ३
संतपण जरी मज अंगीं वसे
तरी का होतसें असंत मी ४
तुमचिया बोलें पालटेना स्थिति

मग कां मी खंती करूं त्याची ५
राम म्हणे कर्म करीन मी जैसें
मज येती तैसे गुण दोष ६

(४)

माझिया मित्रांचें गृहसौख्य पाहीं
गृहस्थ मी नाहीं जरी झालों १
वागतों जगांत पाहतों दुरोनी
अलिप्त राहोनी साक्षीरूप २
घेतों अनुभव करीतों विचार
तों वाटे संसार दुःखदाई ३
आशा प्रेमभंग सुखाची रांगोळी
प्रपंचीं ठेविली आहे नित्य ४
परि क्षीण आशातंतुवरी सर्व
लटकती जीव नवल वाटे ५
राहियलों दूरी एकटा त्रयस्थ
म्हणुनी आलें सत्य अनुभवा ६
खेद वाटे स्थिति जगाची पाहुनी
होती हे यांतुनी मुक्त कैसे ७
राम म्हणे बरें झालें मी सुटलों
मिळतों तरी झालों असतों ठार ८

(८)

सत्य सांगें मज कळेना वेदान्त
श्रुति-स्मृति मत कांहीं एक १
घेतों अनुभव पाहें विचारूनी
सत्यासत्य मनीं निवडीतों २
वाटलें जें योग्य तेंच सांगें जना
मजला कळेना अन्य मत ३
मतमतांतरांपाशीं काय काम
म्हणे दास राम माझें असें ६

(९)

मी न कोणालागीं मानी । आणि कोणातें अवमानी १
आहे सहज माझी स्थिति । नाहीं कापटच हें चित्तीं २
जाण सकळांसी सारिखा । वागें सर्वांचा मी सखा ३
कोणी नाहीं शत्रु मित्र । मज सारिखे सर्वत्र ४
एक ओठीं एक पोटीं । ऐशी नाहीं माझी स्थिति ५
राम सरळ स्वाभाविक । नाहीं कृत्रिम ठाऊक ६

(१०)

मी असें पाखरूं मारितें भरारी
मोकळ्या या चारी दिशा मज १
रम्य विश्वोद्यानीं घेतसें विश्रांति
बागडें ही भीति न धरीं कांहीं २

लीला पुष्पें मृदु रम्य निसर्गाचीं
फुलतात त्यांची मौज पाहें ३
अनुभव रस चाखितों त्यांतील
राम म्हणे फुलपाखरूं मी ४

(११)

मी असे कोमल तितुका कठीण
वांकवीन मान तितुका ताठ १
शांत मी तितुका आहें जमदग्नि
मज नाहीं कोणी ओळखिलें २
दास मी तितुका स्वामी सकळांचा
सान तितुका साचा थोर असें ३
राम म्हणे सत्यापाशीं मी शरण
असत्या दंडीन ब्रीद माझें ४

(१२)

मी असे भागला दुःखीं कष्टी जीव
विश्रांतीचा ठाव पाहतसें १
जाहलों उदास आला असे वींट
मज थाटमाट आवडेना २
माझे मनोरथ भंगले सकळ
मना तळमळ लागलीसे ३
हरपलें सुख शोधीं अहर्निश

न पडे जीवास चैन माझ्या ४
राम म्हणे जेव्हां मनीचें लाभेल
सफल होईल जन्म तेव्हां ५

(१३)

दैवें दिला टोला पावलों पतन
संपले सुदिन आनंदाचे १
उदास जीवन उदास हें मन
जिवंत मरण आलें परि २
आतां कैंचा जीवा सुखाचा तो क्षण
जया झालें शून्य सकळिक ३
राम म्हणे देवा तूं तरी सांभाळीं
प्रेतावरी गाळी अश्रु दोन ४

(१४)

मज नका देऊं तुम्ही काहीं मान
नसे थोरपण माझे अंगीं १
ठाउक हे माझी मज आहे स्थिति
उगीच मी स्तुति काय ऐकूं २
मी असें प्रेमाचा भुकेला तेवढें
मागें तुम्हापुढें द्यावें मज ३
नलगे आणिक, द्यावें प्रेमसुख
विश्वाचा पाईक राम म्हणे ४

(१५)

मज विषयींचा नका धरूं लोभ
होईल हा क्षोभ व्यर्थ मना १
जाहलों मी प्रेत तुम्हा अमंगळ
मित्र हो सकळ फिरा मागें २
चला विसरोनी माझें रूप नाम
ठेवा निजप्रेम अन्य ठायीं ३
राम असे मेला मुकला तुम्हासी
व्यर्थ या आशेसी गुंतूं नका ४

(१६)

असोनियां जनीं भोगितों एकांत । झालें हस्तगत वर्म माझ्या १
मजला बंधन नसे सदा मुक्त । मी असें अलिप्त पूर्णानंदीं २
असोनियां लोकीं मी जनांवेगळा । लिंपेना विटाळा वासनेच्या ३
कैसें स्वर्गसुख या लोकीं भोगावें । मजला तें ठावें राम म्हणे ४

# मार्गदर्शन

( १ )

देव ओळखी अंतर । जाणे साव अथवा चोर १
असो जाहलें जें मागें । आतां तरी होऊं जागे २
होय मागील परिहार । पुढें राहतां सादर ३
राम म्हणे पश्चात्तापें । अवघीं नष्ट होती पापें ४

( २ )

व्यर्थ सोडोनी संसार । काय करणें वनांतर १
मोक्ष नाहीं कोठें दुरी । वसे आमुच्या शेजारीं २
जेथें सत्यावरी प्रीति । तेथें अढळ आहे मुक्ति ३
जया परस्त्री हे माता । आवडे तो भगवंता ४
आपुलें जें नाहीं त्याचा । लोभ मार्ग हा पापाचा ५
मद्य धुम्रादिक पान । सोडूं अवघेंची व्यसन ६
अपंगासी साहृय करूं । चित्तीं श्रीहरीला धरूं ७
निंदा टाकोनिया देऊं । प्रेम सर्वांठाईं ठेऊं ८
याच देहीं या संसारीं । जीव मोक्षाचा अधिकारी ९
राम म्हणे सांगा काय । सुलभ याहुनी उपाय १०

(३)

कां रे लावीसी हें द्वार । देव उभा कीं बाहेर १
फोडी टाहो मारी हाक । कान देओनीया ऐक २
काढ वेगीं अडसरी । भेट, बोलावीतो हरि ३
काय दुर्दैवाचा फेरा । सुख त्यजिसी आलें घरा ४

चाल होवोनी निःसंग । भेटें आला पांडुरंग ५
बसुनी काय करिसी आंत । कोण संबंधी हा येथ ७
तूंचि चुकविसी रे त्यातें । नित्य तो राही सांगातें ८
चाल राम दाखवी तो । देव सभाग्या भेटतो ६

(४)

करूनीयां एक जूट । कार्य करूं अवघे धीट १
जातो घडि घडि काळ । गेला न येई दुर्मिळ २
साह्य करूं एकमेकां । दास सांगे सकळिकां ३
येथें सोडूं भेदभाव । सर्वांभूतीं वासुदेव ४
शूद्र ब्राह्मण हें द्वैत । टाकूं अवघेहि येथ ५
राम म्हणे होऊं एक । भेद सोडूं हा अनेक ६

(५)

टाकूं सारा अभिमान । सर्वांभूतीं होऊं लीन १
चला हातीं घालूं हात । पुढें मार्ग चालूं नीट २
सुख दुःख चिंता क्लेश । कर्मभोग जो विशेष ३
आजि संपवूं भोगोनीं । बळ निश्चयाचें मनीं ४
कृपाप्रसाद मेळवूं । जन्ममरणीं मुक्त होऊं ५
राम म्हणे आम्हा धनी । देव अनाथा लागोनी ६

(६)

येथें न करा हो विचार । अवघे मिळूं सान थोर १
करूं स्वहिताची मात । या हो उच्चनीच यात २

असो कोणताहि पंथ । अथवा कोणतेंहि मत ३
घेऊं निवडोनी सार । हंसन्यायें तोय क्षीर ४
राम म्हणे एक देव । सर्वां शेवटींचा ठाव ५

( ७ )

शुद्ध विवेक - सागर । त्यांत करीं मी विहार १
सत्वगुण लहरी येती । उन्मनींत शांत होती २
येथ कोणीही बुडेना । रम्य सिंधु सकलां जाणा ३
शांति क्षमा जलदेवता । येथ वसती विलोकितां ४
पेटे ज्ञान वडवाग्नि । येथें धडकोनी अनुदिनीं ५
मेरु आत्मानुभव उभा । शिखर ज्याचें भेदी नभा ६
या हो येणार सकळ । भीति न धरा अळुमाळ ७
राम पालवीतो करीं । या हो सकळ नरनारी ८

(८)

जें जें घडतसे काहीं । सत्ता देवाची ते पाहीं १
हर्षविषादा न मानीं । सदा सम राहीं मनीं २
जे जे देहालागी रोग । ते ते प्रारब्धाचे भोग ३
येते जातें सुखदु:ख । आहे सकळ क्षणिक ४
दास राम म्हणे चिंता । हेचि एक महा व्यथा ५

( ९ )

गुणा अवगुणा होतसे विकास
घडे सहवास तैशापरि १

म्हणोनी संगति धरावी साधूची
होय सद्‌गुणाची वाढ तेणें २
वाढतील दोष असंगाचे संगें
उच्च शील भंगे सात्विक तें ३
जैसा संग तैसा पालटे स्वभाव
आहे अनुभव जगाचा हा ४
हातीं घेतां टाळ वाटतें अंतरीं
राम कृष्ण हरी म्हणावेसें ५
राम म्हणे सुरी कापाया वासना
उपजवी मता देखिलें तें ६

(१०)

पथ्य सांभाळीना तया । होय औषधी ते वायां १
तैसें जपिलें राम नाम । परि न पाळीले नियम २
तरी तें होत असे व्यर्थ । नाहीं तयामाजी अर्थ ६
राम म्हणे नकळे वर्म । तरी ते झाले जाणा श्रम ४

(११)

सोवळें तें नाम आहे शुद्धतेसी
दृष्टी अर्थापासीं असों द्यावी १
विचार कसोटी सान्निध असतां
रूढीवरी आतां योग्य नाहे २
श्रद्धा आणि बुद्धि शोधक ते व्हावी

तरीच घडावी ज्ञान प्राप्ति ३
सत्यावरी निष्ठा अढळ असावी
रूढ हे त्यागावी राम म्हणे ४

(१२)

पाहोनीया रंग बाहेरील कोणा
उत्तम न म्हणा वाईटहि १
फणसाचे अंगीं कांटा आंत रस
करटी नारळास आंत गोड २
वृंदावनफळ दिसतें सुंदर
विष तें प्रखर वसे पोटीं ३
राम म्हणे शोध घ्यावा अंतरींचा
उत्तमाधमाचा तेव्हां बोल ४

(१३)

कधीं होय थोरां लहान तें भारी
बसे डोईवरी येउनीयां १
जया मत्कुणासी म्हणती लहान
निद्रासुख भग्न तोच करी २
मत्त गजाशुंडीं मुंगी रिघे जरी
कासावीस करी जीव त्याचा ३
राम म्हणे गर्व न करावा कोणी
रहावें नमोनी सकळांसी ४

(१४)

कातां नव्हे दासी पूज्य ते देवता
आधार जीविता लागीं होय १
मानी धर्मपत्नि धर्माची या मूर्ति
निस्वार्थ ते प्रीति ठेवी तेथें २
पंचप्राणाची या अर्धांगी स्वामिनी
मानी तसे मनीं देवरूप ३
राम म्हणे आम्ही तोची म्हणो पति
प्रपंचीं त्याप्रती सुख आहे ४

(१५)

धर्म सेवकाचा हाची अनमोल
वाद येथें फोल आहे जाणा १
सदा दक्ष मानी स्वामीची ते आज्ञा
न करी अवज्ञा कोणे काळीं २
पंचप्राणाची या टाकितो आहुती
स्वामी-कार्य-पूर्ति करावया ३
राम म्हणे कदा न सोडी संकटीं
पडो नेदी तुटी सेवाधर्मीं ४

(१६)

सांगितला धर्म जैसा सेवकाचा
तैसाची स्वामीचा धर्म आहे १

सेवकासी पाळी पोसी करी प्रेम
ध्यानीं घेई श्रम झाले त्यासी २
न बोले टाकोनी करी उपदेश
चोजवी तयास सांभाळोनी ३
झाले अपराध घालीतसे पोटीं
करी तयासाठीं जीव थोडा ४
स्वामी तोची खरा तेणें घ्यावी सेवा
धनी सेवका वा भेद नाहीं ५

(१७)

तोची एक आम्ही म्हणे ब्रह्मचारी
निर्मळ अंतरीं ब्रह्मनिष्ठ १
ब्रह्मनिष्ठ राहे विषयीं उदास
टाकी मायापाश तोडोनीयां २
तोडोनी वैराग्यें वासनेचें मूळ
सदा सर्वकाळ लीन ब्रह्मीं ३
ब्रह्मीं ठेवोनियां एकनिष्ठ मन
करी अध्ययन ज्ञानासाठीं ४
विद्या वदे मुखीं तैसें आचरण
विषतुल्य धन स्त्रिया मानी ५
मानी एक सार विश्वीं नारायण
तेणें केलें धन्य आश्रमा या ६

आश्रमा या जरी गृहस्थहि झाला।
दक्ष सत्कर्माला तो न मुके ७
मुकेना या राम आश्रमा वाहिला
दैवें आचरला ब्रह्मचर्य ८

(१८)

अहो काय माळा घेवोनी ओढितां
धरोनी बैसतां ध्यान काय १
आर्तस्वर कां हा पडे ना या कर्णी
साह्य करा कोणी म्हणोनीयां २
उठा वेगीं धांवा चला द्या त्या हात
कासया वेदान्त घोकीतसां ३
टाका पोथी पाट माळ जाळोनियां
जरी न हृदया करुणा आली ४
फोडा शालिग्राम फेंका बिल्वदळें
नाहीं पाझरलें चित्त जरी ५
राम म्हणे कांरे पूजितां देव्हारा
टाकोनीयां खरा देव दुरी ६

(१९)

सम चित्त झाल्याविना । ब्रह्मज्ञान हें बाणेना १
विषयीं वीट आला नाहीं । तों न परमार्थ कांहीं २
जों न इन्द्रियें ही वश । तों न घडे योगाभ्यास ३

राम म्हणे विषयध्यास । तरी न घडे हा संन्यास ४

(२०)

कर्म ज्ञान योगाहून । सुलभ भक्तिमार्ग जाण १
एक प्रेमा येथें काम । प्रेमापाशीं मेघश्याम २
कर्म योगें काठिण्यता । होय अभिमान चित्ता ३
पहा ज्ञानयोगें ज्ञानी । किती मुक्त झाले जनीं ४
नव्हे योग हा रोकडा । पाहूं जातां काळ थोडा ५
राम म्हणे हातोहातीं । भक्तिफळ सहजगति ६

(२१)

नका निंदूं हो कोणासी । निंदा पुण्य अवघें नाशी १
निंदकाचे अंगीं दोष । राहे येउनी विशेष २
दोषरूप झाली क्रिया । लहरी उठती दोषाचिया ३
शुद्ध अशुद्ध विचारें । आत्मा लिंपे येणे द्वारें ४
शुद्ध चित्तीं उठे दोष । तेणें विटाळे मानस ५
राम म्हणे म्हणुनी नित्य । करा जेणें होय हित ६

(२२)

जरी व्हावें आत्मज्ञान । जावें संतांसीं शरण १
नमन करावें सद्भावें । चरण प्रेमें आलिंगावे २
करा आवडीचा प्रश्न । होऊनियां निरभिमान ३
कृपा उपजे मग जीवीं । गोष्ट सांगती बरवी ४
तैसें करितां आचरण । सहज बाणताहे खुण ५

राम म्हणे परंपरा । सांगितली चित्तीं धरा ६

# तारकनाम

(१)

अंगीं प्रेमाचें या वारें । सहज माझिया संचरे १
उभे रहाती हे रोमांच । भावें हृदय भरे साच २
नाम भगवंताचें घेतां । ऐसी ओढवे अवस्था ३
कोण कळेना हें बळ । अंगीं नामाच्या निर्मळ ४
चुंबकाचे अंगीं शक्ति । जड लोहा स्फुरे स्फूर्ति ५
राम नाहीं हा रंगला । जन्म मरणीं मुक्त झाला ६

(२)

नाम उद्धटासी करीतें सात्विक
नीट दावी एक भक्तिपंथ १
नाम दुःखितासी पूर्ण सौख्यदायी
उद्धारक होई पापीयासी २
श्रांत जीवालागीं विश्रांतीचें स्थान
नाम नारायण हेंचि आहे ३
राम म्हणे नाम साधूंचें जीवित
सकळही हेत पुरवी जें ४

(३)

नामाचेनी योगें ब्रह्म जाणवलें
वर्णितां हे आले गुण वाचे १
नाहीं तरी केंवीं बोलवे ही खुण
नामेंवीण ज्ञान कैसें होय २

काढोनी दिधलें नामें ब्रह्म हातीं
नाहीं तरी होती कैसी वाट ३
खेळविलें नामें सामोरी सगुण
दावीलें विंदाण राम म्हणे ४

( ४ )

कामक्रोधांसीया लावोनीयां शिक्षा
नाम देई दीक्षा वैराग्याची १
काढोनी विकल्प लावी परमार्थी
भक्तिचीयां पंथा दासालागीं २
नामें अभिमान गळतो सकळ
नामें जात कुळ जाय लया ३
नामें शांत चित्त होतें आपोआप
नामें त्रिविधताप दूर होय ४
रंगला जो नामीं महिमा त्या कळे
इतरां न मिळे लाभ त्याचा ५
नासोनीया द्वंद्व नाम दे समाधि
मायेची उपाधी काढोनीया ६
नेओनी बैसवी मोक्षाचे शिखरीं
राम म्हणे करी जीवन्मुक्त ७

# बुवाबाजी

( १ )

जगीं अंधश्रद्धा बोकाळली फार
धर्माचें शरीर उरलें मात्र १
रूढ तोची धर्म मानितो सकळ
पसरलें खूळ जगामाजी २
सत्य सांगू जातां म्हणती नास्तिक
वेडावले लोक सर्व ऐसे ३
त्याचा तो फायदा कामसाधुजनीं
घेतला जाणुनी पूर्णपणें ४
त्यांत एक वर्ग दांभिक संतांचा
राग बोले याचा मानूं नका ५
अधमाहुनी हे जाणावे अधम
सत्य म्हणे राम हितशत्रु ६

(२)

लोकां सांगे नीतिधर्म । करी आपण अधर्म १
म्हणे मी आहे समर्थ । मज नाहीं न्याय नीत २
विधिनिषेधांची बाधा । आहे तुम्हासी सर्वदा ३
आम्हा नाहीं पापपुण्य । आम्ही करूं तें प्रमाण ४
ऐसें म्हणुनी अनुचित । कर्म आचरितो नित्य ५
राम म्हणे दुर्जनाचा । ऐशा संग नको साचा ६

( ३ )

साधु म्हणोनियां मिरवितो जगीं
परी असे ढोंगी अंतरींचा १
म्हणे आम्ही वायु रहातों भक्षुनी
मठांत बैसुनी सेवी अन्न २
कोणी कांहीं तरी घ्या म्हणे महाराज
म्हणे आम्हा काज नसे त्याचें ३
परि हा प्रसाद ठेवा देवापाशीं
म्हणोनी मानसीं अभिलाषी ४
नित्य शिष्यालागीं ऐसा उपदेशी
मानावें गुरुसी पूज्य म्हणे ५
गुरु दुराचारी दुःशील दुर्जन
परि देवाहुनी थोर शिष्या ६
परनारी अंकावरी बैसवोनी
सांगे मंत्रध्वनी कानीं गुज ७
भोंदोनियां बाया लावितो सेवेसी
प्रसंग विशेषीं सख्य करी ८
सेवेसी सादर तोची प्रिय शिष्य
इतर निमिष नको डोळां ९
राम म्हणे ऐसा सज्जनां लांछन
पापाची ते खाण मूर्तिमंत १०

( ४ )

एक जाहला वैष्णव । एक झाला वासुदेव १
कोणी बुद्ध भिक्षु झाला । कोणी संन्यास घेतला २
कोणी श्वेतांबर । कोणी झाले दिगंबर ३
नाकावरी चिंधि बांधी । कोणी अहिंसा ते साधी ४
कोणी झाला ब्रह्मोपंथी । कोणी एकेश्वरी होती ५
कोणी शिष्य नानकाचा । कोणी अनुयायी ख्रिस्ताचा ६
कोणी झाले मिशनरी । मुक्तिफौजेचे अधिकारी ७
कोणी झाले रामदासी । कोणी जंगम हरिदासी ८
कोणी झाला वारकरी । लावी टिळा दिंडी धरी ९
कोणी नाथ अवधूत । ऐसे नानाविध पंथ १०
कोणी फकिर फिकिर पोटीं । बांग पुकारितो ओठीं ११
एकमेकां हिणविती । उणें काढूनी बोलती १२
जो तो म्हणे भले आम्ही । पंथ आमुचाची नामी १३
दंभ वाढलासे मोठा । राम म्हणे तेणें तोटा १४

( ५ )

दीक्षा घेतली संन्यास । केला मठामाजी वास १
स्वामी स्वामी म्हणती लोक । त्याजमधीं मानी सुख २
हातीं गोंडा पालखीचा । संगें समुदाय लोकांचा ३
नारीनर वंदिताती । तेणें संतोष तो चित्तीं ४
केली आयुष्याची हानी । दंभ वाढवीला जनीं ५

राम म्हणे त्यास काहीं । वासनेचा झाला नाहीं ६

( ६ )

किती एक आम्ही म्हणती राजयोगी
वागताती जगीं राजा ऐसें १

अंगीं अंगरखा जरीचा घातला
माथां गुंडाळीला जरी शाफा २

म्हणीतला आम्ही अंगरखा येथ
परी जाणा कोट अर्वाचीन ३

खमीस जाकेट वरती हा कोट
घड्याळें पॉकेट शोभतसे ४

पायीं जडावाचा घालतसे जोडा
वागतो धांगडा लोकांमाजी ५

आळशी रिकामा फुंकी सिगारेट

मराठा ग्रंथ ... अनुक्र ... दि: ... नों: दि ...

बसे नित्य नर्तकीचे घरीं

ऐसियासी लोक मानितातो देव
पूजितातो भाव धरोनियां ७

हीच तरी गोष्ट आश्चर्याची आहे
डोळां पाहिलें हें सांगतसें ८

पोषाखावरोनी संत वा असंत
म्हणो नये मत हेंच माझें ९

घातला तुमान म्हणोनी का भोंदु
जोडा नेसे साधु तोच काय १०

किंवा ते लंगोटी नेसावी साधुनें
ऐसेंही न म्हणे सत्य सूज्ञ ११

कोणताही असो पोषाख तयाचा
सदा पावित्र्याचा वास जेथें १२

लक्षणें साधूचीं व्हावीं तया अंगीं
तोची थोरालागीं वंद्य होय १३

त्याचा तो अभाव पहातां याजपाशीं
केवळ हे पोटपोशी साधु १४

पोटपोशी साधु तरी बरें एक
परि कीर्तिसुख यांस व्हावें १५

लोकांवरी पोट पोशिती आपुलें
आणिक पाउलें म्हणती वंदा १६

लोक ते बिचारे भोळे तयां काय
राजयोग होय म्हणती ऐसें १७
राजयोगीं काय सांगितलें आहे
तयासी ठावें हें काय असे १८
राम म्हणे अहो नराधम तुम्ही
कांहीं तरी श्रमी व्हारे मनीं १९

(८)

भोंदावयालागीं जना । सोंगें आणितातो नाना १
ऐसे कलीमाजी संत । एक एक ते अद्भुत २
वेडयासारिखें करिती । क्षणें हांसती कोपती ३
क्षणें होताती विरक्त । क्षणें विषयीं आसक्त ४
कधीं आसनीं बैसती । कधीं कर्दमीं लोळती ५
जणु परमहंसमूर्ति । ऐसी व्हावी लोकीं कीर्ति ६
राम म्हणे धरिती सोंगें । बोज वाढवाया जगें ७

(९)

तुम्ही ऐकलें का जगीं । दत्त झाले जागोजागीं १
कोणा एका अंगीं शिरे । गुरु दत्ताचें या वारें २
एक दत्त काढी भूतें । मुक्त करी रोगग्रस्तें ३
एक दत्त वांझटासी । दोन मुलें दे वर्षासी ४
एक दत्त धूलीकण । त्याचें करीतसे अन्न ५
वेडे तुम्ही सुशिक्षित । दुष्काळ कां म्हणतां व्यर्थ ६

घेउनी जा भरुनी ट्रेन । अन्न या दत्तांपासून ७
जडी बुटी यांजपाशीं । एक एक आहे ऐसी ८
एकदां मी ऐकीयेली । एका दत्तें लीला केली ९
पालापाचोळा घेउनी । केलें सैन्य अक्षौहिणी १०
अहो तुम्ही अराजक । व्हा या दत्ताचे सेवक ११
होते दत्तासी सहा हात । ऐसें ऐकों पुराणांत १२
तीन तोंडें त्या दत्तासी । मात ऐकीयेली ऐसी १३
यांचें मात्र थोडें भिन्न । तैसें रूप नाहीं जाण १४
यांत मोठेंसें तें काय । हें तों कलीयुग होय १५
दत्ताचें तें नाम दत्त । यांच्या मागें लागे संत १६
पूर्वी होता दत्त एक । आतां अवतार अनेक १७
फुटे मातीचें ढेंकुळ । पसरे जैसें रानोमाळ १८
तैसा फुटला मूळ दत्त । त्याचे अवतार हे संत १९
हांसों किंवा रडों सांगा । राम म्हणे ऐशा जगा २०

( ९ )

मंत्रसिद्धि शक्ति वसे काहीं अंगीं
ऐसें दावी जगीं लोकांपुढें १
बसे नीट पाट मांडोनी आसन
घालोनी गुणगुण करी काहीं २
दृष्टि नासिकाग्रीं लावे, डोले बोले
बहुत भोंदिले भोळे जन ३

राम म्हणे ऐशा दांभिकाचे माथा
हाणोनीयां लाथा दूर सारा ४

(१०)

अरे दांभिकांनों सांगा । कां या भाळवितां जगा १
नाना चेटकें दावोवी । कां रे होतां नरका धनी २
तुम्ही मरा आणिकांसी । कां रे पाडीतसां फशीं ३
पोट भराया कारणें । अन्य नसती का साधनें ४
आलां मानवजन्मासी । लाज नाहीं मना कैसी ५
राम म्हणे कांरे नाहीं । आलां पशूचिया देहीं ६

( १ )

ऐक ऐक माझ्या मना । कैसी सोडावी वासना १
नको जाया रानीं वनीं । नको भ्रमूं तीर्थाटणीं २
विधियुक्त विषयभोग । घेतां ध्याईं पांडुरंग ३
हाचि बरवा रे संन्यास । नको आणिक सायास ४
राम म्हणे कृष्णार्पण । केलें कर्म करीं जाण ५

(२)

स्वात्मसुखसेजे पहुडोनी राहें
आणिक चिंता हे नको करूं १
सोडोनीयां देईं इतर उपाधी
स्थिर ठेवीं बुद्धि अधिष्ठानीं २
न सोडीं हें मना स्थान बळकट
राहें तूं निकट निजरूपीं ३
राम म्हणे कदा न होईं वेगळा
आइकें निर्मळा गुजगोष्टी ४

( ३ )

आतां तरी मना राहें सावधान
करीं हें जतन आत्मसुख १
व्यर्थ घालवीसी आपुली हे शक्ति
विषयीं आसक्ति धरोनियां २
सोडीं हें चांचल्य होईं अंतर्मुख

भोगीं नित्य सुख समाधीचें ३
राम म्हणे मोद अतर्क्य तेथींचा
असमर्थ वाचा वर्णावया ४

( ४ )

ध्यान धारणेचा करीतां अभ्यास
नव्हे हा आळस योग्य तेथें १
सावध असावें सदासर्वकाळ
जागृत विचार ठेवोनियां २
एक एक पुढें पाउल टाकावें
मागें न पहावें फिरोनियां ३
एकदा समाधि गांठावी त्वरित
मग व्हावें स्थित आत्मरूपीं ४
राम म्हणे मना करीं हा निर्धार
न घेईं माघार चाल पुढें ५

( ५ )

सज्जना मना तूं आइकें हे मात
क्षणिक जीवित जाण आहे १
जाण आहे बापा मृत्युलोकीं वास
कदा या गोष्टीस विसरूं नको २
आली घडी तेची आपुली मानोनी
कांहीं घे करोनी आत्महित ३

राम म्हणे कोण आहे तुझें येथ
तूं तरी पांथस्थ होसी जाण ४

( ६ )

अभक्ष्य तें कदा काळीं भक्षों नये
अपेय तें नये पान करों १
नाचरावा शास्त्रें अधर्म बोलिला
सोडूं नये भला राजमार्ग २
सूज्ञ बोलती तें अव्हेरुनी मानें
कदा अभिमानें वागों नये ३
राम म्हणे मना धरावे सद्गुण
करावी रक्षण कीर्ति जनीं ४

( ७ )

मर्त्यलोकींचा या असाची संसार
सकळ बाजार निराशेचा १
एकावरी प्रेम ठेवोनी आपुलें
मानावें तों गेलें सोडुनी तें २
जयापासोनियां वाटे सुख व्हावें
कारण तें व्हावें दुःखालागीं ३
येथील हे स्थिति ऐसी आहे मना
म्हणोनी सुजाणा मोहूं नको ४
हृदयवल्लभ राम म्हणे हरी

आपुलासा करीं शुद्ध प्रेमें ५

( ८ )

नको करूं चिंता स्वस्थ चित्तें राहीं
कौतुक तें पाहीं प्रारब्धाचें १
प्रारब्धाचा भोग भोगिल्या सुटेना
निश्चित चुकेना देवांदिकां २
देवांदिकां लागे संचित हें पाठीं
पडेना या तुटी जन्मवरी ३
जन्मवरी भोग प्रारब्धाचा आहे
आठवूनी राहें नारायणा ४
नारायणा तुझी येईल करुणा
मग सोडवणा सहजची ५
सहज मग मना राम म्हणे मुक्ति
जन्ममरणगति खुंटलिया ६

( ९ )

सुखदुःख दोन्ही प्रारब्धा आधीन
करीसी कां शीण व्यर्थ मग १
कां न वर्म ऐसें जाणोनी संसारीं
समता अंतरीं ठेविसि या २
सुख होतां मोद दुःख होतां कष्टी
वावुगा हिंपुटी काय होसी ३

विहित हें कर्म आचरावें नित्य
फळावरी हेत ठेऊं नये ४
वर्म ठेवीं चित्तीं निष्काम भावना
केलिया प्रयत्ना गोड फळें ५
मानिलिया सुख मानिलिया दुःख
मानीव हें देख सकळही ६
रंकासी कोरान्न वाटतें अमृत
पक्कान्नाचें ताट तुच्छ राया ७
सौख्य नाहीं जया आशा वाढे नवी
निरिच्छ तो सेवी आनंदातें ८
राम म्हणे माना तैसें हित घात
जाणोनी हें चित्त शान्त ठेवा ९

(१०)

सुखदुःख भोग प्रारब्धा आधीन
कां रे नारायण विसंबिसी १
विसंबिसी सखा जो अंतकाळींचा
व्यर्थ विषयांचा धरिसी लाहो २
धरिलीया लाहो स्वामीचिया पायीं
मग तया देहीं सायुज्यता ३
सायुज्यता मुक्ति होउनियां दासी
हरिभक्तांपाशीं नित्य राबे ४

नित्य राबे सुख आनंद सकळ
होय बंदा काळ हात जोडी ५
हात जोडी तया सकळहि विश्व
जेणें केला देव आपुलासा ६
आपुलासा देव होय भावबळें
म्हणुनियां लोळें हरिपायीं ७
हरिपायीं मना लागलिया सुख
न मिळे आणिक ठाईं कदा ८
कदाहि न म्हणे असत्य वचन
राम घेई आण भाक देई ९

(११)

अंतर्बाह्य देव व्यापिला सकळ
नाहीं अळुमाळ ठाव रिता १
बाळगोनी चित्तीं हेचि आठवण
करीं कृष्णार्पण केलें कर्म २
व्यर्थ अभिमान वाहतोसी ताठा
कां होसी कष्टा सांग मूढा ३
पहातसे हरि, आहे साक्षिभूत
करीशील तेथ चोरी कैसी ४
राम म्हणे मनीं धरीं त्याचा धाक
मग तुज दुःख ओढवेना ५

(१२)

मना करीं रे विवेक । जवळी आहे मोक्ष सुख १
एथ ठाईंचीया ठाईं । साध्य मुक्ति दूर नाहीं २
शुद्ध असों द्यावें चित्त । नित्य वाणी वदो सत्य ३
शुद्ध प्रेम सर्वां भूतीं । सम भाव राहो चित्तीं ४
व्यर्थ नलगे खटाटोप । रोख द्यावें घ्यावें माप ५
शुद्ध वासना असावी । तेच शान्तिसुखातें वी ६
राम म्हणे हिताहित । हातीं आपल्याची येथ ७

(१३)

नित्य उपदेश करीतां या मना
जाहला सज्जना शीण बहु १
जलीं ओढियेली रेषा पार गेली
मना सांगीतली गोष्ट तैसी २
क्षणें पालटले धरीयेले गुण
बाणले अवगुण सोडीच ना ३
राम म्हणे खोड जन्माची बैसली
काढावया आली सहज कोणा ४

(१४)

चाल पुढें मना न घेईं माघार
कितिही अंतर असो आतां १
जाहला निश्चय न टाळीं सर्वथा

लागलीया पंथा सोडूं नको २
सतत उद्योग चालूं दे प्रयत्न
विसंबें न क्षण एकही तूं ३
न होईं निराश आलिया संकट
काम हें बिकट म्हणोनियां ४
ओघ सरितेचा वळेना पाठीसी
भेटाया सिंधूसी जाय वेगीं ५
श्रीहरीचा दास राम देई हात
वाट कां पहात खोळंबसी ६
त्वरें गांठूं चाल आनंदाचें धाम
जेथ हा आराम होय जीवा ७

# पदें

# कृष्णाचीं गाणीं

( १ )

मधुर मुरलि धरीं अधरीं हरि
या शांत निनादें विश्व भरीं ॥ध्रु.॥

शांतरूप तूं शांत मुरलिरव,
शांत ऐकुनी होत असे जीव,
शांत उठती मनीं भावहि नव नव,
नंदलाल तूं फेंक लकेरी ॥१॥

खेळ खेळ या जगत्कुंजवनीं,
खेळ सदा प्रेमाचे अनुदिनीं,
विश्वप्रेम संचरुंदे या जनीं,
भक्तजनोद्धर कृष्ण मुरारी ॥२॥

जादुगार तूं या विश्वाचा,
खेळ खेळसी अभिनव साचा,
सगुण जरी तूं निर्गुण कधिचा,
युगायुगाचा परि अविकारी ॥३॥

नाच असाची वाजवीं वेणु,
सकल हालुंदे हा भूरेणु,
वळवीं भक्त तव प्रेमळ धेनु,
गोपी सात्विकवृत्ति सुंदरी ॥४॥

तूं वनमाली जगन्माउली,
मधुर असे तव लीला सारी,

मधुर मूर्ति तव मजला प्यारी,
मधुर वर्णी गुण राम वैखरी ॥५॥

( २ )

क्षणभरीच बांसरी धरीं करीं सख्या हरी ॥ध्रु.॥
मुरलि-गान हरवी भान परम सौख्यकारी
मधुर मुग्ध गोड नाद दे प्रमोद भारी ॥१॥
भक्त-प्यार हे कुमार कुंजवन-विहारी
चित्त-चोर तूं चकोर त्रिविध-तापहारी ॥२॥
प्रणय-लीला या विमला चालं दे मुरारी
हे विहार हृदयीं कोर मदीय तूं चितारी ॥३॥
या सुखास त्यजुनी आस कोण करी न्यारी
राम-हृदय गानलुब्ध फेंक तूं लकेरी ॥४॥

( ३ )

माझी हृदयरूप मुरली । वाजवीं रे वनमाली ॥ध्रु॥
गोड प्रणयस्वर काढीं त्यांतुनी,
प्रेमीजनातें टाकीं मोहुनी,
बाह्य वृत्ति स्वरूपीं घे ओढुनी,
मोहिनी त्यांवरी घालीं ॥१॥
स्वैर फिरे गोवृंद तयासी,
लीलेनें तूं वळवीं त्वरेंसी,
वेणु लावुनी हा अधरासी,

नाद भरीं दिग्मंडलीं ॥२॥
राम जीवाचा तूं अलबेला,
प्राण-विसावा रे गोपाला,
किंकर हा तव अंकित झाला,
वृत्ति त्वत्पदीं मुरली ॥३॥

( ४ )

वाजवीत शाम वनीं मधुर बांसरी
ऐक सखे मोद होत हा मदन्तरीं ॥ध्रु॥
चुंबक लोहास घेत । ओढुनी हरि तेवीं चित्त ।
हतबल मी विवश होत । वृत्ति बावरी ॥१॥
चंचल करणें हीं सकल । होती गे बहुत विकल ।
कधि पाहिन पद कोमल । सांग ते तरी ॥२॥
चारित गोवृंद वनीं । छंदें तो गोपगणीं ।
होइन कधि त्यास बघुनी । पुनित मी खरी ॥३॥
दास राम हृदयांबुजीं । मधुकर जो होत राजी ।
गुण-रूपें तोचि आजि । नटत भूवरी ॥४॥

( ५ )

ऐक गडे बांसरिची मधुर लकेरी ।
प्रेम-लहरी उठती मम चित्त-सागरीं ॥ध्रु॥
पुलकित तनु होय पहा । आजि गमे सुदिन महा ।
पाचारी प्राणनाथ । शाम श्रीहरी ॥१॥

आला गे मारुत हा । घेउन संदेश पहा ।
कीं यदु हा बोलवी मज । म्हणुनी सत्वरी ॥२॥
जातें मी झालीया । उशिर बहुत या समया ।
येईल हा प्रिय सखया । क्रोध अंतरीं ॥३॥
राम म्हणे मोह पाश । तोडुनियां त्या उदास ।
झाल्या हरि-रूपीं लीन । सर्व सुंदरी ॥४॥

( ९ )

त्रिभुवन साक्षी कुंजवनीं या खेळे खेळ गडे ।
प्रपंच सारा टाकुन बाई चल जाऊं तिकडे ॥धृ॥
मधुर मुरलिचा ऐकुनी स्वर मज माझा विसर पडे ।
बहुविध खेळे खेळ हरि त्या पाहुन प्रेम जडे ॥१॥
निज भक्तांचा देखुन प्रेमा ठाईं त्यांस पडे ।
दास राम तत्स्वरूपीं जडतां तेथचि भेद दडे ॥२॥

(८)

चला ग कुंजवनीं आला । पाहूं तो मुरलीवाला ॥धृ॥
लताकुंजतरुछाये बैसला मांडितसे काला ।
मध्यें विराजे आपण भंवतीं मिळवुनी गोपालां ॥१॥
ध्यान मनोहर हातीं काठी खांद्यांवर शेला ।
मोरमुकुट शिरीं पीतांबर हा सुंदर कटीं कसिला ॥२॥
कपोल कोमल अधर बिंबसम इन्दु उणा झाला ।
विशाल वक्षस्थल तनु शामल कंठीं शुभ माला ॥३॥

कृष्ण कुरळ हे कुंतल येई सुगंध बहु त्यांला ।
गुण गुण करिती भ्रमर विसरुनी आपुल्या भानाला ॥४॥
काढी मंजुळ वेणुमधुस्वर सुख दे रसिकाला ।
श्याम मुखावर प्रेम जडे ग प्रपंच हा नुरला ॥५॥
गृह धंदा टाकुनी गोविन्दा पाहूं गोपाला
याच पाउलीं जाऊं तिकडे निश्चय हा ठरला ॥६॥

(८)

कुंजवनीं शोभतसे पुष्पवाटिका ।
यमुनातटीं निकट दाट वृक्ष सारिखा ॥ध्रु.॥
त्यांत नंदलाल बाल । खेळतसे विविध खेळ ।
मुरलि-रवें करित विकल । सकल गोपिका ॥१॥
गोवत्सें तेथ चरति । गोपतनय बहु जमती ।
द्विज कलकल रव करिती । मयुर सारिका ॥२॥
सुमन बकुल मालति नव । विविध वर्णु किति अभिनव ।
त्यांत भ्रमर करिती रव । सुखद सकलिकां ॥३॥
मोहक क्रीडा कुतुहल । हें सुशांत परम विमल ।
हरुनी ताप देत सकल । मोद पांथिका ॥४॥
दिव्य स्थल रम्य पूत । लुब्ध तेथ रामचित्त ।
आठवुनी नित्य घेत । त्याच त्या सुखा ॥५॥

(९)

कपटी मोठा कृष्ण चोरटा ऐका ग साजणी ।

चित्त चोरिलें माझें जातां धेनु घेऊनी वनीं ॥ध्रु.॥
ठुमकत मुरडत चाल चालतां घनःश्याममूर्ति ।
नयन वेधुनी जाती विसरें मजला मी पुरती ॥१॥
अधरीं धरुनी वेणु वाजवी मंजुळ ध्वनि उमटे ।
गडे ऐकुनी हृदयीं माझ्या प्रेम पूर्ण दाटे ॥२॥
केव्हां भेटे सांग सखे तो आतां यापुढती ।
प्रेमपाश दृढ घालुनी त्याला ठेविन गे चित्तीं ॥३॥
मन झालें तल्लिन जनलज्जा सोडुनीयां सारी ।
राम म्हणे गोपिका जाहल्या उदास संसारीं ॥४॥

(१०)

चला सख्यानों जाऊंया । नंदनंदना पाहूंया ।
प्रेम-हार हा वाहूं या । लीन तत्पदीं होऊं या ॥१॥
श्यामलतनु सुकुमार हरि । दिनमणि तेजें लोप करी ।
मुरलीतें धरि जो अधरीं । मोहित करि तो या हृदया ॥२॥
रास रचो जो कुंजवनीं । विश्वतात जो वंद्य जनीं ।
अवतरला हो या भुवनीं । तो कंसादिक हननाया ॥३॥
गो सज्जन प्रतिपाल करी । दीन नाथ हें बिरुद धरी ।
निज भक्तांसी सुखकारी । सोडवि बंधापासुनी या ॥४॥
सुजना वाटे कैवारी । कुजनातें हा सत्य अरी ।
जननीतें हा बाळ हरि । अनंत धरि नटवेषा या ॥५॥
मुकुंद माधव मेघःश्याम । पावन ज्याचें मंगल नाम ।

प्रेमभरें हा वर्णी राम । सद्यश त्याचें गाऊंया ॥६॥

(११)

हरि यमुनेच्या तटीं देखिला गडियांसमवेत ।
शिलासनावर बसुनी काढी मुरलींतुनी गीत ॥१॥
धन्य धन्य त्या कुंजवनींच्या सजणी पुष्पलता ।
हर्षे घे हरि वास तयांचा तोषवीत चित्ता ॥२॥
तसेंच गमतें यमुनेचें त्या सखये सौभाग्य ।
शमन कराया तृषा नित्य पी जीवन श्रीरंग ॥३॥
तसेच द्विज ते खरे सुदैवी मयुरादिक सारे ।
लीलेनें शिरीं खोवी हरि हा त्यांचे सुपिसारे ॥४॥
व्रजभू तैसी भाग्यशाली बघ गमते मज बाई ।
करी चरणस्पर्श तो पुनित तिज जातां हरि पायीं ॥५॥
तशींच गोवत्सें किति वानूं त्यांचें ऐश्वर्य ।
सदा जोडिला नंदतनय हा सन्निध यदुराय ॥६॥
धन्य कांबळा काठी मुकुटहि हातींचा वेणु ।
पीतांबर तो धन्य कटींचा गडे काय वानूं ॥७॥
यांत गमे हतभागी बघ कशांत नच कांहीं ।
संगाविरहित होऊन होतें पादत्राण पायीं ॥८॥

(१२)

ऐक सखी ये विचार आजि हा मनीं ।
कीं झालें सार्थक ना काहीं जन्मुनी ॥ध्रु.॥

यमुनातट सन्निध जरि । चंड शिला होऊन बरी ।
पडतें तरि होतें गे, धन्य त्रिभुवनीं ॥१॥
कांढीता वेणुनाद । नंदतनय तो मुकुंद* ।
घेता विश्रांति कधीं, तेथ बैसुनी ॥२॥
कुंजवनीं वृक्षलता । होतें तरि बघ करिता ।
जीवितास पुनित हरि, स्वकरीं स्पर्शुनी ॥३॥
होतें जरी धेनुरूप । सेवीता दुग्धतूप ।
गोवर्धन गिरिधारी, जाण साजणी ॥४॥
मयुरपिच्छ असतें जरि । खोवीता मुकुटीं तरि ।
धरिता होतें बांसरीं, अधरीं लावुनी ॥५॥
राम म्हणे कोणत्याहि । होउ मिषें भलत्याही ।
लागो हा देह आतां, स्वामीकारणीं ॥६॥

(१३)

हृद्विचाररूप सखी विश्वनायका ।
पोंचवील माझी तुज प्रेम-पत्रिका ॥ध्रु.॥
जाणोनी प्रणयाला । करिं आपुली ही अबला ।
साहुं कशी विरहाला । सर्वव्यापका ॥१॥
वाटतें स्मशान सदन । झालें बघ म्लान वदन ।
नावडेहि आभूषण । सौख्यदायका ॥२॥
न सुचे मज वेणि-फणी । नीज न ये सुखशयनीं ।
प्राणप्रिया तूंच मनीं । प्रकटसी ठका ॥३॥

व्याकुळ हे दीन सखी । तुजविणरे होय दुःखी ।
करिं आलिंगोनी सुखी । विश्वनायका ॥४॥
नच लावी उशिर क्षण । जातिल हे पंचप्राण ।
त्वरित चाल तूं सुजाण । दुरित छेदका ॥५॥
पडतां हें वच कानीं । ऊठ त्वरें चाल झणीं ।
आशंका नाणिं मनीं । असुर भेदका ॥६॥
पाठविली असती हरि । अन्य सखी कोणि तरी ।
वाटे होईल परि । प्रतिस्पर्धिका ॥७॥
निवडियली म्हणुनि बरी । ही विचारदूति खरी ।
जाया तुजपाशीं हरि । मोक्षदायका ॥८॥

(१४)

हरि हा वेळ किती झाला । कोठें होतां हो रमलां ॥१॥
कवणें मोहियलें सांगा । तुम्हातें आजि श्रीरंगा ॥२॥
विखुरले कुंतल हे कां जी । वाटती श्रम झाले आजि ॥३॥
मळवट भाळींचा मळला । मुखेन्दु कां कोमाईला ॥४॥
दिसती रक्तवर्ण नेत्र । घर्में भिजलें अंगवस्त्र ॥५॥
अधरीं कवणाचा स्पर्श । जाहला मजसी आदर्श ॥६॥
चुरली पुष्पमाळ कंठीं । सांगा कां ते जगजेठी ॥७॥
रामा प्रेमळ संवाद । ऐकुनी झाला आनंद ॥८॥

(१५)

दाखवीं शामरूप नयनीं । प्रसवली धन्य तुला जननी ॥१॥

पहातां चरणपंकजातें । हृदीं ये प्रेमाचें भरतें ॥२॥
पुरे हा तुझा नृत्यछंदु । निढळीं आले घर्मबिंदु ॥३॥
वाजती रुमझुम पदिं वाळे । पाहुनी निवती हे डोळे ॥४॥
होऊंदे तुझा अंगसंग । वृत्ति त्वद्रूपीं हो गुंग ॥५॥
मुकुंदा राजीवनयना । रामहृद्वासी भवशमना ॥६॥

(१६)

सखये माधव कोठें प्यारा ।
राजिव लोचन श्यामलतनु ज्या मुकुटीं मोरपिसारा ॥ध्रु.॥
वनें उपवनें फिरुनी श्रमलें नाहीं चित्ता थारा ।
तळमळतो मनमीन सुखाचा झरा आटला सारा ॥१॥
राम म्हणे मज गमे विश्व हें उदास त्याविण कारा ।
त्या प्रभुसाठीं मम तनुमनधन व्यापहि होता सारा ॥२॥

(१७)

द्वाड तुझा मुल हरि । यशोदे । द्वाड तुझा मुल हरि ॥ध्रु.॥
यास न लज्जा भीति कुणाची दिवसा चोरी करी ।
व्रजललना आम्ही कुलिन कसागे भीड मुळीं ना धरी ॥१॥
यमुनेलागीं स्नाना जातां तेथ कदंबावरी ।
वसन घेउनी चढतो बाई आम्हा वांकुल्या करी ॥२॥
मथुरेलागीं गोरस नेतां मार्गीं धरितो निरी ।
नये गोकुळीं वास कराया खचित आम्हा यावरी ॥३॥
लाड पुरविसी कोड तयाचें जोड नव्हे हें बरी ।

खोड मोडीं गे कदा पुनरपि करिना ऐसी परी ॥४॥
राम म्हणे बोलती गोपिका जनापवादावरी ।
सांठविला परि जगद्वंद्य हा निज हृदयमन्दिरीं ॥५॥

(१८)

श्रीवरा, भुवनसुंदरा, करुणसागरा, मुकुंदा येई ।
तूं जिवलग माझा प्राण देह मन तूंही ॥ध्रु.॥
मी कांती तव तूं हिरा चमकशी हरी ।
तूं पुष्प असशि मी त्यांतिल रे माधुरी ।
तूं वृक्ष तुझी मी लता शोभतें बरी ।
तूं पदार्थ मी सावली,
तूं रवि मी किरणावली,
तूं मधुरव मी बांसरी,
हा असा, त्यजुनी राजसा, जासि मग कसा, फीर रे मागें ।
हो सोडिल का तुज अशी राधिका सांगें ॥१॥
तुज बांधिल हा दृढ प्रणयपाश घालुनी ।
ही राधा भोळी वाटे तुज का मनीं ।
तरि सोड मुकुंदा सारा भ्रम हा झणीं ।
मी लहरी तूं जीवन,
मी शरीर तूं मत्प्राण,
मी शब्द अर्थ तूं जाण,
तूं जेथ, असें मी तेथ, उगिच कां येथ, करिसि मग चाळा ।

मी तुझी राधिका धरीं हृदयीं वेल्हाळा ॥२॥
हे बोल ऐकुनी त्रैलोक्याचा धनी ।
निजवक्षस्थलीं घे राधेसी पेलुनी ।
प्रिय भक्त प्रभुला थोर रुक्मिणीहुनी ।
ती राधा तो घननीळ,
जीव-शिवास पडला मेळ,
भेद ना यांत अळुमाळ,
हा राम, घेत आराम, गात तें नाम, मुखीं अनुदिन ।
हे धन्य राधिका धन्य धन्य तो कृष्ण ॥३॥

(१९)

खेळ भिंगरी हरि खेळ आतां तरी ।
सोड पुरे तव मुरली न धरीं करीं ॥ध्रु॥
मुरलीनादें वृत्ति स्थिरावली ।
जीवबंधनें सर्वहि तुटलीं ।
भज्य-भजक भावना नुरे बघ,
एकरूपता होय खरी ॥१॥
गोड समाधि गोड नको ती ।
स्नेहबंधनें राहो पुरतीं ।
हृदयेश्वर तूं दास तुझा मी, ।
हीच कल्पना फार बरी ॥२॥
फिरवीं आत्मा गरगरगरगर ।

तुज भंवतीं त्या फिरुंदे भर भर ।
नाच तूंहि त्या असाच नाचवीं,
नाच चालुंदे विश्वभरी ॥३॥
राम जीवाचा प्यार सखा तूं ।
पुरवीं धरिला हृदयीं हेतु ।
विनती तुजला केली प्रभुजी,
या दासाची मान्य करी ॥४॥

(२०)

प्रेमळ राधा-मन-सुमनीं । बैसला भ्रमर चक्रपाणि १
सेवी प्रेम मरंदातें । झाला लीन सदा तेथें २
न वाळे राधा-मन-सुमन । वाहे प्रेमरसें भरून ३
मग का विटेल अलि कृष्ण । जो कीं रसिकराज पूर्ण ४
धन्य ते राधा राम म्हणे । केला आपुला कृष्ण जिनें ५

संग्रहालय ठाणे

हे केशव हे मुकुंद माधव छंद तुझा लागला ।
त्यजिला हा संसार सकळहि मज विषवत् भासला ॥१॥
धरिलें तुज निज हृदीं वल्लभा कांता रमणा जशी ।
तूंच हंस मन्मानससरसीं सर्वकाळ पोहसी ॥२॥
तूं जीवाचा जिवलग माझा सर्व तुला अर्पिलें ।
तुजविण आतां सकल विश्व मज शून्य असे जाहलें ॥३॥
प्रथमारंभीं रूप तुझें जंव नेत्रीं या पाहिलें ।
तों विस्मृतिचें पटल भंगलें पूर्वस्मरण जाहलें ॥४॥
जागृत झालें सुप्त प्रेम तें खळबळ उडली हृदीं ।
संचरलें नवजीवन त्याचा अनुभव नव्हता कधीं ॥५॥
शशिमुख अवलोकितां सागरा लहरी चढती जशा ।
हृदयसागरीं आनंदोर्मी तेव्हां निघती तशा ॥६॥
मुग्धा कलिका बाला विकसे रविकर अवलोकुनी ।
तशीच झाली मत्प्रेमाची गति सखया ते क्षणीं ॥७॥
हाय! हाय! परि वीज चमकली दृष्टिस न पडे पुन्हा ।
कां दैवाचा घाला केला काय असा मी गुन्हा ॥८॥
स्वमुखीं घाली ग्रास बुभुक्षित तोंच ओढिला कुणी ।
तसेंच झालें मजला येथें शून्य तुजविणें जनीं ॥९॥
वीज चमकली नसे मिळाली वेध लागला मनीं ।
कुठें दडालें रूप तुझें जें पाहियलें लोचनीं ॥१०॥

प्राणवल्लभा अससी कोठें लाभसील मज कसा ।
कृपण धनाविण मीन जळाविण मी तुजविण ही तसा ॥११॥
अखेरचा घेतला जगाचा निरोप मी मोकळा ।
तुजसाठीं बघ फिरेन सारा विश्वरूप हा मळा ॥१२॥
हुडकिन तुजला जनीं वनीं या पाताळा फोडुनी ।
अससी जेथें जाईन तेथें येईन तुजमागुनी ॥१३॥
सप्तसागरा ओलांडुनियां लाविन तुमचा छडा ।
अहो प्रियकरा जाईन उलटुनि आला मार्गी कडा ॥१४॥
तुमच्यासाठीं त्यजिलें धन जन हें कांचन कामिनी ।
मन्मानसिच्या राया तुम्ही प्रिय मज प्राणांहुनी ॥१५॥
परस्परांमधीं नरनारीचा भाव न जरि राजसा ।
लग्न लागलें दोघांचें हा योग विधीचा असा ॥१६॥
प्रेमबद्ध हें कोण कळेना मी कीं तूं ईश्वरा ।
कुणी असो परि तेव्हांपासुनी तूं माझा मोहरा ॥१७॥
ऐसें असतां गेलासी तूं टाकुनी मजला कुठें ।
या दीनाचें दुःख पाहुनी पाझर दगडा फुटे ॥१८॥
तूं तर पुतळा या करुणेचा कां धरिला रोष हा ।
हाक मारुनी कंठ शोषला थकलासे जीव हा ॥१९॥
धाव दयाळा उशिर न लावीं शीण बहुत जाहला ।
सत्व पाहसी दीनाचें का प्राण असे चालला ॥२०॥
दे आलिंगन अंकावर घे घे चुंबन एकदा ।

तुझ्याच नामीं तुझ्याच रूपीं जीव रंगला सदा ॥२१॥
कां न आवडे तुला प्रभो मी काय उणें पाहिलें ।
खरेंच नाहीं गुण-रूप मला प्रेम तुला वाहिलें ॥२२॥
इतुकें असुनी त्यागिसी जरि मज याच जनीं या स्थळीं ।
याच भूवरी त्यागिन प्राणा मज करमेना मुळीं ॥२३॥

(२)

हे तुज विनती जगदीश्वरा । देईं स्वपदीं थारा ॥ध्रु.॥

नलगे मज संपदा अशाश्वत ।
सुत वनिता सुख जें कीं खंडित ।
तव भजनीं मन जडो अखंडित ।
ने विलया मद सारा ॥१॥
दास राम हा बहु अज्ञानी ।
कृपाकटाक्षातें या फेंकुनी ।
दुरित सकलही टाकीं जाळुनी ।
रक्षीं करुणाकारा ॥२॥

(३)

देईं अभयदान मजला । हेंची मागतसें तुजला ॥१॥
पडलों प्रपंच आवर्ती । काढीं, उज्वल तव कीर्ति ॥२॥
दयाळा प्रसन्न हो बापा । शरण मी शमवीं भवतापा ॥३॥
जाचती शठ षड्‌री घोर । रक्षीं अनाथ हें पोर ॥४॥
पडलों उघडा बाजारीं । देवा दीना या तारीं ॥५॥

प्रसन्न हो करुणामूर्ति । पुरवीं दासाची आर्ति ॥६॥
तुझिया विमलपदा दावीं । मस्तकीं अभय करा ठेवीं ॥७॥
मी बहु अनाथ अपराधी । करीं तूं क्षमा कृपेचा धी ॥८॥
दयाळा समर्थ तूं होसी । भक्त जे मोक्ष तयां देसी ॥९॥
लागतो दास राम चरणीं । करीं मज मुक्त जन्ममरणीं ॥१०॥

(४)

प्रभुजी आश्रय दे चरणीं ।
दीनभणंगापरी फिरावें कुठवर सांग जनीं ॥ध्रु.॥

वश लोभातें स्वार्थी प्रीति । प्रेमास्तव हें प्रेम न करिती ।
ऐसे मानव असती जगतीं । नाहिंच वाली कुणी ॥१॥
मान धनासी गुणा न पुसती । स्नेहालागीं विसरुनी जाती ।
अंध अशी हे लोकीं रीती । उपरति होय मनीं ॥२॥
अकपट प्रेमा दुर्मिळ झाला । विषयीं रमतां वेळहि सरला ।
जीव सुखातें चिंतुनी झुरला । गेला बध्द श्रमुनी ॥३॥
राम विदेशी न करीं आतां । प्रणति तुला हे आहे नाथा ।
तूं भक्तांचा अससी त्राता रमलों तव भजनीं ॥४॥

(५)

देवा दावीं विमल तव पाय ।
पुरे पुरे हा त्रास सोसिला अधिक न सहवे हाय ! ॥ध्रु.॥
फिरलों योनी बहुत कितिक मी श्रमलों हे प्रभुराय ।
परि न फिरे मन मागें अजुनी इच्छि विषय करूं काय ॥१॥

होती अनावर नाकळती मज हे इन्द्रियसमुदाय ।
या भवबंधीं जखडुनी गेलों नाहींच तरणोपाय ॥२॥
तापत्रय हा दग्ध करी मज कांहीं सुचे न उपाय ।
धाय धाय मोकलुनी रडतों द्रवसी तूं नच माय ॥३॥
राम म्हणे करी कोण कृपा वद मी तर हा असहाय ।
आस पदीं तव धरुनी त्यजिला अन्य सकल व्यवसाय ॥४॥

(६)

प्रिय नाथ कुठें तूं वससी हरी ।
मी सांग तुला किती बाहूं तरी ॥ध्रु.॥
विरहाकुल मन बघ तळमळतें ।
युग सम वाटे मज पळ पळ तें ।
घळ घळ वाहे अश्रुजळ तुज कळकळ कशी ना सांग तरी ॥१॥
कां नुचले तव पाउल अजुनी ।
का न पडे आर्तस्वर कानीं ।
कोंडुनी सदनीं सखिच्या रहासी कमला धरी तुज काय करीं ॥२॥
कीं न असें प्रिय प्रियकर मी तुज ।
तें तरी स्वामी समजूंदे मज ।
भग्न हृदय मग मदीय जाळुनी टाकिन पंचप्राण चितेवरी ॥३॥
इच्छित किंकर राम भेटी तव ।
झुरतो अनुदिनीं त्यासाठीं जीव ।
अंत न आतां पाहीं प्रभो करी दर्शन देउनी आस पुरी ॥४॥

(७)

नेई लया घोर संसार सारा ।
दे शान्ति चरणीं तुझिया उदारा ॥ध्रु॥
करीं मुक्त हा भक्त अनुरक्त पायीं ।
नच हा भवासक्त अभयास देईं ।
रवि तूं हरीं वासना अंधकारा ॥१॥
षडरि प्रभो ताप देती मला फार ।
करीं दूर जे कीं सकलांस अनिवार ।
देवा अनाथास तूं तारणारा ॥२॥
राम नत वरद कर ठेवी या मस्तकीं ।
हरुनी दुरिता करीं दास आपुला सुखी ।
वर्षे सुधा चंद्र तूं या चकोरा ॥३॥

(८)

तव कृपा सुधारस धारा । वर्षोदे नंदकुमारा ॥ध्रु.॥
पडलों या मरणद्वारीं । वांचवी कोण कैवारी ।
हांक मी प्रभो तुज मारीं । या दीना तारीं उदारा ॥१॥
रमलों या विषयविलासीं । मानिला स्वर्ग भव त्यासी ।
अडकलोंच परि यापाशीं । मजला तूं सोडविणारा ॥२॥
किंकरा निजपदापाशीं । तूं ठाव देईं ऋषिकेशी ।
मज नको करूं परदेशी । तूं माझा पंचीप्यारा ॥३॥
हा राम हृदीं तुज ठेवी । जरि भोग प्रपचीं सेवी ।

नाहींच सौख्य या जीवीं । तुजविणें व्याप हा सारा ॥४॥

(९)

हे वल्लभ गोविंद मुरारी ।
श्रमलों, भ्रमलों, विटलों अंतीं कोण आतां तारी ध्रु.

तूं हृदयाचा स्वामी असतां ।
अर्पियलें तें विषयांकरितां ।
फसलों परि तेथहि नाथा ।
झाली निराशा जाण पुरी ॥१॥

योग्य विषय तूंची प्रेमाला ।
कळत न होतें अजुनी मजला ।
होता या मतिला भ्रम पडला ।
दीनदयाळा क्षमा करीं ॥२॥

सोडी न आतां राम चरण तव ।
नश्वर सारा तुजवांचुनी भव ।
घे पदरीं या दासा केशव! ।
अंत न पाहीं न दूर करीं ॥३॥

(१०)

मम हृत्कुंजवनीं करीं लीला ।
हरि हा मांडों भक्तिचा काला ध्रु.

प्रेमवनश्री किती बहरली ।
विकसित झाल्या श्रद्धावेली ।

अष्टभाव अष्टांगांनीं हा ।
पहा पहा रे वसंत फुलला ॥१॥
क्रीडांगण तव हें वनमाली ।
नाच, मधुर हरि वाजवीं मुरली ।
वृत्ति बघत बघतां विरली तुज ।
जीव सख्या त्यायोगें धाला ॥२॥
राम मना आराम श्याम तूं ।
पुरवीं इतुका धरिला हेतु ।
तूं दीनाचा स्वामी तुझिया- ।
विनत चरणीं बघ मी गोपाला ॥३॥

(११)

मधुकर तूं वनमाळी ।
या बैस हृदय-कमळीं ॥ध्रु॥
मधुर प्रेमरस हा चाखीं ये ।
तुजसाठीं हें राजीव आहे ।
रंजिस आलें तुजविण छंदें ।
तूं बघ रुंजी घालीं ॥१॥
स्पर्श सुखाचा हा तव तनुचा ।
घडो निरंतर त्याला साचा ।
हाच तयाचा हेत फुलोंदे ।
पाकळी मोकळी झाली ॥२॥

उशिर तुला होतांची रसिका ।
बसतिल येथें अन्य मक्षिका ।
म्लान होऊनी पडेल किंवा ।
ग ज प द-घा तें खा लीं ॥३॥
राम म्हणे मग लाभेल कसें ।
सांग तुला तें मृदुलतर असे ।
त्यागिसी त्यातें व्यर्थ म्हणो तरी ।
फु ल लें आ ज अ का लीं ॥४॥

(१२)

शरण चरणीं येतसे दास हा दीनदयाळा तार ।
चित्त वळेना काम जळेना विषयमोह अनिवार ॥१॥
पहातों अभ्यासें जिकाया इन्द्रियग्राम अपार ।
परि हा पाश सुटेना ओढी मागें वारंवार ॥२॥
मज समजे हा मिथ्या अवघा मायिक रे संसार ।
परंतु नुमजे कसें यांतुनी सांग पडावें पार ॥३॥
कोण 'मी' 'माझें' झाला याचा असह्य आतां भार ।
तुजविण दीना साह्य असा कुणि सांग घेई कैवार ॥४॥
दास राम संतप्त कृपाघन तूं वर्षोदे धार ।
पूत करीं हा पतित उघडीं या सत्वर मोक्षद्वार ॥५॥

(१३)

काय हें नाहीं, नाहीं मुळि नाहीं, प्रभो या दैवीं सुख काहीं १

टोंचितें शल्य, शल्य नित्य हृदयीं, किमपि हे शांति नसे विषयीं २
धरिलिसे आस, आस, तुझी सदया, विनत मी शरण तुझे पायां ३
छळिती त्रयताप, तापत्रय शरिरा, कोण दे दीनासी थारा ४
तुजविणें देवा, देवा नच आतां, ठाव हा कोठें या पतिता ५

(१४)

घोर तम जाळी बघ नित्य चिंता मना
सांग तुज कां प्रभो हे दया येइना ॥ध्रु.॥
विफल विषयीं रमे हृदय मम हें खुळें ।
भ्रमवी जीवासहि नाकळे नावळे ।
मुक्त करीं भक्त तव करितसे याचना ॥१॥
त्यजुनी तव सद्यशा प्रेमगाना करीं ।
मोह नकलीच तो प्रेम कसलें हरि ।
कळत परि वळत नच होती बहु यातना ॥२॥
राम आराम तव चरणीं मागे हरि ।
षड्रिपु नेईं लया या भवातें हरीं ।
दे कृपादान मम पुरवीं हे वासना ॥३॥

(१५)

प्रणति तुला हे दीनदयाळा देवा शंकरा ।
करीं यशगान तुझें अभया मज देईं पामरा ॥ध्रु.॥
सौख्य विलास, त्यजुनि उदास, स्मशानवास,-
हा वरिला, धरिला तव चरणीं आतां आसरा ॥१॥

प्रभु बघना, खचित सुना, प्रेमविणा,–
छेडुनी, जीव तसाचि भरी निःशब्दें अंबरा ॥२॥
तांडव नाच, करित उगाच, सार न साच,–
त्यांत, तरी करीं मान्य तया तूं तोषें ईश्वरा ॥३॥
मज पुढती, चिता किती, धडधडती,
भग्न हृदय मम जाळिन येथें आशा भंगुरा ॥४॥
राख हरे!, ते तुजरे, शुद्ध बरें,
अर्पिल भावें दास राम तव धरुनी आदरा ॥५॥

(१६)

तव पद-पद्मीं चित्त ठरो ।
दृश्याभास समूळ विरो ॥ध्रु॥
होउनियां अभिमानरहित हें ।
शुद्ध अशा या भक्ति स्नेहें ।
विकल न हो विषयांच्या मोहें ।
सेवा तुझीच करो ॥१॥
कमलदलापरि अलिप्त राहुनी ।
नित्य प्रपंचीं कर्माचरुनी ।
तूंच जगीं नटलासी जाणुनी ।
ध्यान तुझेंच धरो ॥२॥
बाह्य उपाधिस व्याधि लेखुनी ।
सहज समाधि भोगु निशिदिनीं ।

मायामय विश्वांतर तोडुनी ।
सच्चिद्रूपीं मुरो ॥३॥
राम म्हणे या आशापाशा ।
भगवंता गुंतो ना सहसा ।
तुझिया प्राशोनी भक्तिरसा ।
मायिक हें विसरो ॥४॥

(१७)

भवाब्धिमधीं या बुडतों काढीं देउनियां पाणि ।
अशा संकटीं त्राता तुजविण नसेचि बा कोणी ॥ध्रु.॥
येथ उठति या उर्मी किति तरी या संकल्पाच्या ।
सांपडलों आवर्तीं आतां मार्ग नुरे साचा ।
निर्वाणीं तुज बाहें अंत न पाहीं दासाचा ।
चुकलों मागें आतां ठेवीं मस्तक तव चरणीं ॥१॥
सदय हृदय तव पूर्ण कृपेचा सोडीं पाझर ।
रोष न करीं दीनातें आतां लोटुं नको दूर ।
कठिण समय हा मिळे न जरि तरी हरि तव आधार ।
पार बुडालों कसें पहावें सांग तुला नयनीं ॥२॥
मोकलील जरी बाळा माता स्नेहपाश खुडुनी ।
तरी कुणाचे गळां पडावें सांगें सुखदानी ।
राम बिलगला पदकमलीं हा जाई न सोडोनी ।
मारीं अथवा तारीं आतां तुजपाशीं दोन्ही ॥३॥

(१८)

विनत पदीं गोपीहृदयरमणा ।
येऊंदे करुणा तुज जगजीवना ॥ध्रु.॥
सांपडलों भवदावानलीं या ।
कृपाघना वर्षें यदुराया ।
कोण दुजा मज मुक्त करी, तुजविणें असुरहनना ॥१॥
अनंत अपराधांच्या कोटी ।
दीनदयाळा घालीं पोटीं ।
दूर न लोटीं घे पदरीं मज, मुकुंद खलदमना ॥२॥
दास राम शरणागत भावें ।
तुजला तनमनधन सर्वस्वें ।
अंत न पाहीं आतां हे श्रीपति, उरगशयना ॥३॥

(१९)

त्राहि, त्राहि मां भो सद्गुरुवर
हा भव दुस्तर यांतुनी उद्धर ॥ध्रु.॥
ज्ञानधनातें हरिती तस्कर ।
काम क्रोध मद आणिक मत्सर ।
सुखकर भयहर गुरुवर तुजला,
शरण असे हा अनाथ किंकर ॥१॥
त्रिविध ताप करी हे तनु जर्जर ।
पंचविषयीं या लोलुप अंतर ।

इच्छि अभय वर ठेवीं वरद कर,
त्वत्पदकमलीं अर्पियलें शिर ॥२॥
कृपाकटाक्षें विलोकितां नर, ।
होतो ईश्वर पूर्ण परात्पर ।
अति अनुपम कृति अतुल पराक्रम,
हा तव वानूं काय मी पामर ॥३॥

(२०)

बघत वाट नीट उभा निकट कधीं येसी ।
तुजविण प्रभु जीव जाण जाहला उदासी ॥ध्रु.॥
गमत सकल सुख असार । गात तुझें नाम सार ।
छंद जीवा हाचि थोर । भेट कधीं देसी ॥१॥
दावीं मृदुल चरणकमल । करीं न आस मदीय विफल ।
वाहियलें तुजसि सकल । प्यार जीवा होसी ॥२॥
ऊठ झणी वेग करीं । अंत नको पाहूं हरि ।
हो सखया आज तरी । राम हृदयवासी ॥३॥

(२१)

वारंवार; गांजी मज माया फार ॥ध्रु.॥
दावुनी सुखाशा फसवी,
मज क्षणांत हंसवी रुसवी,
इन्द्रजाळ भंवती वसवी,
धन ललना हा संसार ॥१॥

वागुरा कुरंगा पसरी,
तो व्याध तयांचा वैरी,
मजलागीं तेवीं मुरारी,
घाली हा बंध अनिवार ॥२॥
सोडवी कोण यांतोनी,
शरण मी तुला वरदानी,
मज मुक्त करीं ने चरणीं,
हा व्याप पुरे निःसार ॥३॥
मन चंचल भटके भारी,
कोण रे प्रभो कैवारी,
हा अनाथ, नाथा तारीं,
सोसवे न आतां भार ॥४॥

# स्फुट

( १ )

आत्मरूपभानु हा उदेला मोहनिशी सरली ।
ज्ञानकिरण फाकतां चित्तशशिभा काहीं नुरली ॥ध्रु॥
सन्मतिकमळें विकासलीं या सुबोधकासारीं ।
विवेकमारुत घनप्रवृत्तिस दूर दूर सारी ॥१॥
स्थूल सूक्ष्म कारण अतिकारण मावळले तारे ।
आत्मप्रकाशामधीं जाहले लुप्तचि हे सारे ॥२॥
शान्तिक्षमाद्विज कलरव करिती आनंदें डुलती ।
उषा सुखद सुखलहरी उठवी दास राम चित्तीं ॥३॥

( २ )

कर्णधार गुरु भवजलधिमधीं करिल मला त्यापार ।
दुर्धर मोहावर्तीं जरि या केलासे संचार ॥ध्रु॥
भीति न संशयलहरी यांची जरि उठतील अपार ।
दुर्मतिचा या झंजामारुत सुटेल जरि अनिवार ॥१॥
काम क्रोध मद मीन करिति जरि निजपुच्छाचा वार ।
राम म्हणे भय किमपि न धरीं मी बळकट हा आधार ॥२॥

( ३ )

हा संसारडोह अति खोल ।
बुडेल जरी कुणि जाउनी तोल ॥ध्रु॥
तरि गुरुविण वरी येईल ऐसी आशा करणें फोल ।
म्हणेल कुणि बलवान् असा मी व्यर्थ तयाचे बोल ॥१॥

(८)

अहो मी ब्रह्म सदा शुद्ध । नसेंची बाल तरुण वृद्ध ॥१॥
जाणा दिसते जी माया । अवघी माझिच ते छाया ॥२॥
निरामय निर्गुण अव्यक्त । नव्हें मी वेदांसी व्यक्त ॥३॥
राम हा विराम सकलांचा । तसाची निधि आनंदाचा ॥४॥

(९)

भो प्राणनाथ येईं । मम हृदीं नित्य राहीं ।।ध्रु.।।
मंच जीव सुंदर हा । वरति प्रेम-शेज पहा ।
आरुढ हो त्यावर मी । लागतसें पायीं ॥१॥
होतांची दर्शन तव । सात्विक हे उठति भाव ।
खळबळुनी चित्त सर्व । प्रेमपूर वाही ॥२॥
पूजनें तुम्हास नाथ । तोषवीन सत्य सत्य ।
राहिन होवोन विनत । एक वासना ही ॥३॥
जड तत्त्वें तितुकि सर्व । जाळिन त्यांसहित गर्व ।
हाचि धूप दाखवीन । शुद्ध भावना ही ॥४॥
ओवाळीं पंचारति । पंचप्राण पंच वाती ।
सूक्ष्म असें उरलें अति । पंचभूत तेंही ॥५॥
काम क्रोध केर सकल । झाडुनियां करिन अमल ।
क्वचित अशुद्धास येथ । मुळीं वास नाहीं ॥६॥
प्रणयी बघ राम तुझा । लावी हे प्रेम ध्वजा ।
प्रेमरूप भज्य भजक । भेद नसे काहीं ॥७॥

(१०)

सेवूं हा वनवास ॥ चला हो ॥ ॥ध्रु.॥

सुरम्य ते तरु-लता पक्षिगण देती मोद मनास ।
निष्कपटी त्या श्वापदवृन्दीं करूं सुखानें वास ॥१॥
काम क्रोध मद लोभादिक रिपु चुकेल यांचा त्रास ।
कान्ता सुत धन धाम मान हा सर्व असे आभास ॥२॥
शय्या भूमि उशी शिला ते आच्छादन आकाश ।
तेथ नसे मायाममतेचा कुणा कशाचा पाश ॥३॥
जिकडे तिकडे निसर्ग सुंदर होत बहुत उल्हास ।
तेथ धरीतिल तालहि निर्झर करूं हरिगुणगानास ॥४॥
राम म्हणे पल जातें घडि निशि दिवस आणि हा मास ।
करूंच सार्थक पडेल ना तर अंतीं हा यमपाश ॥५॥

(११)

स्मरे जो अखंड प्रभुराय । करिल मग भवभय त्या काय १
कृतांतहि कर जोडुनी ठाके । सुरपति इंद्रहि त्या वचके २
वसति हे चित्तीं श्रीहरिची । जरी, जणु कल्पद्रुम त्याची ३
मग त्या पडे उणें काय? । वृद्धि हे सकलांची होय ४
सिद्धि अणिमादिक या दासी । राबती त्या घरीं दिवसनिशीं ५
घरासी कामधेनु आली । पुरविती मनःकाम झाली ६
पडेना न्यून विषय काहीं । पुरे जे आस असे हृदयीं ७
किंवा तो दिनमणि वश झाला । उणें का मग ये तेजाला? ८

काय मग काज दीपकाचें । तसें तें अल्प काजव्याचें? ॥९॥
राम नत हरिचरणीं झाला । मनीं या पूर्ण असे धाला ॥१०॥

(१२)

स्मरण तुझेंचि घडो ॥ भगवन् ॥
या विषयांचा विसर पडो ॥ध्रु.॥
दृश्य जडापासुनी हे वृत्ति पहा स्वरूपीं मुरडो ।
चित्सुखसेजे समाधिकुहरीं जीव सदा पहुडो ॥१॥
सद्गुरुवाणी येउनी कानीं मतिमल सर्व झडो ।
राम म्हणे माया भ्रम निरसुनी ज्ञानदिठी उघडो ॥२॥

(१३)

येईल ऐसा योग ॥ कधीं का ॥
द्वंद्व सकल नासुनी घडे का निजरूपीं संयोग ॥ध्रु.॥
विश्वपटांतरीं एकचि तंतु । जाणुनी मतिला न उरे किंतु ।
आत्मानुभवीं जीव रंगुनी, सरेल संचितभोग ॥१॥
या निजगुजवस्तुस उमजोनी । उद्भवेल का समता हे मनीं ।
तत्त्वमसि पदा जाणुनी ही का, घेईल बुद्धि जोग ॥२॥
राम म्हणे गुरुकृपा औषधी । मज दीनातें मिळेल का कधीं ।
जुनाट जडला भिडला हा हृदीं, जाइल का भवरोग ॥३॥

(१४)

माया हे अनिवार ॥ प्रभुची ॥ माया हे अनिवार ॥ध्रु.॥
भल्या भल्याशीं पाशीं गोवी बिकट असे हे फार ।

दृश्य अशाश्वत कळलें करिती तेहि पुन्हा संसार ॥१॥
समजे सर्वहि उमजेना परि होय मतिस अविचार ।
सुरासुरादिक मोहित झाले तसे मुनींचे भार ॥२॥
आमिष दावुनी भुलवितसे हे वैभव गृह सुत दार ।
राम म्हणे हरि कृपा करी तरी जीव होय भवपार ॥३॥

(१५)

माता ही मानिली देवता पूज्य सुतालागीं ।
परि न तिला तो मानी येतां यौवनभर अंगीं ॥१॥
तिजसम भोगी कोण कष्ट ते नऊमासीं उदरीं ।
वाहते भार न परि ते म्हणते झालासे भारी ॥२॥
घेत कडेवर अंकावर ते न समाये प्रेमा ।
मुखीं घालुनी स्तन पाजी ती सोडुनियां कामा ॥३॥
टाकोनी तीवरी रुक्ष ते वाक्शर सुत अंतीं ।
हृदया भेदी स्मृति राही न त्या मागिल ते चित्तीं ॥४॥
स्वसुताला नाचवी घेउनी तो डोईवरती ।
करी धाकुटा खोडी परि ते आणिच ना चित्तीं ॥५॥
माता करि अपराध तरी तो घेउनियां ध्यानीं ।
नित्य टोंचितो जसा बोंचितो गिधाड प्रेत वनीं ॥६॥
असो अशासीं राम म्हणे हें शासन यमलोका ।
होय चुकेना जन्ममरण या चक्राचा झोंका ॥७॥

(१६)

तयाचा भवपट हा फिटला ।
अरे जो हरिचरणीं जडला ॥ध्रु.॥

उरली ते न वासना कांहीं । धरिना ममत्व जो निजदेहीं ।
सत्स्वरुपाविण चिंतन नाहीं । अन्य विषयीं जो या विटला १
परहित नित्य जयाचे ध्यानीं । स्वार्था किमपि न चित्तीं आणी ।
निज कर्तव्यीं दक्ष असोनी । फल मिळवाया ना झटला २
भोगी नित्य समाधि लागीं । ऐसा राम म्हणे तो योगी ।
जो या परमार्थीं संयोगी । कर्माकर्मांतुन सुटला ३

(१७)

तोची संत खरा । धरा पद त्याचे ना विसरा ॥ध्रु.॥

भगवद्भक्त म्हणो तोची । मनीं ज्या आस न विषयाची ।
जयाला सुखदु:ख न जाची । आप्त रिपु सम भाव न दुसरा १
जयाचें अविकारी चित्त । सदोदित ब्रम्हीं ज्या हेत ।
दयाळुहि शान्त तसा दान्त । पारखा स्तुति निंदेस पुरा २
जाहला जो त्रिगुणातीत । न मानी भूत ब्रह्म द्वैत ।
तोच भगवंताची मूर्त । प्रपंचीं असुनी मुक्त बरा ३

(१८)

माझें निजरूपीं मन ठरलें ॥ध्रु.॥

गार जीवनीं जीवन रूपचि तद्वत् हें विरलें ।
मीपण या प्रकृति अभिमानापासुनी ओसरलें ॥१॥

आतां एकचि शुद्ध निरामय साक्षीभूत उरलें ।
राम म्हणे जें काहीं होतें प्राक्तन तें नुरलें ॥२॥

(१९)

मी शरण तुला प्रभुराया ॥ध्रु.॥

दीनाया, ताराया, बुडतों मायाडोहीं झडकरि यावें कर द्याया १
व्यर्थ वया, दवडुनियां, आत्महीत
ना केलें स्वार्थी झिजविली हे काया २
मानस या, धरि विषया जाया धन
सुत सोडी किमपि न प्रपंचलोभा या ३
येउ दया, तव हृदया, पश्चात्तापें राम लागतो तवपदकमलां या ४

(२०)

उठा चला हो देवा जाऊं आतां सुखशयनीं ।
भागलेति वाटतें विसावा घ्या हृदय-भुवनीं ॥१॥
प्रेमहार गुंफिले गळां ते घालिन हो माळा ।
कुरळ कुंतलीं झाडिन चरणा तुमच्या गोपाळा ॥२॥
भक्ति सुरंगी नवरंगी हे अंथरिली शेज ।
तनु-पिक पात्रा करीं घेउनी उभा दास आज ॥३॥
सेवक राम विराम पावतो हेंच काम करुनी ।
पुरुषोत्तम यदुराज दयाघन सांठविला स्वमनीं ॥४॥

(२१)

भक्तहृदयकासारीं । करिसी तूं प्रभु हे जलकेली ॥ध्रु.॥

प्रेम-कमलिनी खुडिसी मोदें ।
स्वैर पोहसी या स्वच्छंदें ।

क्रीडसी सखया तूं अविरोधें ।
निज सुन्हुदांचा अससी वाली ॥१॥
भक्तिजलाचे फेंकुनियां कण ।
झेलिसी कुतुकें तूं नारायण ।
तृप्त भक्तजन हें अवलोकुन ।
खेळलास गोकुळीं वनमाली ॥२॥
तेथें मन्मन पल्वल हें किति ।
होय पाहतां शंकित हे मति ।
आवडेल तुज कैसें श्रीपति ।
जें या युक्त विषय-शैवालीं ॥३॥
राम म्हणे जरी अवगाहन तुज ।
योग्य न वाटे तरी त्वत्पदरज ।
टाकीं धुवोनी हेंच सुखद मज ।
होईल बघ तेंही या कालीं ॥४॥

(२२)

दुष्कृतिला कटुफल हें ठेविलें असे ।
न चुके कधीं निष्ठुर हा न्याय जगीं वसे ॥धृ.॥

राव रंक देव कुणी । कर्म कदा त्या न गणी ।
भुंज सदा प्राप्त रणीं । उचित हें दिसे ॥१॥
विषमवाद व्यर्थ जाण । समता हे ध्यानीं आण ।
दैव थोर कीं प्रयत्न । भेद हा नसे ॥२॥

नाद उठवी पडसादा । न चुके हा नियम कदा ।
मिळत सौख्य ये विपदा । कर्म तें जसें ॥३॥
अनुभव हा राममनीं । विशद करी सर्व जनीं ।
त्यागो वा घेऊ कुणी । दुःख मुळीं नसे ॥४॥

(२३)

गुरुगुह्य कदापिहि फोडूं नका ।
हा भाव मनींचा सोडूं नका ॥ध्रु.॥
विणानाद पहाया कैसा तो,
तार तयाची तोडूं नका ॥१॥
दुग्धाशस्तव धेनु तशी हे,
जीत गडे हो मारूं नका ॥२॥
यंत्र भेदुनी मूढपणें गति,
आहे कैसी पाहुं नका ॥३॥
पाजळली ते ज्योति मालवुनी,
प्रकाश हा अवलोकुं नका, ॥४॥
कुठें दडालें बिंब पाहण्या,
काच करींची भंगुं नका ॥५॥
राम म्हणे ते धार पहाया,
शस्त्र करींचें छेदुं नका ॥६॥

(२४)

उठा सकळ हो भातां झारी झाडुनियां झोंप ।

उघडा डोळे पहा अंतरीं प्रकाशलें रूप ॥ध्रु॥
उदया आला भाग्यभानु हा ज्ञानसुप्रभात ।
जहाली या दशदिशा फांकल्या सर्वहि तमरहित ॥१॥
निसर्गदेवी न्हाली आला आत्मतेजपूर ।
सौंदर्याहृदीं उद्‌भवला नव आशांकुर थोर ॥२॥
जीव-भ्रमर जाहले मुक्त जे बंधनांत होते ।
पुढील यशाची साक्ष विश्व हें अवघें पटवीतें ॥३॥
पतंग-जिज्ञासुहि घेती हा बोध-सुमानंद ।
सुप्रभात पाहुनी अशी का होय न हा मोद ॥४॥
लावा अनुभव-दीप सारुनी विवेक या वाती ।
भक्ति-स्नेहें उजळूं दे या प्रेमाची ज्योती ॥५॥
सुविरक्तीच्या करा जीवनीं मंगल हें स्नान ।
राम म्हणे मन-मंदिर ठेवा पवित्र झाडून ॥६॥

(२५)

त्या भगवंता ध्यानीं आणा ।
विषयसुखातें तुच्छचि माना ॥ध्रु॥
विश्वाचा जो उगम अनादि,
खेळ जयाचे नाना ,
स्थिति-लय-कर्ता सूत्रधार जो,
कदा न ये अनुमाना ॥१॥
जी जी करितां उदर भराया,

वांकवितां कां माना ।
विसरोनी त्या दीनदयाळा,
हृदयींच्या यजमाना ॥२॥
लटिका वाहे गर्व जीव हा,
अंतीं जाय स्मशाना ।
कांता धन सुत मान ठेवुनी,
येथ येथिचा जाणा ॥३॥
प्रेमपुर:सर भजतां जो हा,
साध्य सहज भक्तांना ।
भ्रांति टाकुनी त्या ईशाच्या,
गा तुम्ही गा गुणगाना ॥४॥
राम म्हणे जवळी आहे परि,
दूरचि तो अज्ञाना ।
सारा मोहपटातें मग तो,
दृश्य असे नयनांना ॥५॥

(२६)

आत्मविचार करा ॥ गडयांनो ॥ आत्मविचार करा ।
दृश्य न मी हें ओळखुनीयां चित्तीं ब्रह्म धरा ॥ध्रु.॥

शुद्धरूप मी चिन्मय साक्षी,
लक्ष्यचि मी असुनी हें लक्षीं,
ब्रह्माण्डहि घडलें मम कुक्षीं,

मीच न हा दुसरा ॥१॥
शुद्ध बिंब मी प्रतिबिंब नसें,
विश्व मजवरी हें आभासे,
विस्मृति मज या विषयाध्यासें,
हाचि विवेक खरा ॥२॥
शुद्ध कनक मी भूषण नसुनी,
मी रसिका घट जाय भंगुनी,
मी न देही देहांत वसोनी,
हें न कधीं विसरा ॥३॥
राम म्हणे मी सकल ज्ञाननिधि,
अनुभवुनी ह्या सहज समाधि,
आधि व्याधि मग नाहीं उपाधि,
जन्म न मृत्यु जरा ॥४॥

---

# मनोबोध

( १ )

सोडुनियां अविचार, अनुदिनीं कर मन तत्त्वविचार ॥ध्रु.॥
दृश्य जगत तितुकेंच नसोनी त्यासह चिद्रुप सार ।
नाद त्यजोनी वाद्य न जैसें हेम त्यजुनी भांगार ॥१॥
प्रभा न त्यजुनी दीप वेगळा सलिल त्यजोनी गार ।
नसे हुताशन दाहकत्त्व गुण सोडुनी भिन्नाकार ॥२॥
सुखदु:खा सम मानीं न धरीं भेदबुद्धिव्यवहार ।
राम म्हणे हो समरस ब्रह्मीं सुखें भवनदी पार ॥३॥

( २ )

चल ऊठ मना फिर मागें रे ॥ध्रु॥
विषयाशा हे नाशा कारण जा हितकर सत्संगें रे ।
मुक्ति तरिच आसक्ति सोडिसी सुख या भोगत्यागें रे ॥१॥
स्वहित साधण्या निगमविहित हें अनृत त्यजुनी वागें रे ।
स्वार्थ टाकीं परमार्थ धरीं हा राहीं नित्य विरागें रे ॥२॥
वळवीं निज वृत्तीतें अनुदिनि शमदमसाधनयोगें रे ।
बोल जाण हे अमोल असती दास राम तुज सांगेरे ॥३॥

( ३ )

कां रे मन धरिसी मोह असा ॥ध्रु.॥
अनुभविशी जरी नाशिवंत जग तरी उमटेना ज्ञान-ठसा ।
शांतिसुखातें सहज पावशिल पीशिल जरि या भक्तिरसा ॥१॥
तास तास हा काळ जातसे नेणसी तूं स्वहितास कसा ।

राम म्हणे हो सावध अंतक अंतीं दाबिल जाण घसा ॥२॥

( ४ )

काहीं समज मना तूं पुरतें रे ।
वय पहा क्षणोक्षण जातें रे ॥ध्रु.॥
वृथारोप वस्तूचा झाला ।
नामरूपगुण तोच पावला ।
काढुन तितुकें घेतां बाकी सांग काय मग उरतें रे ॥१॥
शुद्ध हेम त्यावरती घडिले ।
अलंकार बहु कल्पुनी जडिले ।
नाम टाकितां दूर जाणुनी भिन्न रूप मग नुरतें रे ॥२॥
अज्ञानें बघ जग हें सारें ।
फिरतें जन्ममरण हे फेरे ।
सतास त्यजुनी असतालागीं मोहें व्यर्थचि झुरतें रे ॥३॥
राम म्हणे सद्विचार करितां ।
सद्वस्तू ये सहजचि हातां ।
सत्संगें अनुदिनि अभ्यासें बुद्धि मुरे निजरूपीं रे ॥४॥

( ५ )

प्रभुपायीं धरीं प्रीत ।
मना तूं गा हरि-गुण-संगीत ॥ध्रु.॥
भवाब्धींत तुज तारका नौका ।
विमल चरण या श्रीहरिचे, कां- ।

विषयीं भुलुनी घेसी झोंका? ।
सांग वृथा कां होसी फजीत ॥१॥
विश्वाचा धनि सोडुनी आजि ।
कां इतरांतें होउनी राजी ।
करिसी निष्फल हांजी, हांजी ।
केवळ उदर भराया बीत ॥२॥
वर्तसी या मीपण अभिमानें ।
कर्मबंध तुज पडला तेणें ।
जीवितमरणाचें बघ पेणें ।
न चुके तेणें तूं भयभीत ॥३॥
राम म्हणे वरदा हे वाणी ।
हितकर परमसुखाची खाणी ।
ऐकें सखया नत होवोनी ।
घेसी न कानीं ही का रीत ॥४॥

(६)

शान्ति-सदन हा राम सतत वद ।
कलिमल हरि करी दुरित निवारण, ।
अमल चरण धरीं सकल सुखदप्रद ॥ध्रु.॥

अघटित-घटना-पटु परमेश्वर ।
प्रभव-स्थिति-लय घटना विस्तर ।
दावी चमत्कृति पूर्ण परात्पर ।

अखिल विश्व हें ज्याची संपद ॥१॥
राम,-दयाघन प्रभु, हृदीं राहे ।
भूतमात्रीं जो भरला आहे ।
भक्तजनांची चिंता वाहे ।
नाविक ने तरुनी हा भवनद ॥२॥

( ७ )

मना सोड दुर्मति सदा सत्पथासी धरीं ।
ध्याईं परमेश आनंदकारी ॥ध्रु.॥

भोगिल्या यातना जन्मजन्मांतरीं,
लीन तूं परि कसा विषयव्यसनीं ॥
हाय! रे राजसा कोण दुर्गति अशी,
भोगिली त्वां नये जीहि स्वप्नीं ॥१॥
तृषित मृग धावती नित्य अतृप्त ते,
मृगजला पाहुनी श्रमित होती ॥
तूं तसा आर्त विषयांस या शोधिसी,
ते न देतीच परि सौख्य अंतीं ॥२॥
स्वहित तें कोणतें उमज अजुनी तरी,
या धरीं ईश्वरीं प्रीत पाहीं ॥
सोड हे आस संसार निःसार हा,
नित्य निश्चल असा चित्तीं राहीं ॥३॥
संतसंगें उमज, चिद्रुपासी समज,

जाई जाईंच सन्मार्ग क्रमुनी ॥
देईं सुविरक्तिचा या मनीं हा ठसा,
ठेवीं हा भरवंसा रामवचनीं ॥४॥

(८)

प्रभु-चरण-कमल-मकरंद सेवुंया चाल आतां ॥ध्रु.॥
मनोमिलिंद। येईं त्वरित चल,
मार भरारी घेईं तें स्थल,
ना तरी बापा पावसी तापा ऐक वार्ता ॥१॥
स्वर्ग-सुखाची व्यर्थ कल्पना,
ते सखया रे सोडीं तृष्णा,
हरिचरणींचें सुख तें दुर्लभ, आदिनाथा ॥२॥
सुरवर, किन्नर, मुनिगण वांछिती,
दुर्लभही तें न मिळे त्यांप्रति
चित्तीं व्हावा शुद्ध भाव तरी, येत हाता ॥३॥
राम म्हणे ज्या मिळे सुदैवें,
मोक्षगतीतें तो नर पावे,
मग या जननामरणाचा ना, काहीं गोता ॥४॥

(९)

कर कर करसी, मर मर मरसी, फिर फिर फिरसी चौऱ्याशीं।
कदा चुकेना जाण यातना विचार हा कां न पहासी ॥ध्रु.॥
भवदीपावरी नित्य पतंगासमान झडपा कां घेसी।

त्वद्बल हरुनी जाण सख्या रे अंतीं जीवित हें नाशी ॥१॥
सावध हो या रमानायका जरी अनुदिनीं तूं स्मरसी ।
तरी खचित बघ जाण मना रे दुस्तर अघनिधि हा तरसी ॥२॥
दास राम तुज सांगतसे गुज चिंतीं या निजरूपासी ।
अज्ञानें कां अंध होऊनी विषयकर्दमीं या कुजसी ॥३॥

(१०)

कोण कोठुनी आलासी हें नकळे का तुजला? ।
कोहं शब्दें रडूं लागसी कैसा भ्रम पडला! ॥
निर्विकल्प शुद्धात्मा तूं परि देहचि मानियला ।
तेणें सांपडलासी द्वंद्वीं चित्तभ्रम झाला ॥
आतां वळखीं वळुनी मागें दृष्टचा निजरूपें ।
सुखें प्रपंचीं राहीं मग तुज शिवती नच पापें ॥
राम म्हणे रे मना! भेद तों विश्व भिन्न गमतें ।
ऐक्यत्वें पाहतां सर्व निजरूपीं मावळतें ॥

(११)

मना तूं होईं सावधान ।
भ्रमणा न करीं निजरूपीं या तूं धरीं अनुसंधान ॥ध्रु.॥
टळटळ फिरसी या चौऱ्याशीं ।
शरम तुला नच याची कैसी ।
नामसुधा त्यजुनी करिसी कां विषयवारुणीपान ॥१॥
भ्रमुनी कां तूं अधिक दिसेंदिस ।

होसी वद हा विषयमोहवश ।
कंठीं हा यमपाश पडे मग येई तुज निर्वाण ॥२॥
राम सुवच हें धरुनी चित्तीं ।
कुमति सोड वेगीं सखया ती ।
उमज स्वहित हें आतां न करीं काहीं येथ अनमान ॥३॥

(१२)

धरीं विराग हा कुसंग सोड रे मना ।
संसारीं राहीं परि टाक वासना ॥ध्रु.॥
हे विनाशी भोग सकल ।
दवडूं नको काल विफल ।
वरुनी सद्गुरुचरणा चुकवीं यातना ॥१॥
कर्तव्यीं रमुनी कर्म ।
आचरें पहा स्वधर्म ।
स्मर पुरुषोत्तम तोडीं त्वरित बंधना ॥२॥
दास राम पियुषवाणी ।
पी सखया उदर भरुनी ।
मुकसिल मग सहज जाण कालशासना ॥३॥

(१३)

गूढ जरी तें ज्ञान, मनारे गूढ जरी तें ज्ञान ।
तरी प्रयत्नें साध्य असेरे येथ नसे अनमान ॥ध्रु.॥
शुकसनकादिक अनुभविती तें,

श्रेष्ठ श्रेष्ठ मुनि साधनपंथें,
हृत्स्थित तें धरुनीयां तेथें,
रहाती अनुसंधान ॥१॥
इंद्रियदमनीं सावध राहुनी,
दूर वृत्तिचांचल्य करोनी,
हो निरुपाधिक निर्भय टाकुनी,
दुर्धर तो अभिमान ॥२॥
होऊन या विषयांचा पाइक,
निजरूपीं रहासी जरी विन्मुख,
तुज न मिळे मग तें सत्‌चित्सुख,
सुंदर योग–निधान ॥३॥
होय निराश न भाव धरोनी,
लाग झडकरी श्रीगुरुचरणीं,
राम तुला कथितो हें जाणुनी,
दे इकडे बघ कान ॥४॥

(१४)

सोडुनी तदितर संग । एका चित्स्वरूपीं या रंग ॥ध्रु॥
संग त्यजावा जाण असा कीं । जेणें न रुतावें भवपंकीं ।
कमल अलिप्तचि असुनी उदकीं । बाधति त्या न तरंग ॥१॥
त्यागीं केवळ दृश्य पदार्थ न । मूळ सबळ तृष्णेचें छेदुन ।
करीं सुनिर्मळ सात्विक हें मन । चाले न हा वरपंग ॥२॥

वृत्ति मुरडुनी रूपीं वळवीं । इंद्रियग्राम न विषयीं मळवीं ।
काम क्रोध मद मत्सर पळवीं । जे करिती तुज तंग ॥३॥
राम म्हणे या पक्वदशेप्रत । आलीया मग ना भय किंचित ।
होसी निजरूपीं सहजस्थित । निश्चल पूर्ण अभंग ॥४॥

(१५)

त्यज विषयांचा नाद ॥ रे मन ॥ त्यज विषयांचा नाद ॥धृ.॥
मीपण देह अहंकारें या चढलासे उन्माद ।
परि तुज या कर्माची अंतीं लागेल द्यावी याद ॥१॥
भोग भोगणें जीवा न सुटे येथ न काहीं वाद ।
म्हणुनी या सद्धर्मा अनुसर फिटेल ही भवव्याद ॥२॥
सावध हो कां भ्रमसी तुजला राम घालितो साद ।
शमदम साधन साधुनियां निजरूपीं भोगीं समाध ॥३॥

(१६)

मना तूं होईं सावधान ।
पहा पहा हा काळ उरावर धरुनी बसला मान ॥धृ.॥
विषय चिंतिसी काय म्हणावें,
सुधा त्यागुनी कां विष प्यावें,
हृदयीं हरिला नित्य धरावें,
कांता कांचन त्यजुनी आणिक सारा लौकिक मान ॥१॥
मीन गळासी आमिष बघुनी,
पतंग दीपीं झेंप घालुनी,

विलोकुनी मृगजल मृग विपिनीं,
फिरतो वणवण मूढ, सोडुनी देतो अंतीं प्राण ॥२॥

दुःख भोगुनी या देहाच्या,
केवळ उरल्या दिसती खांचा,
परि न सुटे हा लोभ भवाचा,
ऐकसी न अजुनी का वाणी बोधाची हे छान ॥३॥

सदयहृदय हरि राम-सखा तो,
जोड आपुला मित्र फुका तो,
भक्तिप्रेम धरितां न धका तो,
सोडुनी चिंतन आणिक दुसरें करीं सुखद हरि-ध्यान ॥४॥

(१७)

कां मना धुंडसी व्यर्थ । काशी मथुरा हें तीर्थ ॥धृ.॥
जर व्हावा तुज हा देव । त्यज विषयाशा हे सर्व
ना धरीं मुळीं हा गर्व । मग लाभसील मोक्षार्थ ॥१॥
कांखेस धरुन संसारा । संन्यासी तूं होणारा
कर काहीं या सुविचारा । साधेल कसा परमार्थ ॥२॥
बांधुनी उरीं दगडा या । मी तरेन म्हणसी वायां
होईल जाण रे राया । शेवीं हा सत्य अनर्थ ॥३॥
राम म्हणे नलगे काहीं । सुविरक्ति एक व्हावी ही
श्रीहरिचा अंकित होई । त्यज दुर्मति तैसा स्वार्थ ॥४॥

(१८)

त्यजुनी हृदयींचा स्वामी । मना कां रमसी धन धामीं ॥ध्रु.॥
सारा बालपणा सरला । शरीरीं यौवनभर भरला ।
होसी वृद्ध, कसा काला- । फसविसी? गेलें वय कामीं ॥१॥
काहीं विचार कर बापा । कुठवर साहसी या तापा ।
धरीं रे दृढतर अनुतापा । लागें श्रीगुरु-पद-पद्मीं ॥२॥
विभवीं सर्वहि जमतील । संकटकालीं त्यजितील ।
निष्फल बघुनी उडतील । द्विजसम सहकारा नामी ॥३॥
अधिक तें सांगावें काय । सकल हें स्वार्थी जग होय ।
धरीं हरिच्चरणीं हे सोय । हा विश्वास तसा रामीं ॥४॥

(१९)

आपुलासा या मुकुंदा करीं हो बंदा मना ।
गृहधंदा करित असतां स्मर तूं नारायणा ॥ध्रु.॥
कां रे मुकसी स्वात्मानंदा ।
पडोनियां भलत्या फंदा ।
ला ग प्र भु प दा र विं दा ।
चु क वीं या त ना ॥१॥
तोडीं तोडीं आशाबंधा ।
जोडीं जोडीं सत्संबंधा ।
व्यर्थ न धरीं व्यसनीं छंदा ।
च तु र स ज्ज ना ॥२॥

आकळुनी इन्द्रियवृंदा ।
लावुनी सदा प्रतिबंधा ।
हो न कुणाचाही मिंधा ।
कर विचारणा ॥३॥
दास राम करितो बोधा ।
ऐक सेवीं या आमोदा ।
करो कुणी स्तुति वा निंदा ।
त्यज न धारणा ॥४॥

(२०)

द्वैत भास सारा । हा मना पसारा ॥ध्रु॥
शाश्वत तें येथ काय । सकल वस्तुजात जाय ।
विषयीं रमत, जीव भ्रमत, हा खुळा बिचारा ॥१॥
सुखद बाल्य जरि गमतें । सांग कुठें मज टिकतें ।
दिवस रात, येत जात, हाच न्याय सारा ॥२॥
यौवनभर येत अंगीं । मग आशेच्या तरंगीं ।
झुलत चित्त, रचित बेत, रमत या असारा ॥३॥
परि आशाभंग होत । रचिलेला बेत फसत ।
कुणा होत, सर्व प्राप्त, क्षणिक सौख्यवारा ॥४॥
जें असे तयांत सौख्य । मानी मग पुढति मूर्ख ।
दारा धन, मिळवी मान, थाटितो अगारा ॥५॥
परि यौवन तेंहि सरे । जराग्रस्त देह झुरे ।

पुत्र पौत्र, आणिक मित्र, पुसतही न दारा ॥६॥
राम म्हणे सावधान । आधीं हो तूं सुजाण ।
जों न जवळ, आला काळ, तों करीं विचारा ॥७॥

(२१)

किति सांगूं वारंवार । कां मना करिसी अविचार ॥ध्रु.॥
विसरुनी हरिला, कुमार्ग धरिला, वरिला कां संसार ॥
विषय-संग जरी, सहज उठती तरी चित्तीं विविध विकार॥१॥
आशाघनतम त्यांत बुडाला आत्मसूर्यसुखसार ॥
धर सत्संगा, वर निःसंगा, कर हा तत्त्वविचार ॥२॥
राम म्हणे झणि उठ वेग करीं गांठीं सद्गुरुद्वार ॥
क्षण क्षण जातो काळ पहा रे होत असे झणकार ॥३॥

(२२)

बा मना, सोड कल्पना, विविध या जना,
स्वरूपीं पाहीं, ऐक्यानुभवातें घेईं ॥ध्रु.॥
हें दिसे, दृश्य वा नसे, तेंहि बघ तसें,
सर्वही काहीं, ब्रह्माविण विश्वीं नाहीं ॥१॥
घट निका, लागतां धका, होय मृत्तिका,
अनुभवा येई, तें तत्त्व एकची राही ॥२॥
हें तसें, अनेकीं वसे, एक परि असे,
भास हा, साहीं,–सुखदुःख तुला जें दाही ॥३॥
भावना, धरिलिया मना, मुक्ति या क्षणा,

होय लवलाहीं, या देहीं जीव विदेही ॥४॥

(२३)

सेवीं मनोभ्रमरा,
प्रभुपदकमलांतिल मकरंदा टाकुनियां इतरां ॥ध्रु॥
विषयकाष्ट हें शुष्क कोरिसी मूढपणें चतुरा ।
वायां भ्रमसी भर भर भर भर लक्षयोनी भंवरा ॥१॥
प्रभुयश मंगल गान कराया सिद्ध ठेवीं स्वगिरा ।
पुष्ट तुष्ट हो पान करुनी हें हाची छंद बरा ॥२॥

(२४)

निमिष निमिष वय जातें रे । कां करितोसी मातेरें ।
रत अनुदिनीं हरिभजनीं तूं मन, तेणें सार्थक होतें रे ॥ध्रु॥
उदासीन या चित्तें रे । राहीं न धरीं नातें रे ।
स्मर सुखकर भयहर प्रभुपद जग, चाले ज्याच्या सत्तें रे ॥१॥
काळ उघडुनी पोतें रे । कोंडी तुज निज हातें रे ।
तरी कळेना, चित्त वळेना अजुनी, विषयीं रमतें रे ॥२॥
एक रामवचनातें रे । धरिं सद्गुरुचरणातें रे ।
दुरित सकल भंगे निजरूपीं, चित्त सहज मग ठरतें रे ॥३॥

(२५)

मना होउनी दृष्टा लक्षीं या आत्मारामा ।
अव्यय, अद्वय, निर्विकल्प त्या मुनिमनविश्रामा ॥ध्रु॥
रज्जुसर्पन्यायें भासे हें जग अवडंबर ।

त्रिगुणात्मक मायेचा अवघा खेळचि साचार ॥ ॥
आवड धरुनी सत्समागमीं तदाकार होई ।
महद्विश्व अणुरेणुपासुनी ब्रह्माविण नाहीं ॥२॥
शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श या पंचहि विषयांतें- ।
विसरोनी, बघ दिव्य दृष्टिनें चिद्घनरूपातें ॥३॥
राम म्हणे तें अलक्ष्य गुरुविण अनुभवास येना ।
अगम्य वेदां पडे न ठाईं जाणे सिद्ध खुणा ॥४॥

(२६)

वारंवार, कर मन हा तत्त्वविचार ॥ध्रु.॥
कोण कुठन मी आलों येथें आणि कुठें जाणार ।
पहा विवेकें निवडून सारें सार कवण निःसार ॥१॥
एक सकल हें ब्रह्म असे मग कुठुनी भिन्नाकार ।
विवरुनी बघ कां झाला इतुका मायेचा विस्तार ॥२॥
तत्त्वविचारें गुह्य कळे मग चहु वेदांचें सार ।
मायाग्रंथी सहज तुटे सुख लाभे अपरंपार ॥३॥
पूर्ण सिद्ध परमेश्वर तूंची असतां दारोदार ।
कां भ्रमसी सखया हो सावध सोडुनी दे अविचार ॥४॥
राम म्हणे नेणोनी लपसी राखेंतिल अंगार- ।
तो, तैसा तूंही विसरोनी जासी निज अधिकार ॥५॥

(२७)

करणें फार नको काहीं ।

मना जप, तप,-साधन तेंही ॥ध्रु॥
जनीं या जनार्दना पाहीं,
तल्लिन निजरूपीं राहीं,
भोग हे शांति याच देहीं,
मारुनी षड्रिपु हे साही ॥१॥
तितुका त्यागीं तो स्वार्थ,
फुकाचा जोडे परमार्थ,
ठेवीं हृदयीं गुह्यार्थ,
अनुदिनिं श्रीहरिला ध्याईं ॥२॥
अनाथा साह्य करीं प्रेमें,
फिराया नको चार धामें,
करीं हीं कर्में निष्कामें,
बसोनी ठाईंचे ठाईं ॥३॥
नलगे राम म्हणे कष्ट,
उघड हा मार्ग असे स्पष्ट,
झांकुनी नेत्र रात्र दुष्ट,
करिसी प्रकाश असतां ही ॥४॥

# लिखित विभाग

## (१) प्रश्नोत्तर

(जाति–वसंततिलका)

कां रे! तुवां न रचिलें वद राष्ट्र-गीत? ।
नाहींच काय हृदयीं तव देश-प्रीत? ॥
केलें न गीत जननीवर तूं अहा! रे! ।
कांतेवरी न अजुनी लिहिलें कसें रे? ॥१॥
मित्राविशीं तुज न वाटत प्रेम काय? ।
हा धिक्! न तेंहि स्फुरलें तुज हाय हाय! ॥
गांवावरी बघ तुझ्या नच चार ओळी ।
वेळीं कशा खरडिल्या नच वा अवेळीं? ॥२॥
ताईवरी बघ तुवां रचिलें न गाणें ।
केला सहोदर सशब्द न तूं लिखाणें! ॥
किंवा कशी तुजसि काव्य करावयाला ।
लावी न सांग अजुनी कुणि मस्त बाला? ॥३॥
संकेत हेच कविचे बघ रम्य त्यांत ।
सांगूं किती असति अन्य असेच प्रान्त ॥
हे मुख्य मुख्य म्हणुनी वदलों तुला रे ।
केलें न काव्य जर यांवर तूं वृथा रे! ॥४॥
कोणी न ते कवि तुला म्हणती पहा तूं ।
आतां तरी बघ लिही उमजोन हेतु ॥

★

आहे खरेंच रसिका पुसिलें तुवां तें ।
तें काव्य जाण असलें स्फुरलें न मातें ॥५॥

माझ्या हृदीं सळसळे नच देश-प्रीत ।
होईल दंभ लिहिणें मग राष्ट्रगीत ॥
पाहीं परंतु रसिका मज विश्व सारें ।
हें आवडे बघ न भेद उरे मुळीं रे ॥६॥
नाहींच जाण जननीस कृतघ्न झालों ।
नाहींच तें विसरलों स्तनदुग्ध प्यालों ॥
मातें तरीहि स्फुरतें नच काव्य तेथें ।
कां तें कळे न वदतों बघ सत्य जें तें ॥७॥
ही आदरें विनत मान स्त्रियांपुढें या ।
होते परंतु जरि ते असली स्वजाया ॥
कांतेवरी उधळिलीं नच प्रेम-गीतें ।
आहे खरेंच रसिका मजला गमे तें ॥८॥
जें प्रेम खोल बसलें हृदयीं स्वहस्तें ।
शब्दांत बांधुन कसें उचलूं वरी तें? ॥
तें मित्र-प्रेम लिहुनी नच कागदांत ।
ठेवीयलें उघड रे कथितों दहांत ॥९॥
वैरी नसे मज परंतु जगांत कोणी ।
ही काय सांग नच रे मम भाग्यश्रेणी? ॥
गांवावरी बघ जरी कविता न केली ।
त्याची न विस्मृति कदा तिळमात्र झाली ॥१०॥
मद्बाल्य तें विमल आठवतें कितीदा ।
त्याची गड्या स्मृति सदा सुचवी अभेदा ॥
गांवास मी न विसरें म्हणुनी जगास ।

आहें धरून न कधीं जहालों उदास ॥११॥
ताईवरी खचित रे स्फुरलें न गाणें ।
अद्यापिही नच स्फुरे परि मात्र तेणें- ॥
झालों न खिन्न जगतीं सगळ्याच ताई ।
त्या मारिती मजसि हाक म्हणोन भाई ॥१२॥
भाऊ असें ठळक अक्षर हें हृदीं या ।
नाहीं कदा उमटलें मग काव्य, वायां- ॥
मी कां करूं रुचत ना मज सोंग ढोंग ।
तें योग्य ना लपविणें बघ अंतरंग ॥१३॥
जागे परन्तु हृदयीं मम बंधुता हे ।
तें वैर हें मग कसें तिळमात्र राहे? ॥
माझ्या म्हणोन सुखशांति घरास आली ।
स्पर्धा करोन मुख कृष्ण पळोन गेली ॥१४॥
सौंदर्य जें विखुरलें अवघ्या जगांत ।
तें ज्या स्वकीय करण्या भरलें मनांत ॥
त्या वेड लाविल कशी वद मस्त बाला ।
काव्या न तो विषय योग्य न जो मनाला ॥१५॥
मी काव्य जें रचियलें अथवा रचीन ।
कीर्त्याभिलाष धरुनी बघ तें कधीं न ॥
जो काव्य निर्झर हृदीं स्वसुखेंच वाहे ।
त्याचा करीं शिवपदीं अभिषेक, बा! हें- ॥१६॥
आहेच सत्य दुसरा अभिलाष, नाहीं ।
दे धन्यवाद वद धिक् कृति वा सुखें ही ॥

आहें उदास मज हर्ष न खेद त्याचा ।
प्रांत प्रदीर्घ रसिका बघ काव्यश्रीचा ॥१७॥

## (२) –विचारा मुकला–

(जाति–वधुवल्ली)

विचारा मुकला जो दास रूढिचा बनला ॥ध्रु.॥
आला विसरूं अनुभव कैसा । भिउनी फोल जगाच्या रोषा ।
हृदयीं नसतां ही अभिलाषा ।
भीक कुणाला, कां घालूं सांगा मजला ॥१॥
पिंजऱ्यांतील असें का रावा । म्हणुनी शब्द पढविला गावा ।
जगता रुचेल तो बोलावा ।
बोल शिकवीला, छी ! त्या पोपटपचीला ॥२॥
गुलाम रूढीचे डोंबारी । ढोलक पिटिती दारोदारीं ।
तालावर त्या नाच भिकारी ।
आवडे ज्याला, दे खुशाल करूं दे त्याला ॥३॥
केल्या उपकारांची कोणी । लादी जरी शिरीं जड गोणी ।
होउनि कृतघ्न भिरकावोनी ।
देईन तिजला, पर्वा न कशाची मजला ॥४॥
माझें ध्येय असे मज प्यारें । शिरलें त्या वेडाचें वारें ।
तुच्छ मला त्याविण जें न्यारें ।
त्यागिलें त्याला, हो भलें बुरें विश्वाला ॥५॥
नमविन प्रेमापायीं माथा । गर्वाच्या शिरीं हाणिन लाथा ।
वाढे ममतेनें हे ममता ।
नसे तरि भ्याला, का शूर कधीं समराला ॥६॥

माझें जग तर मी जगताचा । ना तर आहे कोण कुणाचा ।
जो तो स्वामी निज दैवाचा ।
भाग सर्वांला, क्रमणें पथ आपुला आपुला ॥७॥
मन्मित्रांनों या मज जवळी । आज करूं रूढीची होळी ।
देऊं एकच कीं आरोळी ।
सुप्त जे त्यांला, या, या, या, उठवूं सकलां ॥८॥
वेडे आम्हा जग जर गणतें । आम्ही मूढ म्हणूंया त्यातें ।
नमवूं माना कां रूढीतें ।
नसे सत्याला,- भय कधीं. मरण कपटाला ॥९॥
नव वंशाच्या नव तरुणानों! । या नव गुरूच्या नव चेल्यानों! ।
नव तेजाच्या पुण्यात्म्यांनों ! ।
या जय बोला, जय नित्यचि सत्पक्षाला ॥१०॥
चित्तीं संशय न धरा कांहीं । सुकल्या खोडांचें भय नाहीं ।
आंतुन सडलीं वर फुगरीं हीं ।
नवांकुर आला, लीलेनें उखडी त्यांला ॥११॥
घेउनी पुराण पोथ्या त्यांना । खुशाल बसुंदे हलवित माना ।
बरळत कृतिविण या मूर्खांना ।
कळेना ज्याला, करणें हो काय तयाला ! ॥१२॥
पढला वेद ब्राह्मणें सारीं । उपनिषदें षट्शास्त्रें भारी ।
मन्वादिक स्मृति धरि जिव्हाग्रीं ।
व्यर्थ बडबडला, जो मुकला स्वानुभवाला ॥१३॥
पढल्या बोलांचा तूं रावा । वद्द करिसी कां हा कांगावा! ।
जरि तुज अनुभव थोडा ठावा ।

सांग तो मजला, हृदयीं ठेवीन तयाला ॥१४॥
अनुभविलें नच मानीं मिथ्या। विटलों नित्य कुटाया काथ्या!
बांधुनि ठेव तुझ्या तूं पोथ्या।
धर्म हा असला, लखलाभ तुझा हो तुजला ॥१५॥

## [३] –भूतकाळांतील भूतें–

(जाति–बालानन्द)

गत काळाच्या खिडकींतून। हळुच पाहिलें डोकावून।
तोंच दिसे बाजार जुना। गर्दी गडबड तीच पुन्हा ॥१॥
रस्त्यांतुन येती जाती। जुन्या पुराण्या त्या व्यक्ति।
मधेंच थबकुन कुणी तरी। बघेच खिडकीकडे वरी ॥२॥
हळुच म्हणे तें कसें मला। बरे गवसलां आम्हाला।
तुम्हास होतों शोधीत। लपणें ही का हो रीत? ॥३॥
काय विसरलां ओळख ती? । दाट किती आमुची होती।
चला असे उतरा खालीं। बोलूं प्रेमाची बोली ॥४॥
तोंच ढकलुनी त्यास कुणी। पाही मजला रोखोनी।
लाल लाल डोळे त्याचे। घडले खदिरांगाराचे ॥५॥
चित्त दचकलें पाहोनी। जरा पाहिलें मी वळुनी।
तोंच आकृती ती सरके। घेत घेत गिरके गिरके ॥६॥
पुन्हा पाहतां मी निरखून। आलें कोणीसें वळखून।
बुरखा घेउनि मुखावरी। पुढें सरकलें कुणी तरी ॥७॥
करुनी बुरखा बाजूला। नजर भिडविली नजरेला।
काय जाहलें कळेच ना। झपकन् बुरखा घेत पुन्हा ॥८॥
लाजलाजुनी दूर पळे। गुपित मला त्याचें नकळे।

आलें कोणी फेर धरून । मला पाहुनी तिथें दुरून ॥९॥
गतक्षणांच्या पायरिचा । यत्न करी तें चढण्याचा ।
पुरा कधीं जो नच झाला । असा जिना चढणें त्याला ॥१०॥
क्षणाक्षणाची बने अशी । कोण पायरी गणी कशी ।
धांपा टाकी तें चढतां । मज जवळी येतां येतां ॥११॥
मणी ओवितां तंतूंत । सरके तो समुदायांत ।
वर्तमान दडतो भूतीं । पुन्हा न येई तो वरती ॥१२॥
कळलें तें नाहीं त्याला । परंतु कळलें मात्र मला ।
तोंच दृश्य तें मावळलें । हर्ष खेद पळुनी गेले ॥१३॥
पुन्हा जधीं त्या खिडकींतून । पाहियलें मी तेंच म्हणून ।
निर्जिव गमलें तें सारें । खेळ बाहुलीचेच खरे ॥१४॥
वाऱ्यावर सळसळलेल्या । सावल्याच मज त्या गमल्या ।
कधीं मधीं गंमत म्हणुनी । बघतों त्या खिडकींतोनी ॥१५॥
अनंत काळाची किमया । तदा कळे माझ्या हृदया ।
कसा यापुढें फसवील । वदा मला हा गतकाल? ॥१६॥

## (४) –उपजत प्रेम–

(जाति–फटका)

स्त्री-पुरुषांच्या मनीं प्रेम जें उपजे म्हणती काम तया,
अर्धसत्य हें असे सर्वथा नसे मान्य या कवि-हृदया,
अनुभव त्याचा असे वेगळा कसा तयानें विसरावा?,
बोल जगाचा बोलाया ना कवि पिंजर-गत हा रावा ॥१॥
कवि जगताची स्फूर्ति मूर्ति कवि उत्साहाची सदा नवी,
स्वातंत्र्याच्या साम्राज्याचा रविसम सम्राट् असे कवि,

सरिता-सागर संगम होतो नांव ठेवणें व्यर्थ तया,
ज्योत देखुनी झेंप घालतो पतंग कृति नैसर्गिक या ॥२॥
सूर्यपुष्प सूर्योन्मुख फिरतें उदास मिटतें सूर्यास्तीं,
ईशदत्त हा स्वभाव त्याला नांव ठेविते मूढमति,
चंद्रोदय होतांच नाचती थय थय सिंधूच्या लहरी,
भान हरी तें दृश्य कवीचें नाहीं इतरां नवल जरी ॥३॥
रमणा बघुनी रमणी हृदयीं प्रेमभावना त्या स्फुरती,
गुलाब गालीं चढतो भालीं घर्म-बिंदु ते टवटवती,
अर्धोन्मिलिता दृष्टि कंपिता अधरोष्ठद्वय मूर्ति अहा!,
कोण म्हणे पतिता ती वनिता लय साधी एकाग्र पहा ॥४॥
प्रेमसौख्य हें निरुपम प्रेमी एक जाणतो या जगतीं,
प्रेमी प्रेम-समाधि भोगितो भोगी योग-समाध यति,
तेथें नाहीं काम राम वा प्रेम सारखें हें स्फुरतें,
येई कैसें ध्यानीं परि त्या कामलंपटा नरपशुतें ॥५॥

## (५) –गोचर होसी मज या जनीं–

(जाति–केशवकरणी)

अगाध रचना या जगताची तूं याचा गारुडी
तूंच या जीवाचा संवगडी १
वसंत, कलिका, कलरव, ऐशा अनंत गोष्टी मना
देती स्मरण तुझें मोहना २
दिव्य रंगयु! सुंदर बघुनी इंद्रधनुस अंबरीं
अभिनव भाव उठति अंतरीं ३
असंख्य फिरतां गोल नभीं हे कोण तयां सांवरी

पाहुनी बुद्धि होय बावरी ॥४॥
सागर सीमा सोडीना जग युगानुयुग चालतें
किमया हीच खरी वाटते ॥५॥
चंद्र, तारका क्षितिजावर या विलोकुनी अंतरा
साक्ष तव पटते परमेश्वरा ॥६॥
आयुष्यांतिल सुखदु:खांच्या सीमारेषेवरी
मूर्ति तव दिसते हे गोजिरी ॥७॥
जन्म-मरण हे वृथा कल्पना सच्चिन्मय तत्त्व तें
कळतां विश्व-गूढ उकलतें ॥८॥
सत्श्रद्धामय चित्तीं शब्दातीत स्फुरत भावना
रूप तव आकळतें या मना ॥९॥
अनाद्यनंता अशक्य गमतें विसरुन जावें तुला
अंश मी तुझा साक्ष हा मला ॥१०॥
म्हणोत कोणी नास्तिक नाहीं ईश्वर म्हणुनी कुणी
गोचर होसी मज या जनीं ॥११॥

## (६) –चिरस्थाई ज्योत–

(जाति–दिंडी)

बिंब प्रतिबिंबें सर्व तुझ्या ठाईं ।
तूंच आत्म्याची ज्योत चिरस्थाई ॥
सूर्य-चंद्रादिक जरी नष्ट झाले ।
भू, समुद्रादिक सर्व लया गेले ॥१॥
अखिल विरलें ब्रह्मांड तुझ्या ठाईं ।
सांग कैसें पुसुनियां जाय तेंहि ॥

विविध लघु या महदादि भिन्न छाया ।
जीवनाच्या एकर्चा तुझ्या राया ॥२॥
दिवस-रात्रीची व्यर्थ कल्पना ही ।
ज्ञान-रविला उदयास्त जाण नाहीं ॥
विश्व अवघें भंगोन जरी जाय ।
चिरंजीवा तुज नाश कसा होय! ॥३॥
दीर्घ पट तूं चित्रिलें सर्व तेथ ।
ज्ञात-अज्ञातासही या न अंत ॥
काल तैसा अवकाश मिश्र-काय ।
तुझा त्यासी हा मृत्यु असंभाव्य ॥४॥
कोण आकाशीं छिद्र कसें पाडी ।
कोण पाण्यावर रेघ कशी ओढी ॥
कोण झांकी हा कसा तो प्रकाश ।
कल्पनांचा या अशा खुळा भास ॥५॥
तुझा तूंची नटलास विश्व सारें ।
नाश यासी नाहींच सर्वथा रे ।
घडुन मोडुन तूं सदा टाकिशील ।
पुन्हा रचिशी हा तुझा असा खेळ ॥६॥
अशा खेळांतचि वेळ तुझा जाय ।
विविध ऐंवयांतचि एक रूप होय ॥
जन्म-मरणाची कल्पनाच खोटी ।
मी 'न् तूं ही भाषाच व्यर्थ ओठीं ॥७॥
नसे सौख्यहि तें दुःख तसें नाहीं ।

शान्त जीवन कोंदलें दिशा दाही ॥
शान्तरस या काव्यास ऊत आला ।
काव्य भूवर काव्येंच सांडियेला ॥८॥

## [७] –हा जगदुद्धारक आला–

(ध्रुवपद जाति वधूवल्ली व पुढील कडवीं थोडचा फरकानें उद्धव जातीवर)

आला! आला!! हा जगदुद्धारक आला ॥ध्रु॥
धर्माला ग्लानी आली । नीति ही लयाला गेली ॥
शास्त्रें हीं सर्व निमालीं । रूढीवर मानव चाली ॥
जे कूपमंडुका ऐसे । ते शास्त्री पंडित कैसे ॥
ते धर्मगुरुहि हो तैसे । जग उदास सगळें भासे ॥
हे कोण विदूषक इकडे । नाचती वांकडे तिकडे ॥
हे अजब फांकडे वेडे । ना धड इकडे ना तिकडे ॥
पिउनियां आंग्लविद्येचा- । वारा, हे म्हणती नाचा ॥
हा गोंधळ या भूतांचा । नाहिंच का संपायाचा ॥
हां! धीर धरा हा आला । घालाया सर्वां आळा ॥
धर्मोत्थापन करण्याला । हा जगदुद्धारक आला ॥१॥
या बाळांनों, सोन्यांनों । वंशाधार स्तंभांनों ॥
नव गुरुच्या नव चेल्यांनों । दैववान पुण्यात्म्यांनों ॥
द्या गळूंच पिकलीं पानें । या पुढें तुम्हीं ओजानें ॥
थबथबलेले ज्ञानानें । विश्व भरा नाविन्यानें ॥
स्वागत तुमचें करण्याला । या नव संस्था नव शाला ॥
नव समाज उत्सुक झाला । या उचला नव कार्याला ॥
द्वापारयुगींच्या लीला । त्या तुम्हींच कीं हो केल्या ॥

तो पुन्हा कृष्ण अवतरला । तुम्हांसह खेळायाला ॥
प्रेमाच्या कुंजवनाला । ऐक्याचा करुनी काला ॥
खेळा हो आतां खेळा । हा जगदुद्धारक आला ॥२॥
कौमार्य तुम्हा कन्यांचें । राखाया व्रत युवतींचें ॥
साहचही कराया त्यांचें । शुभ तिलक न भालीं ज्यांचे ॥
तोडुनी बंध रूढीचे । संस्थापन सद्धर्मांचें ॥
कार्य हें एकची ज्याचें । तो आला भय कवणाचें ॥
होणार जयाचा होता । अवतार तोच हा आतां ॥
अवतरला काय पहातां । भक्तांना कळली वार्ता ॥
शूद्रातिशूद्र हो तुमचे । संपले दिवस दैन्याचे ॥
वैदिक चातुर्वर्ण्याचें । युग आतां चालायाचें ॥
पाखंड खंड करण्याला । अकुलीना दंडायाला ॥
आला हो धावून आला । हा जगदुद्धारक आला ॥३॥
कां? कुठें म्हणुनि पुसतां का? । कधि अंधाला दिसतें का? ॥
उघडा नयना ना झांका । मग तोच सर्व अवलोका ॥
प्रभु जधीं घेत अवतार । उतराया हा भूभार ॥
सदसतासी चढतो जोर । धरणीचा सुटतो धीर ॥
आसुरी तशी दैवी ते । ठाकती शक्ति समरातें ॥
उत्पात पूर होती ते । का नसे चिन्ह आजी तें? ॥
निज मनांत राष्ट्रें कुढती । युद्धाची वाट पहाती ॥
मुसल्मान हिंदु धरिती । वैररूप शस्त्रां हातीं ॥
ना सीमा उत्पाताला । अतिवृष्टि अनावृष्टीला ॥
मूढांनो! प्रभु अवतरला । हा जगदुद्धारक आला ॥४॥

कणकणांत घे अवतार । सच्चिदानंद सुखसार ॥
उसळला विश्वसंसार । पुसतसां कुठें अवतार! ॥
ऐका हा ऐका नाद । त्या डमरूचा पडसाद ॥
त्यांतच मुरलि-स्वन-भेद । ऐकतां चढे उन्माद ॥
चाले हा तांडव नाच । तिकडे तो रास असाच ॥
कां हृदीं अर्जुनि शंकाच । पातला कन्हय्या साच ॥
व्यास भीष्म नारद फिरती । मुनि मैत्रेयादिहि जगतीं ॥
द्वापारीं परि ना गणती । कंस कौरवादिक कुमति ॥
मुनिसंघ तसा या भूला । आजही विचरता झाला ॥
जाणते जाणती त्याला । हा जगदुद्धारक आला ॥५॥
चित्ताकाशीं जगताच्या । केव्हांची वदली वाचा ॥
होणार जन्म देवाचा । जो आज दृष्टिलाभाचा ॥
ऐकुनी तोषले होते । ऋषिसंघ तेधवां होते ॥
कळविलें जगाला होतें । होणार पुढें जें होतें ॥
तें घडलें आज न विसरा । या करा दिवाळ दसरा ॥
व्हा पुढें सरा ना घसरा । विसराच दुराग्रह विसरा ॥
दंभ द्वेष मत्सर त्यजुन । कर परस्परांचे धरुनी ॥
प्रभुचें शिष्यत्व वरोन या भरूं ऐक्य या अवनीं ॥
द्या त्यजुनी औदास्याला । या नव्या दमानें चाला ॥
लाभला न का आम्हाला? । हा जगदुद्धारक आला ॥६॥
व्हा मुसल्मान वा हिंदु । बौद्ध वा पारश बंधु ॥
ख्रिस्त, शीख, यहुदी भेदु- । नाहींच, ऐक्य संबंधु ॥
हस्तपाद अवयव जेवीं । या देहाचे हो तेवीं ॥

हा विश्वपुरुष या सर्वी । नटला हें ठेवा जीवीं ॥
हें कथूं अधिक तें काय । पहा वळुनी अनुभव होय ॥
अनुभव हा एक उपाय । जें कथुनी कार्य न होय ॥
कुणि वाना कोणी निंदा । कळलें तें कळवी बंदा ॥
करणें तो केला धंदा । सोडुनी फलाच्या छंदा ॥
मोहना! बघोनी तुजला । जीव हा आजरे धाला ॥
बघुंदेच जगाला लीला । हा जगदुद्धारक आला ॥७॥

## (८) --नेतों आतां तुज ओढून--

(जाति–बालानंद)

नको विचारूं मला मना । काय नि हें तें पुन्हा पुन्हा ॥
जातां येतां रस्त्यांतून । भरभरल्या बाजारांतून ॥
दिसे दिसे तें नसे नवें । उगीच मग कां प्रश्न हवे ॥
जसें जयाला हवें तसें । मांड मांडुनी ठेवितसे ॥
हजारांतुनी, नवीन कोणी, असेल ध्यानीं,-तें घेऊन;
उचल पाउलें त्वरा करून ॥१॥

जाणें आहे दूर घरा । जरि आलों या बाजारा ॥
हवें तेंच तें तें घेऊन । चल जाऊं आम्ही परतून ॥
उगीच खोळंबून इथें । लाभ काय वद तो मातें ॥
थांबु नको चल दे हात । रमत गमत जाणें व्यर्थ ॥
मोठ्या पहाटे, उठून येथें, आलों तेथें, जहालें ऊन; ॥
जाइल सायंकाल निघून ॥२॥

झप झप पाउल तूं उचलीं । वेळ कित हे बघ झाली ॥
बाजाराचा मोह असा । सोड राजसा चाल कसा ॥

प्रकाश आहे तोंचवरी । मार्ग संपवूं त्वरा करीं ॥
नातर होइल रात्र बरें । नेत्र झांकती अंधारें ॥
वाट चुकोनी, भटकूं अवनी, जाऊं रानीं, ठेंचाळून;
गतप्राण पुरते होऊन ॥३॥
नकोच वळुनी तूं पाहूं । चल वेगें वेगें जाऊं ॥
ओढ घराची मला असे । तुझ्या कलानें घेऊं कसें? ॥
नको करूं हा हट्ट खरा । दोघांहि भोवेल पुरा ॥
सोडून तुला, जातां मजला,-येना! अडला, जीव म्हणून;
नेतों आतां तुज ओढून ॥४॥

## (९) —अमर्त्यप्रीति—

(जाति—गझल)

कुणी सांगा मला कैसी । असे या जात प्रेमाची? ।
असे कोठें मिळे कोठें । कुठें ही वाट हो याची? ॥१॥
हृदीं स्त्रीच्या असे याचा । म्हणे कोणी सदा वास ।
पहा अन्या कुणा परि हा । गमे हो सर्व आभास ॥२॥
नटो ही कामिनीची या । कशीही मूर्त या लोकीं ।
मनींची सुंदरी वात्सल्य- । पूर्णा ती किंवा लेकी ॥३॥
किंवा जननी असो भगिनी । किंवा कोणी दुजीही ती ।
नटे रूपांस घेवोनी । सदा यांच्या मनीं प्रीति ॥४॥
कुणी सांगे असे ठावा । तया जनकास तो प्रेमा ।
कुणी पुत्रा कुणी मित्रा । कुणी घे वल्लभा नामा ॥५॥
कुणी कवि हें वदे आहे । भरोनी प्रेम सृष्टींत ।
कुणी सांगे परब्रह्मीं । असे प्रेमा पुरा नित्य ॥६॥

कुणी सांगे जरी कांहीं । कसें होई समाधान ।
जरी लाभे न शांति कदा । मना होवोन बेभान ॥७॥
नको जीवा कुढूं आतां । करीं जा स्वैर संचार ।
भरारी मार या विश्वीं । पहा शोधून संसार ॥८॥
तुझ्या वाटेंत येती जीं । दरीं खोरीं नग प्रान्त ।
नको भ्रांती करूं त्यांची । खरा तूं वीर विश्वांत ॥९॥
नको थांबूं तुझ्या अंगीं । भरो या प्रीतिचें वारें ।
नको मानूंस मृत्यूचा । बली तूं हें वृथा सारें ॥१०॥
अमर्त्य प्रीति जी लाभे । कशी मर्त्यास सांगा ती ।
अमर्त्य प्रीति नाहीं जी । तरी व्हावी कशाला ती! ॥११॥

## (१०) –वार्धक्य–

(जाति–वसंततिलका)

हे हांसती तरुण वृद्ध म्हणोन मातें ।
तें पाहुं दे मज विचारुन मन्मनातें ।
आहेंच मी खचित वृद्ध तसाच काय ।
कीं साहणें उचित हा उपहास हाय! ॥१॥
ती दंतपंक्ति हलते, कृश देह-यष्टि ।
झाली तशीच गमते बहु मंद दृष्टी ॥
ती कृष्ण कांति त्यजुनी कच शुभ्र झाले ।
तें छान टक्कल शिरीं उदयास आलें ॥२॥
ये खोकला ढसढसां नच आवरे तो ।
घायाळ जीव नकळे कधि सावरे तो ॥
पूर्वानुभूत शरिरीं न शिरेच मस्ती ।

कैसी अमान्य करणें मग वृद्धता ती! ॥३॥
हें मान्य हो परि मला नच खंत याची ।
ही वृद्धता मम मनास मुळीं न जाची ॥
पायीं विजार न जुनी चढते म्हणून ।
झाला असे कुणि वदा मज काय खिन्न ॥४॥
तें पूर्व-सुंदर परी नवता न पावे ।
ऐसें पुराण म्हणुनी मजला न व्हावें ॥
पूर्वील बालिश तसे अति मूर्ख चाळे ।
आतां मला न रुचती बहु दीर्घ काळें ॥५॥
तैं बोबडे सुखद अस्फुट बोल हो, ते ।
होती कसे प्रिय सुसंस्कृत वाक् यदा ते ॥
तेव्हां तसे अपरिपक्व विचार आतां ।
कां लाजवीति न तसेच मदीय चित्ता ॥६॥
उन्माद तो त्यजुनियां नसताच गेला ।
ती शान्ति ना तर पहा मिळती मनाला ॥
हा काल वृद्धि घडवी सकलां समर्थ ।
होई जरी प्रगति कां मग दुःख व्यर्थ! ॥७॥
हांसा तुम्ही युवक हो मज, मी तुम्हाला ।
हांसें न, ही खचित वृद्धि असे तुम्हाला ॥
अज्ञान हें मज कळे तुमचें म्हणून ।
आशीर्वचास वदतों हरिला स्मरून ॥८॥

## [११] –विकास–

(जाति–चंद्रकान्त)

सफेत होती शिळा तियेवर, नाजुक ते घाव ।।
घालित होता कसलेसे तो, कुणी तरी राव ।।
खपले उडती कधीं सभोती, सान कधीं मोठे ।।
कुठें सह्य त्या असह्य होती, वेदनाच कोठें ।।१।।
कळत न होतें स्थित्यंतर तें, काय घडत होतें ।।
परि जडतेला अंतरिच्या कुणि, कांपवीत होतें ।।
दिवसामागें दिवस निघोनी, गेले एक दिनीं ।।
अचुक भावना तिच्या उदेली, अवचित एक मनीं ।।२।।
नसे शिळा मी एक गोजिरी, मूर्त असे घडलें ।।
कुणी घालुनी घाव घणाचे, दिव्य रूप दिधलें ।।
स्फुरला आत्मा प्राणप्रतिष्ठा, कोणीशी केली ।।
असंख्य जीवां ती स्फूर्तीची, देवताच बनली ।।३।।

## [१२] –आत्मशक्ति–

(जाति–पंचचामर)

जडत्व सर्व फेंकुनी सुटेन मोकळा अहा! ।
अनंत व्योमीं या उडोन चाललों पहा पहा! ।।
तुटोन पिंजरा अफाट या जगांत स्वैरसा ।
भरारुनी उडोन उंच सर्व व्यापुनी दिशा ।।१।।
गडाडुनीहि मेघ हा मला न कांपवूं शके ।
कडाडुनीहि वीज हे मला न भेदरूं शके ।।
अथांग सागरासही न रोधितांच ये मला ।

अहो! नभास व्यापितां न ये ममात्म-सत्कला ॥२॥
नदी नगादि तारकाहि हे ग्रहादि गोलही ।
उफाळुनी मला न गर्व दाविण्या समर्थही ॥
ममात्मतेज पाहुनी जळोन सूर्य जातसे ।
अमर्त्य मी म्हणोन मृत्यु मृत्युलाहि येतसे ॥३॥
गती जगास ही कळे कशामुळें आतां मला ।
भरोनि पोकळी सळाळतेहि चेतना-कला ॥
निनादतोच नाद कोठुनी परंतु तो उठे ।
उठे मदंतरीं पहा मलाच छेडुंद्या तिथें ॥४॥
कशास बिंब हें मला हवें फुटोच आरसा ।
मलाच मीच पारखा नकोच भास हा असा ॥
अथांग काय? चेतना तयांत विश्व हें बुडे ।
खरेंच! विश्वभास चेतनेवरील बुड्बुडे ॥५॥

## [१३] – प्रवाह पावित्र्य –

(जाती–सूर्यकान्त)

खळ खळ वाहे नदी पाहुनी तुफान उठतें मनीं ।
परि बांधोनी बांध अडवितां जल जाई तुंबुनी ॥
खिन्नपाहुनी तें मन होई डबकें वा, हे नदी ।
काय फरक तो तया कळेना त्या दोघांच्या मधीं ॥१॥
फुलपाखरु तें उडे बागडे विविध रंग चमकती ।
तेंच टोंचितां फलकावर मग नेत्रांना बोंचती ॥
गोड फुलोरा वेलीवरती बघुन हृदय नाचतें ।
ओंजळ भरुनी घेतां त्याची चेतनाच लोपते ॥२॥

शैशव बाल्यावस्था यौवन प्रौढ वृद्धता जरी ।
त्या त्या कालीं मोहक ते ते भाव उठति अंतरीं ॥
परंतु प्रेतावरी ठरेना नजर वांकडी फिरे ।
स्वभाव हा रसिकाचा त्याला कोण आवरी बरें! ॥३॥
रक्त फिरे धमनींत तेधवां लाल अधर पोंवळें ।
आतुर चुंबायास जीव परि व्रणा पाहुनी पळे ॥
प्रकाश पहातां कोंडाया ये तिमिर तेथ धावुनी ।
अनुभव ये जो कसें तयाला जावें हा विसरुनी ॥४॥
किती वदावें सळसळत्या या चैतन्या पाहुनी ।
तेथ रमावें नाचत जावें त्याजसवें जीवनीं ॥
कोंडाया पाहतां तयाला सुंदरता त्यासवें ।
पळे हवेंतर आलिंगावें शव कौरुप्यासवें ॥५॥

## [१४] --"सौंदर्य नासुनी लाभ काय हा कुणा"-

(जाति–मंजरी)

पीतसे पुष्प-मधु येऊन फुलपाखरूं ।
स्वच्छंद तयाला नको नको तूं धरूं ॥
किति सुंदर याचे पंख असति गोजिरे ।
घडविले विधीनें हळुच आपुल्या करें ॥१॥
मोकळ्या हवेवर सोडुन दिधलें तया ।
बागेंत फुलांच्या भरभर हिंडावया ॥
किति गरिब बिचारें त्रास कुणाला नसे ।
किति मोहक या आल्हाद मना देतसे ॥२॥
बहुरंगी ठिपके सुंदर पंखांवरी ।

गुंगलें चित्त हें पाहुन कारागिरी ॥
स्वैर त्या फिरूंदे उभा राहुनी दुरी ।
निष्पाप असा आनंद लूट क्षणभरी ॥३॥
करुं नको मानवा स्पर्श तुझा पाशवी ।
अकलंक राहुं दे रसिका जें मोहवी ॥
भोगुंदे तया स्वातंत्र्य असे जें दिलें ।
दैवानें त्याच्या उघड असे लाभलें ॥४॥
का करिसी हेवा हरुनि तयाच्या सुखा ।
मिळविसी काय होसील करंटा फुका ॥
हें सोड वेड घे मौज तुझ्या लोचना ।
सौंदर्य नासुनी लाभ काय हा कुणा! ॥५॥

## (१५) --दोन्ही मीच--

(जाति--कटिबंध)

दीर्घ अनन्ताच्या शय्येवर ।
स्वस्थ पहुडलों होतों मी तर ।
विश्व-उशीवर ठेऊनियां शिर ।
भव्य नभाच्या भवनीं निद्रित, शांत शांत डुलक्या घेत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥१॥
एकटाच ना भेद-छटा ही ।
मीच सावलीही मम नाहीं ।
मीच अंतरीं माझ्या राहीं ।
गुंगत रंगत स्वप्नपटावर, मलाच मी रेखाटीत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥२॥

इतुक्यामध्यें कोण कोठुनी ।
नकळे आलें मला चकवुनी ।
सौंदर्याची का सौदामिनी ।
नाचत, ठुमकत, मुरकत, संन्निध, कोण सुंदरी ही येत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥३॥
पहातां तिज येतांना जवळी ।
स्तिमित होउनी नजर भिडविली ।
चंचल नेत्रांतील बाहुली ।
हलली, खुलली, कळी सुखाची, रसरसला हा हृत्प्रांत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥४॥
नयन-रवीचे रश्मि सोडुनी ।
गूढ तमाला दूर करोनी ।
नृत्याचा हा फेर धरोनी ।
उठवी निद्रेंतून मला मी पाहुं लागलों निभ्रान्त ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥५॥
तोंच बिलगली नकळत मातें ।
अवचित झालें ऐक्य आम्हातें ।
अनुभवितां मी त्या स्पर्शातें ।
उठलों उधळित हर्षातें धरिला नवनवतीचा हात ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥६॥
पुलकित झाली खुद्कन् हंसली ।
सुरतकालीं अधरामृत प्याली ।
रसिक रसें रसिका ती न्हाली ।

छेलछबेली, हे अलबेली, भोगुं लागली एकांत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥७॥
तीन पदर वेणीचे सुंदर ।
गुंफुन हलवी ती पाठीवर ।
गळां टाकिले माझ्या ते कर ।
अस्थिर झाली, मला विचारी, स्थिर का ऐसे हो कांत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥८॥
मला कळेना कोण असे ही ।
न्यहाळून मी तिजला पाहीं ।
तोंच दिशा या विरल्या दाही ।
स्वप्न निमालें, द्वैत न उरलें, प्रलय सृष्टिचा हा त्यांत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥९॥
मीच पाहिला खेळ, खेळलों ।
मीच कांत कातांही झालों ।
मी मदीय रूपीं संचरलों ।
आत्म-समाधि न भंग होय ही नाहीं अनंताला अंत ॥
दुजा भाव नव्हता त्यांत ॥१०॥

## [१६] –इथेंच मजला राहूं दे–

जाति–बालानन्द)

इथेंच मजला राहूं दे ।
याच जगीं मज वावरूं दे ॥
नकोच जाया दूर वनीं ।
काहुर उठलें जरी मनीं ॥१॥
अनेक परिचे नाच इथें ।

अनेक परिचे जाच इथें ॥
कर्तव्याला वाव मिळे ।
निष्क्रियता येथून पळे ॥२॥
राग रोष या प्रेमानें ।
जीवाचें हंसणें रडणें ॥
कुणी धरी मुरलीचा सूर ।
कुणी ओरडे हा भेसूर ॥३॥
संमिश्रण सुखदुःखाचें ।
जीवन जीवा हेंच रुचे ॥
याहुन एकांतींच मला ।
नकोच कोठें जायाला ॥४॥
या विश्वाच्या सांखळिचा ।
एक दुवा मी हो साचा ॥
तोडुनि मग हा पाश कसें ।
जीवन जगणें शक्य असे ॥५॥

## [१७] --हस्तांदोलन--

(मिश्र जाति–भूपति-मंजरी)

किति रांकट याचे हात धुळीनें मळले ।
करिसी न म्हणुन का हस्तांदोलन नकळे ॥
हे गोंडस तव कर नाजुक यांचा स्पर्श ।
तळहात तुझा श्रीमंतीचा आदर्श ॥
त्या हातावर ते घट्टे पडले किती,
तडतडे स्नायु तो हाडें डोकावती,

लुसलुसित तुझे कर जणु गिरद्या भासती,
तव करीं रक्तिमा हात तसे ते काळे ॥
करिसी न म्हणुन का हस्तांदोलन नकळे ॥१॥
प्रीतीचा कांटा हातावर त्या आला ।
तव करीं मुद्रिका रत्नाच्या पाजळल्या ॥
तो हात ऊष्ण जरी ऊब तयाला नाहीं ।
तव करीं रक्त सळसळे फुटाया पाही ॥
तो हात मीलनासाठीं रे धडपडे,
तव करास जडता आली न सरे पुढें,
तव थंड चालते नाडी त्यांतिल उडे,
तुज वाटे का हे गरिबीचे या चाळे ॥
करिसी न म्हणुन का हस्तांदोलन नकळे ॥२॥
भूजननीचीं या एकच तुम्ही बाळें ।
या देहीं तुमच्या एकचि आत्मा खेळे ॥
श्रीमन्ती गरिबी यांना एकच माती ।
नच उच्च नीच हा भेदभाव रे अन्तीं ॥
दिल साफ करा देउनी कराला कर,
येउंद्याच तुमच्या माणुसकीला भर,
बडवून शेवटीं रडाल नातर उर,
का दैवचि फिरलें प्रेम आटलें सगळें ॥
करिसी न म्हणुन का हस्तांदोलन नकळे ॥३॥

# (१८) —वेडा—

(जाति—फटका)

बसला मुंबापुरी देखिला कोणी वेडा रस्त्यांत ।
होता उघडा तसा आंधळा तसा मनींचा अतृप्त ॥१॥
पोत्याची ती एक वळकटी आणिक काठी वेळूची ।
'आलीमिनिम्'चें ग्लास तसें तें होती संपत्ती त्याची ॥२॥
कुणा ठाउकें वेड तयाचें खरें किंवा खोटें होतें ।
मात्र माणसांमधीं नसे तो हेंच सांगतां मज येतें ॥३॥
स्वत:शींच बडबडे धडपडे शिव्याशाप दे लोकांना ।
"तुम्ही चैन मेल्यांनों करितां भुकाच मी मरतों हा ना! ॥४॥
फिरती या मोटारी गाड्या श्रीमंतांची चैन अशी ।
कां हतभागी मी आम्हासी दगडाचीही नसे उशी ॥५॥
नाहीं दिधलें अन्न कुणीही आज उपाशीं मरें असा ।
रडाल उद्यां मेल्यांनों मज वेडा म्हणुनी आज हंसा" ॥६॥
कोणी वदला फेरीवाला त्या रस्त्यांतुन जातांना ।
"दुर्दैवें तूं दु:ख भोगिसी, वरी शाप कां लोकांना" ॥७॥
चरफडला बडबडला वेडा स्वत:शींच मग उत्तरला ।
"हां! तकदीर हमारा हमको परमात्मा देनेवाला ॥८॥
यदि खानेको देते तुम तो क्यौं भूखे हम मरते हो ।
यह मेरा किस्मत् कहनेका क्या तुमको अधिकार कहो?" ॥९॥
वेड्याचा हा प्रश्न ऐकुनी मनीं हांसला कविराजा ।
म्हणे धर्ममार्तंडांनों या प्रश्नाला उत्तर द्या जा ॥१०॥
जातां कोणी शेट फेंकुनी पैसा देई त्या एक ।

भिरकावुनि वेड्यानें दिधला तो पैसा ना घे भीक ॥११॥
लोक पाहती चार भोंवतीं म्हणती वेडा खराच हा ।
असे भिकारी नसे स्विकारी द्रव्य कुणी जर दिलें पहा ॥१२॥
वेड्यानें त्या पत्थर घेऊन जनांकडे त्या उगारिला ।
"मेल्यांनों मज हंसतां पैसा घेऊं कैसा झुगारिला ॥१३॥
पैसा पैसा करणें धनिकां योग्य असे मज नसे तसें ।
पैसा घेऊन कोठें जाऊं पोटाला द्या तृप्त असें" ॥१४॥
बाजूला बसलेला होता फळेंविक्या तीं विकण्याला ।
दया येउनी वेड्याची त्या फळें आणुनी दे त्याला ॥१५॥
"भला तुम्हारा हो, अच्छा! मैं भूखा यह अब खाऊंगा ।
नहीं रहूंगा इधर अभी जग घुमता घुमता जाऊंगा" ॥१६॥
गेला वेडा कवि कौतुकला चित्तीं पडला प्रश्न तया ।
जग वेडें, कीं तो वेडा, कीं मी वेडा हें कूट तया ॥१७॥

## [१९] –बाळपणींचा काळ–

(जाति–चंद्रकान्त)

किति गमतीचा बाळपणींचा काळ सुखाचा तो ।
हसतां, रडतां, खेळ खेळतां भरभर बघ जातो ॥१॥
गरिबी श्रीमंतीची तेव्हां कल्पनाच नसते ।
जिकडे तिकडे प्रेम स्नेह आणि मैत्री वावरते ॥२॥
चिंता चित्ता काहीं नच ती स्वर्गधरेवरती ।
खाणें, रडणें, पुन्हा खिदळणें, यांत मनें रमती ॥३॥
निष्कपटी मन वृत्तिहि भोळी गाढ प्रेम वसतें ।
जें प्रीतीनें ओढी जवळी आपुलें वाट तें ॥४॥

राग, रोष सोबती क्षणाचा स्नेह जुळायाला ।
आड न काहीं ये गर्वाचा स्पर्श न हृदयाला ॥५॥
मित्र-मैत्रिणी बाळपणींच्या सर न कुणा त्यांची ।
रीत वेगळी प्रौढपणींच्या साऱ्या ओळखिची ॥६॥
सर्व रसिकता नांदत होती जीवनांत तेव्हां ।
वृद्धपणीं मग भेडसाविते रुक्षताच जीवा ॥७॥

## [२०] –नरें नराला हीन बनविलें–

जाति–फटका)

पिठांत पाणी घालुनि जननी दुग्ध म्हणोनी दे कुमरा ।
अश्रु लोचनीं जमले पुसुनी निज पदरें ती द्विजदारा ॥१॥
द्रोणचरित्रीं महाभारतीं पुराण हा इतिहास असा ।
काय आजही अनुभव त्याचा येत न आम्हाला सहसा ॥२॥
मन गरिबांचें मरतें त्याचें सुखदु:खहि ना कुणा जरा ।
जगताची ही रीत पाहुनी बोंचति कांटे किती उरा ॥३॥
एक चिरडितो दुसऱ्याला तें कौतुक इतरांच्या नयनीं ।
बळी तोच जर पिळी कान मग नीति राहिली कुठें जनीं ॥४॥
नरें नराला हीन बनविलें ना दैवानें देवानें ।
नाचतात भूतें स्वार्थाचीं मग युद्धाच्या रूपानें ॥५॥
शहाणे शिकुनी कोणि न होती बंधुभाव मनीं नसे जरा ।
काळ क्रांतिचा अचुक ठरे मग सृष्टीचा हा नियम खरा ॥६॥

## (१९) –अशक्य मैत्री–

(जाति–चंद्रकान्त)

कधीं दरिद्री श्रीमंतांची मैत्री का होते ।

कोण ओंवितें सांगा जुळुनी रत्न-कांचमणिते ॥१॥
हिरा कोळसा एक कुटुंबीं जन्म जरी घेतो ।
हिरा शोभवी ताज कोळसा घरोघरीं फिरतो ॥२॥
हंस-बकाची वदा कधी का मैत्री हे जुळते ।
लोकविलक्षण ऐसें जगतीं नसे ऐकिलें तें ॥३॥
श्रीमंतांची मोटर कोठें, कुठें भव्य बंगला ।
गरिबाची झोंपडी कुठें ती कोण पुसे तिजला ॥४॥
श्रीमंतांच्या घरीं शिजे ती रोज पुरणपोळी ।
नसेच गरिबाघरीं द्यावया जीवहि अफु गोळी ॥५॥
कसें जुळावें श्रीमंतीचें अन् त्या गरिबीचें ।
जुळो कधीं जर असेल जुळणें त्या माणुसकीचें ॥६॥

## [२३] —वद ईश्वर नाहीं कोठें—

(जाति—उद्धव)

प्रेमळास हृदयीं भेटे । वद ईश्वर नाहीं कोठें ॥ध्रु.॥
निर्विषयानंदें बाळें अंगणीं क्रीडती जेथें ।
छबकडें कडे घेवोनी घे चुंबन जननी जेथें ।
आनंदरूप परमात्मा सर्व काळ नांदे तेथें ।
वेलींवर कुसुमें हंसती,
सारिका मधुस्वन करिती,
नभि विविधरंग लखलखती,
परमेश्वर आहे तेथें । वद ईश्वर नाहीं कोठें ॥१॥
प्रणयाकुल दंपत्यें जीं विसरोन सकल स्वार्थासी ।
अर्पिती परस्पर हृदया त्यजुनीयां या द्वैतासी ।

स्नेहार्द्र हृदय होवोनी भेटतो एक दुसऱ्यासी ।
विकसतें कुमुद कासारीं,
चंद्रिका सुधा स्त्रवणारी,
नभिं चपला लखलखणारी,
परमेश्वर आहे तेथें । वद ईश्वर नाहीं कोठें ॥२॥
स्वहितास सोडुनी पाणी परहितास जागृत राहे ।
जो देश रक्षणासाठीं निज देह अमोलिक वाहे ।
सत्पथा किमपि सोडोनी जो अनृतगामी नोहे ।
नृप, प्रजारंजनासाठीं,
सर्वस्व आपुलें वांटी,
अभिमान धरीना पोटीं,
परमेश्वर आहे तेथें । वद ईश्वर नाहीं कोठें? ॥३॥
गुरुशिष्य-प्रेमसंवाद सद्बोध चालला जेथें ।
कवि प्रतिभाशाली गाई प्रतिभेनें मंजुळ गीतें ।
या विषयांपासुन वळवी निजमनास योगी जेथें ।
बंधु-प्रेम भगिनीवरती,
मोहास न तेथें वसती,
कर क्षुधिता अन्ना देती,
परमेश्वर आहे तेथें । वद ईश्वर नाहीं कोठें? ॥४॥

× × ×

देखुनी भ्रमर मकरंदा करि जेथें मंजुल गान ।
तरुणास रुचे तरुणी ती करण्यास अधरद्वय पान ।
देशकार्य उचली नेटें मिळवायासी धनमान ।

भोंदाया जन हे सारे,
करि विचित्र तितुकें सारें,
तें स्थल भरलें अंधारें,
परमेश्वर नाहीं तेथें । वद ईश्वर नाहीं कोठें? ॥५॥
घातपात चाले जेथें ही वाणी अनृत बोले ।
बळ आपुलें रक्षण करण्या राज-दंड जेथें चाले ।
निष्प्रेम वधुवरें जेथें हीं बद्ध रूढिच्या जालें ।
आनंद टिकेना तेथें,
मग परमात्मा तो कोठें,
जग चाले हें उफराटें,
परमेश्वर नाहीं तेथें । वद ईश्वर नाहीं कोठें? ॥६॥

× × ×

कां डोळे मिटुनी करितां अंधार आपुल्यापुढती ।
हातिचें त्यजुनि कां पळतां मज सांगा पुढती पुढती? ।
हें तत्त्व शोधितां भिन्न प्रवृत्ति न वा निवृत्ति ।
सम प्रपंच आणि परमार्थ,
द्या टाकुन तितुका स्वार्थ,
धुंडितां इतर कां व्यर्थ,
परमेश्वर नाहीं जेथें वद ईश्वर नाहीं कोठें? ॥७॥
हा विराम पावे राम सर्वत्र राम जाणोनी ।
हें वर्म जाणुनी कर्म आचरी काम त्यागोनी ।
अभिराम प्रभु सकलांचा तो सर्वकाम चिंतोनी ।
अजि धन्य जाहलों जगतीं,

मज सहज लाभली सुगती,
पावलीच सद्गुरु-मूर्ती,
परमेश्वर आहे तेथें । वद ईश्वर नाहीं कोठें? ॥८॥

## [२३] –करूं प्रसन्न या मना–

(छन्द–अभंग)

करूं प्रसन्न या मना, सर्व टाकोनी वासना ॥१॥
मग तें दाखवील मार्ग । जेंणें संसारीं ये स्वर्ग ॥२॥
मागें विचारासी सारूं । आत्म जाणीव स्वीकारूं ॥३॥
नसतें मानुनी असतें । भुलवियलें आपणातें ॥४॥
आतां झाडुनीयां अंग । होऊं सदाचे निःसंग ॥५॥

## [२४] --विचारानें नाहीं मारिला विचार--

(छन्द–अभंग)

विचारानें नाहीं मारिला विचार ।
आचारें आचार वाढविला ॥१॥
घात बाह्यज्ञानें बळावली स्मृति ।
मग कैंची मुक्ति हाता लागे ॥२॥
एक भाव मेला दुजा प्रसवला ।
तेणें लाभ झाला काय सांगा ॥३॥
विचारें विचारा घातलें कुंपण ।
लागलें भांडण जन्मवरी ॥४॥
नाहीं द्वंद्वांतोनी जीवा सोडवण ।
जोंवरी हें मन मेलें नाहीं ॥५॥
मी तों आत्मरंगीं रंगलों जाणोनी ।
आहें तैसा जनीं राहें सुखें ॥६॥

लिखित विभाग [illegible]

## (२५) --असार हा संसार--

(जाति-चंद्रकान्त)

असार हा संसार ॥ मनारे ॥ यांत असे हरि सार ॥ध्रु॥
ऐसें वदतां सर्व दचकती म्हणती हा कुविचार ।
करी मानवा निष्क्रिय, सुटतो बुद्धीचा आधार ॥१॥
विचार हा जे जनीं फेंकिती दांभिक ते असणार ।
या कुविचारें नाश जगाचा झाला अन् होणार ॥२॥

× × ×

सुविचारी परि अनुभव कैसा विसरोनी जाणार? ।
नाम-रूप का टिकतें सांगा? शाश्वत का व्यवहार? ॥३॥
खोटें का धन-सुत-वनिता हा मान इथें रहाणार? ।
देहहि टाकुनि काय न अंतीं प्राणी हा जाणार? ॥४॥
कोठें चुकतें, म्हणतां अवघा प्रपंच हा बाजार? ।
दे, घे, करुनी फेडुनि ऋण का नाहिं परत फिरणार? ॥५॥
खेळाला जो खेळ म्हणे तो मूर्ख कसा ठरणार? ।
खेळ खेळिया होऊन खेळे तो कैसा चुकणार? ॥६॥
कोण म्हणे हें परस्परांचें नातें ना उरणार? ।
परि जीवन हें अनंत अंत न तें कैसें सुटणार? ॥७॥
ममत्व धरितां मर्यादा ये निश्चित मगमुकणार- ।
स्वपरहिताला, कसें आम्ही मग कार्य जगीं करणार? ॥८॥
असंग ऐसे विश्वप्रेमी जरि न आम्ही बनणार? ।
तरि स्वार्थापुरतेंच करोनी स्वस्थ न का बसणार? ॥९॥
विश्वाभास म्हणे त्या कळतें मीहि त्यांत असणार ।

कोण स्वतःला भास म्हणोनी विश्वीं वावरणार? ॥१०॥
मिथ्या जग हें शब्द फुकाचे वाऱ्यावर विरणार ।
अर्थ न त्याचा कळे जयाला तोची बावरणार ॥११॥
मायामय जग म्हणतां तो भी जो विषयीं रमणार ।
विरक्त निष्क्रिय राहिल कैसा प्रगतिपंथ क्रमिणार? ॥१२॥

## (२६) –उपवर मुलीस–

(जाति–भूपतिवैभव)

हे प्रेमल बाले सान अजुन तूं अससी ।
समजसी स्वतःला शहाणी परि गे फससी ॥१॥
वर सुंदर गोरा शिष्ट धनिक मिळवावा ।
हें ध्येय ठेवुनी कष्टविसी कां जीवा? ॥२॥
संसार सुखाचा हवा तुला जर बाई! ।
तरि फोल कल्पना अशा सोडुनी देई ॥३॥
सौंदर्य करावें काय? शील जर नाहीं ।
धिक्! गौरवर्ण तो जरी कालिमा हृदयीं ॥४॥
शिष्टता कशाला दुष्ट भाव जरि चित्तीं ।
लाभे न प्रीति जर काय सुखद संपत्ती! ॥५॥
शिकविलें तुला गे हीन ध्येय हें कोणी ।
हे स्वार्थी प्रिय-जन मूर्ख जनक नी जननी ॥६॥
सौंदर्य हवें तुज, तशी प्रतिष्ठा त्यांसी ।
धनलोभ असे सामान्य तुम्हा सर्वांसी ॥७॥
जरि तरुण अससि तूं विचार करिं हा थोडा ।
नाच्च पायीं पडला जों लग्नाचा खोड ॥८॥

तारुण्य तुझें तुज दाखवील बघ वाट ।
या मूर्ख कल्पना सोड सोड हो धीट ॥९॥
उसळतें प्रेम तव हृदयीं त्याला साद–
घाल गे तुला मग येइल हा पडसाद ॥१०॥
सौंदर्य तुला शीलाचें दिसतां युवती ।
हे बाह्य लकाकी विरेल वाऱ्यावरती ॥११॥
प्रेमास्तव करण्या गरिबीचा संसार ।
धरिसी न धनाचा मोह जाण मग फार ॥१२॥
पतिसेवा करितां स्वाद प्रीतिचा घेतां ।
शिष्टता खुळी लाजेल तुला मग पहातां ॥१३॥
सौंदर्य, संपदा, तशी प्रतिष्ठा, पदवी ।
ही टिकेल ऐशी आस कदा न धरावी ॥१४॥
प्रेमाविण आहे व्यर्थ सौख्य हें सारें ।
पुसुं नको जगाला चाल तुझ्या आधारें ॥१५॥
तूं नकोच फसवूं तुझ्या मनाला रमणी ।
घे याच क्षणीं तुज हवें तेंच पारखुनी ॥१६॥
संसार सुखाचा करण्या स्वार्थत्याग ।
पाहिजे तरी येईल भूवरी स्वर्ग ॥१७॥
संपदा सुखाची मिळेल तुजला तेव्हां ।
लाभेल जीवनीं योग्य सोबती जेंव्हां ॥१८॥
म्हणुनियां कल्पना खुळ्या सोडुनी आतां ।
सोबती निवड हा विचार करुनी पुरता ॥१९॥
हो मुली सूज्ञ हें उच्च ध्येय बाळगुनी ।
घे मुख्य शील, गुण, प्रेम तसें पारखुनी ॥२०॥

## [२७] --भांडूं कशाला भांडणें--

(जाति–गझल)

भांडूं कशाला भांडणें आतां वृथा मी या जनीं ।
ही शांति मातें लाभली संदेह उरला ना मनीं ॥१॥
या वासनेचीं सर्व सोंगें संपलीं चाले कसें– ।
हें नाटय येथें, यापुढें होईल हो जाणा हंसें ॥२॥
फेंकुनी काहींतरी या नित्य निश्चल जीवनीं ।
उठविलीं वलयें किती हीं त्यांतची मी रंगुनी ॥३॥
गेला वृथा हा काळ माझा भान नव्हतें तेधवां ।
हें ज्ञान मातें जाहलें तो खेळ आतां कां हवा! ॥४॥
हे नुरे आशा कशाची ते नसे स्पर्धा मला ।
वाद हा न विवाद आतां हा कुणाशीं राहिला ॥५॥
स्वासनीं या बैसुनी निज योग मी हा साधिला ।
भटकूं कशाला जीव हा संतुष्ट, रुष्ट न राहिला ॥६॥
भ्रांति जेथें क्रांति तेथें चालुंदे चाले तरी ।
हेवा न दावा राहिला उतरूं कशाला संगरीं ॥७॥
ना मला रिपु-मित्र कोणी मीच या विश्वीं असें ।
ही असे स्त्री हा पुरुष हा भेद मान्य न हो असे ॥८॥
चालवाया देह-यात्रा द्वैत हें धरिलें मनीं ।
बाहेरुनी प्रतिसाद आंतिल वेगळा प्रणवध्वनी ॥९॥

समाप्त

स्वकमत. वि.

# शुद्धिपत्र

[ मुख्य चुकांचें शुद्धिपत्र खालीं दिलें आहे, अन्य बारीकसारिक चुका वाचकांच्या लक्ष्यांत येतीलच. ]

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| मुखपृष्ठ | | शके १८७६] [सन १९५४ | शके १८७७] [सन १९५५] |
| प्रस्ता पृ. ९ | ओ. ६ | गंगा-गोदेच | गंगा-गोदेचा |
| प्रस्ता. पृ. ९ | ओ. ८ | श्गीं | रंगीं |
| २ | ३ | देड़पट | देहघट |
| २ | १० | क्लेष | क्लेश |
| ३ | ४ | ज्ञानखी | ज्ञानरवि |
| ६ | १४ | जथें | जेथें |
| १० | ४ | नारळींचें | नारळीचें |
| १० | ७ | सूख | सुख |
| १८ | १२ | दुश्चित | दुश्चित्त |
| २० | ४ | विचार | विचारी |
| २२ | १ | कृष्णरूप | कृष्णमुख |

२४ पंधराव्या अभंगांतील नववा चरण सबंधच छापावयाचा राहिला तो खालील प्रमाणें पाहिजेः–

९ "याच्या प्रेमाचा जो पूर । कामिनीचा यौवनभर ॥९॥

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३२ | १३ | तेथें | तेथ |
| ५२ | ३ | रुततो | रुतती |
| ५९ | २ | मनीचें | मनींचे |
| ६४ | १० | मता | मना |
| ६४ | १७ | सान्निध | सन्निध |
| ६४ | १८ | आतां | जाता |
| ६६ | १ | कातां | कांता |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६७ | ९ | म्हणे | म्हणो |
| ७१ | ६ | नाहीं | नामीं |
| ७८ | ४ | तयासी | तयांसी |
| ७९ | ११ | लावे | लावी |
| ९० | ८ | चालंदे | चालूंदे |
| ९६ | ३ | काढीतां | काढीता |
| ९६ | ४ | घेतां | घेता |
| ९६ | ६ | हरी | हरि |
| ९८ | २ | धर्मविंदु | धर्मबिंदु |
| १०७ | ९ | ठेत्री | ठेवीं |
| १०८ | ६ | परि तेथहि | परि मी तेथहि |
| १२७ | ९ | दुग्धाशस्तव | दुग्धाशेस्तव |
| १३२ | १० | जग सारें | जग हें सारें |
| १३२ | १८ | तारका | तारक |
| १३३ | १६ | हरि | हरी |
| १५४ | २१ | रंगयु | रंगयु |
| १५८ | ८ | हाता | होता |
| १५९ | १५ | दिगाळ | दिवाळी |
| १५९ | १७ | त्यजून | त्यजुनी |
| १५९ | १८ | वरोन | वरोनी |
| १५९ | २१ | पारश | पारशी |
| १६० | २२ | कित | किती |
| १६७ | ९ | हासील | होसील |
| १७३ | २३ | वाट | वाटे |
| १८० | २३ | नाच | नच |
| १८० | २३ | खोड | खोडा |

# "सुलभतत्त्वज्ञान" या ग्रंथावरील कांहीं अभिप्रायांतील अक्षरशः विशेष.

...जीवनांतील अनेक कोडीं या ग्रंथाच्या वाचकाला आपलीं आपणच सोडविता येतील...पुस्तकांतील सर्वच प्रकरणें मननीय असून त्यांतले पुष्कळच सिद्धांत बुद्धीला व तर्कालाही पटण्यासारखे आहेत...अशा प्रकारचें हें उच्च तत्त्वज्ञान सामान्य वाचकांच्या आटोक्यांत आणून देण्या इतक्या सोप्या भाषेत लिहून सृष्टींतील अनेक गूढ तत्त्वांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आम्ही ग्रंथकाराचें अभिनंदन करतों.

(**श्री. ज. स. करंदीकर**, केसरी. १३-७-१९५२)

लेखकाची भाषाशैली ओघवती असून विषय विवेचनांत त्याच्या बहुश्रुतपणाचा प्रत्यय वाचकाला पानोपानीं येतो. हें पुस्तक प्रारंभापासून अखेरपर्यंत वाचनीय वाटेल.

(**लोकमान्य**. २-६-१९५२)

सोप्या भाषेंत भारतीय तत्त्वज्ञानाचें नवनीतच जणु श्री. देसाई यांनीं सामान्य वाचकांनां सादर केलें असून तें रुचकर तर आहेच, पण सामान्यांच्या प्रकृतीला पचण्यासारखेंही आहे.

(**विविधवृत्त**. २५-११-१९५४)

कर्मयोगी तत्त्वज्ञानी रा. नारायणराव देसाई यांनीं मानवी आयुष्याचा प्रदीर्घ व कंटकमय मार्ग सुलभतत्त्वज्ञानाच्या नंदादीपानें प्रकाशित करून हिंदुसमाजावर मोठे उपकार केले आहेत.

(**बलवंत**. २०-२-१९५२)

परिशीलन, मनन व आचरण या तीन प्रकारच्या सामुग्रीच्या साहाय्यानें हें पुस्तक लिहिलें असल्यामुळें तें ज्ञान, सौंदर्य व प्रसाद यानीं नटलेलें आहे.

(**समाजसत्ता**. ११-२-१९५०)

...असे ग्रंथ म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य कालांत भारतीय संस्कृति पुनरुज्जीवित करणारे झरे होत...

(किरात. ११-२-१९५२)

...हें पुस्तक वाचीत असतां आपल्या जीवनाचा मागील व पुढील एकेक कप्पा खुला होत जातो..... हें पुस्तक वाचून झाल्यावर वाचकाची स्थिति गीतेंतील अर्जुनानें म्हटल्याप्रमाणें "मोह गेलाचि तो देवा कृपेनें स्मृति लाभली। झालों निःशंक मी आतां करीन म्हणसी तसें" अशी होते...

(हिंदसेवक. ४-११-१९५१)

...तत्त्वज्ञानांतर्गत विचार म्हणजे ज्यांना केवळ थोथांड वाटतें तसेंच अध्यात्माविषयीं ज्यांना सर्वस्वीं उपेक्षा बुद्धि आहे, अशा लोकांच्या विचारांना चालना देण्याइतकी मौलिक सामग्री या ग्रंथांत अवश्य आहे. गूढ वाटणाऱ्या अनेक गोष्टीचा श्री. देसाई यांनीं केलेला उलगडा विचारप्रवर्तक असून 'सनातन व बुरसटलेल्या' वाटणाऱ्या अनेक कल्पनांतही शास्त्रीयता असणें अशक्य नाहीं येवढें तरी अगदीं नास्तिकातल्या नास्तिकालाही व जडवाद्यांतल्या जडवाद्यालाही बहुधा वाटू लागेल.

(**साप्ताहिक तरूण भारत**, नागपूर. २५-७-५२)

...तत्त्वज्ञानाचा अनुभव घेऊं इच्छिणारांनीं याचें (या ग्रंथाचें) अवश्य वाचन करावें अशी आमची शिफारस आहे......प्रत्येक प्रकरणामध्यें स्पष्ट व सहज वाचकांस समजेल अशा प्रकारचें प्रतिपादन केलेलें आहे. यामुळें वाचकांस हें पुस्तक वाचल्यानंतर काहीं तरी नवें ज्ञान नव्या पद्धतीनें प्राप्त केलें असें वाटल्याशिवाय राहणार नाही.

पुस्तक अंतर्बाह्य सुंदर आहे. प्रतिपादनांत कोठेंही क्लिष्टता नाहीं. यासाठीं घरोघर स्त्रीपुरुषांनीं वाचण्याजोगें हें पुस्तक आहे. शाळा व कॉलेजामध्यें सर्व साधारण वाचनीय पुस्तकांचा संग्रह करीत असतात, त्यांत हें पुस्तक ठेवलें तर तें विद्यार्थी वाचतील व विशेष प्रयास न करतां आपल्या तत्त्वज्ञानाशीं त्यांचा परिचय होईल.

(**पुरुषार्थ**-मासिक. ऑगस्ट १९५३)

या पुस्तकाचा विशेष हा आहे कीं, तें वाचतांना आपण 'जुनाट' काहीं वाचीत आहोंत असें वाटत नाहीं. नव्या काळाला योग्य असें दृष्टांत देऊन, अलिकडच्या काळांतील काहीं शंका मांडून व त्यांचीं उत्तरें देऊन जुनेच सिद्धांत संस्थापित केले आहेत. तत्त्वज्ञानाची चर्चा या पुस्तकांत असून सुद्धां पुस्तकाचें वाचन कंटाळवाणें होत नाहीं.

(प्राचार्य श्री. शं. वा. दांडेकर M. A.)

Indeed, I found the book to be very interesting even from a layman's point of view.......in his non-pedantic and flowing Marathi Mr. Desai has discussed the various problems of human life with a clarity and sincerity which are all his own although the subject matter is as old as the hills.

(S. R. Shikhare. संपादक समाजसत्ता.)

...ह्या पुस्तकाच्या वाचनानें मृत्युसंबंधाचें गूढ चांगलेंच उकलेल... मराठी भाषेंतील असंख्य वाचकांना ह्या पुस्तकानें त्यांचे बरेच प्रश्न सुटलेले दिसतील.

(सत्यप्रकाश. १४-१-१९५२)

REFBK-0008346

REFBK-0008346